सुखाची चांदणी
शुभांगी पासेबंद

सुखाची चांदणी

शुभांगी पासेबंद

ई साहित्य प्रतिष्ठान

सुखाची चांदणी

लेखिका : शुभांगी पासेबंद

Address : 202,Anandi Bhuvan Veer Savarkar Marg, opp Maharashtra Vidyalaya. Thane (West) 400602.
मो.नं. 9869004712, 02225345992
मेल- scpaseband@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

WA- 9987737237

esahity@gmail.com

ई प्रकाशन : १८ जानेवारी २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

अनुक्रमणिका

1 गडद निळे
2 आनंदाचा कुकर
3 आता संपर्क नाही
4 मजा की सजा
5 भाकरी फिरवली
6 ब्रेकप
7 अर्ध्यावरती डाव मोडला
8 मी रमले
9 वाढदिवसाबद्दल
10 दिवाळी कीटकवध
11 लग्न आणि व्रत तुळशी विवाह वगैरे
12 पुस्तक संग्रह
13 जवळपासचे
14 पालखी
15 छोटीशी भेग
16 ज्याचा त्याचा वेग
17 भित्रा ससा
18 आईने शिक्षा केली
19 गावंढळ
20 स्वभाव साचा

21 वाईटातून चांगले
22 महानायक अमिताभ बच्चन
23 असं बोलायला नको होतं
24 शक्ती देना
25 वेळ काळ प्रसंग
26 लई नाही मागणे
27 पाप्पा कहते है
28 देवाक काळजी
29 उपस्थिती
30 हे करूया का
31 खरेदी जत्रा
32 कपाटच कपाटे
33 आता बास
34 किती सांगायचंय तुला
35 चुका
36 गेले ते दिन
37 पुढच्या वर्षी
38 माझ्या मना बन दगड

1 गडद निळे गडद निळे

गडद निळे गडद निळे,

जलद भरुनी आले! बा भ बोरकरांची ही कविता उगीचच आठवली.

निळा रंग आकाशाचा निळा रंग सगळ्यांना आवडणारा असतो. पण या निळा कशात हे गडद काळसर राखाडी छटा शिरली की माणूस घाबरून जातो.

खरं तर पाऊस म्हणजे शेतकऱ्यांचा मित्र, आणि पाऊस म्हणजे एक हळव प्रेम पत्र!

पण दिवसेंदिवस जगभरात त्या वेगळ्या वेगळ्या घटना आहेत त्या बघता ह्या पावसाची पण भीती वाटते आहे. आपल्या देशात काही ठिकाणी ओला दुष्काळ पडतोय, काही ठिकाणी कोरडा दुष्काळ पडतोय. परदेशांमध्ये काही ठिकाणी तर हिट वेव्ह म्हणजे गरम उष्णतेची लहर आलेली आहे. वणवे लागत आहेत. ज्या देशात तापमान उणे मध्ये जात होतं त्या ठिकाणी ही उष्णतेच्या लहरी येत आहेत. असो निसर्गाचा समतोल बिघडला आहे आणि तो मानवानेच बिघडवलेला आहे.

बऱ्याच दिवसांच्या रिप रिपी नंतर ह्या गडद निळ्या जलदानी विश्रांती घेतली आहे. पक्षी छान पैकी घरटी बांधायला सुरुवात करत आहेत. चिवचीवाट करत चिमण्या येतात अन्य काही पक्षी सुद्धा वावरत आहेत. मुलं जी बऱ्याच काळ कोरोनामुळे आणि त्यातल्या रिपरित्या पावसामुळे कंटाळली होती ती सुद्धा बाहेर बागडत आहेत. पावसाने क्षणभर विश्रांती घेतली आहे आणि हा ब्रेक सगळेजण एन्जॉय करतात.

या ब्रेकला कमर्शियल ब्रेक करण्यासाठी व्यापारी पैसे कमावणारे पण जोरात जाहिरात करीत आहेत. त्यामुळे पर्यटन पण जोरात चालू झाले आहे. अशी ही माणसं जीवाच्या चिंता न करताच पर्यटन करत असतात. तरी पण पावसाळी सहल असं गोंडस नाव त्या ऋतूच्या संदर्भात या फिरायला जाण्याला दिलं जातं. पावसाने उसंत घेतली आहे म्हणून काहीजण सहल करतात तर काहीजण पाऊस खूप पडतोय म्हणून सहल करतात. एकूण सहल करणाऱ्यांना ह्या पावसाशी आपल्या सहलीच नातं जोडायचं असतं किंवा आपल्या रिकाम्या वेळेचा आपल्या फावल्या वेळेचं बंधन या पावसाची जोडायचं असते. निळा रंग एकदम गोड असतो.

निळा

मोरपिसाच्या डोळ्याचा एक मखमली निळा इंद्रनिळातला एक गोड राजबिंडा निळा! विसावल्या सागराचा एक ओलसर निळा आकाशाच्या घुमटाचा एक गोलसर निळा!! पावसामुळे मात्र हा निळा गडद काळ सर निळा होतो आणि लोकांना पावसाची चाहूल देतो

पावसाने काही दिवस विश्रांती घेतली आहे पण तो परत सुद्धा येऊ शकतो. काय मजा करायची ती करून घ्या. नाहीतर पावसाची सटकली ना तर आता तो कुणाला जुमानत नाही. बघा बरं! पश्चिम क्षितिजावर गडद निळे जलद परत भरून आलेले आहेत.

पाऊस कुठल्याही क्षणी कोसळू शकतो. त्या सुखद सरी असतील नाहीतर मग त्रासदायक बोअरींग असतील. आज पाऊस उघडलाय ना तर मजा करून घ्या.

**

2आनंदाचा कुकर

आतील हवेचा दाब वाढवून पदार्थ लवकर शिजवण्यासाठी प्रेशर कुकर चा वापर आपल्या देशात सुरू झाला. ऊर्जा वाचवणे वेळ वाचवणे कुकरने जमते. पदार्थ जळणं किंवा लागले या क्रिया चूलीवर त्रासदायक ठरू शकतात. ते न होणे यासाठी प्रेशर कुकर उपयोगी पडतो.

आनंदाचा शिधा दिला गेला, खाल्ला गेला आणि संपला. पण त्या ऐवजी आनंदाचा कुकर जर दिला असता तर? सुविधाजनक कुकर वापरुन गृहिणी कायम आपल्या बंधू राजाला / सरकारला आशीर्वाद देईल. एखादी जाहिरात देखील कुकरवर छापता येऊ शकते.

आज या विषयावर लिहायचं कारण म्हणजे फार पूर्वीच्या काळी मोदक पत्रात शिजवले जायचं. घट्ट झाकण बाजूला कडे कडेना मळलेल्या कणकेची वळी लावाल्यावर, वर ताटलीत पाणी राखून पदार्थ लवकर शिजवला जायचा. झाकणावर पाणी ठेवून पण एक प्रकारे कुकरचीच पद्धती वापरली जायची. पण प्रेशर कुकरच्या शोधामुळे खूपच वेळ वाचतो. एकाच वेळी वरण भात भाजी अथवा जे काही शिजवायचे ते शिजवता येते. ग्रामीण भागामध्ये भात अथवा खिचडी हे प्रामुख्याने खाल्ले झालेलं जाणार धान्य असतं. पातेल्यात कितीतरी वेळ तो भात पाणी टाकून शिजत असतो. त्या ऐवजी लवकर भात शिजून होईल आणि ऊर्जा पण वाचेल. काट्याकुट्यांचा, इंधनाचा धूर करून, चुलीवर, जेवायला घरी भात शिजवला जातो. त्यांनाही या कुकर गोष्टीचा फायदा होईल.

a

आज हे सुचवावसं वाटलं कारण की रेशन कार्डावर आनंदाचा शिधा दिला जातो. त्याऐवजी आनंदाचा कुकर आणि आनंदाची स्लीपर म्हणजे एक शिजवण्यासाठी कुकर आणि गरिबांना पायात घालण्यासाठी पादत्राणे या दोन गोष्टी दिल्या जाव्या.

डास हा तरी विचित्र प्राणी अख्या भारत देशात थैमान घालतो आहे. त्यामुळे डास प्रतिबंधक शोध लावलेच पाहिजे आणि डास साठू नये म्हणून मारायचे औषध, मच्छरदाणी सुद्धा रेशनकार्डावर आनंदाच्या शिधा मध्ये अंतर्भूत करावी.

अशी माझी आनंदाची सूचना आहे.

**

a

3आत्ता संपर्क नाही

आयुष्यात अनेक माणसं भेटतात. काही व्हाट्सअप ग्रुप, कट्टा त्यानिमित्ताने भेटतात. कधी हास्य क्लब, कधी ज्येष्ठ नागरिक समूह अशा कारणांनी एकत्र येतात आणि सकारात्मकता देऊन जातात. सहवासात तो आनंद आपण मिळवत असतो. वय विसरुन परत जे करावंसं वाटतं, ते त्या लोकांत आपण करत जातो.

जीवनात प्रॉब्लेम स्थायी असतात. आजार आयुष्यात कायमच असतात, पण त्या सहवासात, त्या मैत्रीत, त्या सोबत असण्यात आनंद असतो. पण काही कारणाने त्या व्यक्ती आपल्या जीवनातील साथ सोडून जातात. इतक्या दुरावतात, की आता संपर्क नाही एवढ्याच शब्दात आपण ते सांगू शकतो.

याची कारणे? त्यात वाद असू शकतो, स्थलांतर असू शकते. पण जुन्या त्या आठवणी आपण मनात सेव्ह करून घेतलेल्या असतात. पूर्वजन्मीचे काही ऋणानुबंध असतात. ज्यामुळे त्या व्यक्तींबद्दल आकर्षण वाटते. मन आदर, आनंद उपभोगतो. पूर्वीचे संचित आणि ती आपल्या आयुष्यात येते. मात्र त्या व्यक्तीचे आपल्याशी संबंध तेवढेच राहणं, आपल्या नशिबी लिहिलेलं असतं. किंवा आपलं ते पूर्वजन्मीचं सुकृत संपत असतं, त्यामुळे त्या व्यक्ती आपल्यातून निघून जातात. कारण स्थित्यंतर असू शकते, मृत्यू असू शकतो कारण काही असू दे पण संपर्क नसतो.

अशावेळी आपण स्वतःला कसं बदलायचं?

a

1 I want to come out of that phase. These people have hurt me and became ghost.

2 I want to have happy thoughts but it is impossible to have.

3 I have become an impossible and emotional fool. I don't find anything within the range. असे वाटणे normalआहे.

4 जीवनात बदल होत राहतात पण मन त्या जुन्या काळात रेंगाळत राहतं. ते ओझं मनावर येते. असंही होतं कुणीतरी काही काळ साथ देत आणि निघून जातं. पण लक्षात ठेवा रिकाम्या जागेत कुणीतरी नंतर येतं. मागून येणारे तेवढं प्रिय ठरत नाही, पण तरी कुणीतरी येतच.

5 समजा आणि कुणीच आलं नाही तर? तर स्वतःवरच खूप प्रेम करा आणि स्वतःच्या आतला असलेला राग कमी करा. स्वतःचे देहावर प्रेम करा, स्वतःच्या चुकांसह, स्व प्रेम करा.

6विश्वास ठेवा तुमची तब्येत मस्त होईल. पूर्वीचे उत्साही आनंदी सुंदर दिसणारे तुम्ही स्वतःला आठवा. तसे व्हा. कसे?

7 उन्हाचा पावसाचा आनंद घ्यावा.

8 एखाद्या सकारात्मक गुरुला भेटा. तो गुरु तुम्हाला अडचणीतून बाहेर काढण्यासाठी काहीतरी उपयोगी असा सल्ला देईल. अडचणीत जाऊनच माणूस मोठा होत असतो. स्वतः तुम्हाला सुद्धा इतका त्रास का बघावा लागतो? कारण की तुम्ही गुरु(महान, विरक्त) बनणार आहात. तुमच्यात काहीतरी चांगले गुण आहेत. सोन्याचा कस काढावा तसं तुमची परीक्षा देव घेतो आहे.

a

9forget असे मनाला समजवा, मन आनंदी ठेवा. स्वतःला वारंवार सांगा, मला त्रास काही होत नाही. मी आनंदी आहे.

10 मी उन्हात जाणार, फिरायला जाणार, मी आरोग्यवान आहे. एकटे जाता येत नसेल तर कुणाचा तरी हात धरून जा. उन्हात बसा. ऊन भाजलं तरी चालेल.

11 तलावावर जा, डोंगरावर जा, वातावरणात बदल करा. मनाला सकारात्मक असा संदेश द्या. Positive affirmation.

12 वास्तुला खूष करा. त्यासाठी काय कराल. घंटा नाद करा. सुगंधी फुल ठेवा. अगरबत्ती लावा. घरात कुणाला अस्थमाचा त्रास होत असेल तर आपण असं करू शकत नाही आणि मग आपण डिप्रेस्ड पण होतो. हताश वाटू शकते. पण त्यासाठी निदान स्वच्छता पाळा.

13खोलीतून बाहेर पडा. खोलीतला पसारा आवरा. रोजच्या रोज गादीची चादर स्वच्छ बदला. खोलीत कापूर ठेवा स्वच्छता आली की मन आनंदी पण होईल. तब्येत पण थोडी बरी होईल.

14ठरवा, छान सुखात तुमची निवड होईल, मैत्री मिळेल, ओळख होईल. बाहेर पडला नाहीत तर बंद दारांच्या आत सर्व शक्यता संपतात.

15 तुम्ही आता तरुण/ज्येष्ठ नागरिक झाले आहात. तुमच्या जबाबदाऱ्या संपल्या आहेत. आता तुम्ही रिलॅक्स व्हायचं आणि ह्या वयात तब्येतीचा उन्नीसबीस प्रत्येकाचं चालू राहतं.

16 जुन्या नकोश्या आठवणी येतात. ज्या शरीरातील ऊर्जा ब्लॉक करत राहतात. आपल्या आयुष्यात अनेक रंग आले. काही व्यक्ती आल्या त्या पुढे निघून गेल्या. पण आपल्याला त्या सर्वातून पण बाहेर पडायचे आहे.

a

17 काळ्यापांढऱ्या दूरदर्शन पासून नंतर आपण रंगीत टेलिव्हिजन पण पाहिला. तशा आपल्या आठवणी काळ्या पांढऱ्या होत्या. त्यानंतर रंगीत झाल्या. आणि आता तर सारे सहज डिलीट कराव्यात अशा डिजिटली डिलीट करायची सोय पण आली आहे. आपण पण त्या जुन्या आठवणी त्रासदायक ठरत असतील तर डिलीट करायला हव्या. आधुनिक व्हायला हवं.

18 आपल्या मनाचं तुलना जर कपाटाशी केली तर या मनाच्या कपाटाची साफसफाई करा. आपल्या डोक्यातील विचारांत पण झाडू मारून जळमटे, कचरा फेकून द्या.

19 माणसं अशीच असतात. तुमच्याशी कुणीतरी वाईट वागलं ह्यात तुमचा दोष नाही. तुमची चूक ही आहे की माणस अशीच असतात हे तुम्ही पटकन ओळखून घेतलं नाही. आपण आपल्या संस्काराप्रमाणे आपल्या चांगुलपणा ने वागतो. समोरची व्यक्ती आपल्याला ठोकर देऊ शकते. पण तरीही जे करायचं ते चांगल्या भावनेने करा.

20माफी मागा. माफ करा आणि पुढे जा. जग हे असंच असतं आपण जग बदलू शकत नाही. मनामध्ये समजा तीन कपाट आहेत. भूत_भूतकाळ, भूतकाळ, वर्तमान काळ! या तीन कपाटात साठलेल्या आठवणींची रिअरेंजमेंट करा.

21 जुन्या तुटक्या फुटक्या वस्तू बदलणं, सगळ्याच बाबतीत शक्य नसतं. घर बदलणं पण शक्य नसतं घराचा परिसर बदलणे शक्य नसतं आणि आपण हतबल होतो. अशावेळी काय करायचं? आपला ओरा बदलायचा. रिमुव क्लटर इन साईड, इफ यू कॅनॉट रीमोव आऊटर क्लटर. यू रिमुव लॉस. Remove outer as well as inner clutter.

a

22 काहीही आपण बदलू शकत नाही, असे वाटावे, तो पण प्रसंग कधी जीवनात येतो. वाटते की आपण काहीच बदलू शकत नाही.

मृत्यू आपल्या मैत्रिणीला दूर नेतो आपल्या जीवनातल्या आवडत्या व्यक्तींना दूर नेतो. कधी कधी नोकरी धंदा परिस्थिती या कारणाने दूरवर अंतरावर जवळची व्यक्ती जाऊन राहते आणि आपल्याला एकट्यालाच राहावं लागतं. त्या सर्व गोष्टींसाठी मनाची तयारी करा. हे सर्व परमेश्वराच्या योजनेप्रमाणे होतं. पूर्वजन्मातील उरलेलं कर्म फेडायला या जन्मात तेवढाच काळ या व्यक्ती तुमच्या आयुष्यात आल्या होत्या. वेळ झाली की त्या निघून गेल्या. जैन लोकांमध्ये मीच्छामी दुगडम म्हणून माफी मागून मना वरचं ओझं उतरायची पद्धत असते. आपण पण आता ती माफी मागू या आणि माफ करू या.

काय? आपल्याला असं वाटतं की आपल्याला समोरच्या व्यक्तींनी त्रास दिला आणि त्या व्यक्तीला असं वाटत असतं की आपण त्याला त्रास दिला. दोघे स्वतंत्र असतात आणि एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या इच्छेप्रमाणे शंभर टक्के कधीच वागू शकत नाही.

पर्याय उपलब्ध नसतो. आहे त्या परिस्थितीत आनंदी राहायचा प्रयत्न करा. भूतकाळ संपलेला आहे. भूतकाळात भेटलेली सर्व माणसे फोटोत जाऊन राहिलेली आहेत. आठवणींच्या फोटो त उरली आहेत. आता कुणाशीही संपर्क नाही.

आता तुम्ही स्वतःच्या अंतर्मनाशी संपर्क साधून मैत्री करून आनंद मानून पुढे जायचं आहे. आत्ता भूतकाळाशी संपर्क नाही, आता आनंदाशी संपर्क ठेवा

4 मजा की सजा

2022, मोरबी येथे छठपूजा निमित्त जमा झालेल्या सर्व पर्यटकांच्या वजनाने पुल कोसळून 130 जणांचा मृत्यू झाला. हे सर्व लोक मजा करत होते आणि या मजेचा परिवर्तन सजेत झालं.

सेवूल येथे हॅलोवीन च्या कार्यक्रमासाठी जमलेल्या लोकांची अरुंद गल्लीमध्ये स्टॅम्पेड, चेंगराचेंगरी झाल्यामुळे 190 लोकांचा मृत्यू झाला.

पर्यटनाला आलेली अख्खी बस नदीत कोसळली.

यात्रेसाठी जमलेल्या लोकांवर दरड कोसळून अनेकांचा मृत्यू झाला. ढगफुटीमुळे पर्यटनाला आलेले अनेक जण वाहून गेले.

समुद्रकिनारी मजा करायला आलेल्यातील अनेक जण बुडाले.

बदलापूर येथील कोंडेश्वर धबधब्यात 4तरुण वाहून गेले.

समुद्रकिनारी बोट कोसळून अनेकांचा मृत्यु झाला.

मजा सुरू झाले असताना त्यांच्यावर काळाने घाला घातला.

पर्यटनाचा आपल्या देशात अतिरेकच झाला आहे. घर चावत होतं की काय मला कळत नाही. त्यात अजून कोरोना काळात दोन वर्ष बळबळ घरी बसल्यामुळे लोकांना सध्या हाव सुटली आहे. मग वकील नेते तरुण वृध्द सगळ्याच बाबतीत वखवखत भाग घेत आहेत. बाहेर फिरणे पर्यटन या सगळ्याचा अतिरेक होतो आहे. सर्व सण उत्सव सुद्धा प्रमाणाबाहेर उत्साहात पार पडत आहेत.

a

ते नॉर्मल असतं. मानसशास्त्राला धरून असतं. पण मजा आणि सजा यात कुठेतरी फरक करायला हवा. मजे बरोबर सजा फ्री असं होऊ नये. यावर उपाय

1 एखाद्या पर्यटन स्थळी जाण्यासाठी ठराविक संख्येतच लोकांना परवानगी द्यावी.

2 अति गर्दी होत असेल अशा पर्यटन स्थळी निर्बंध ठेवावेत.

3 अति गर्दी टाळण्यासाठी पर्यटन स्थळांवर प्रवेश फी ठेवावी.

4लागोपाठ सुट्टी आल्यास अधिक गाड्यांची सोय करावी.

5 हॅप्पी अवर्स तसे हॅप्पी डेज म्हणून सुट्ट्या नसलेल्या गर्दी नसलेल्या अशा मधल्या मंगळवार ते गुरुवार या वारी पर्यटनाला येणाऱ्यांना काहीतरी सूट देण्यात यावी.

6 प्रवासात होणारा ट्रॅफिक जाम टाळण्यासाठी जवळपासच्या पर्यटन स्थळ आणि किल्ले, याबाबत, जनते मध्ये जागरूकता निर्माण करावे.

7 दुरून डोंगर साजरे. सर्व पर्यटन स्थळ थोड्याफार फरकाने सारखीच असतात. सर्व वस्तू सर्व ठिकाणी विकत मिळत असतात. त्यामुळे खरेदीसाठी कुठल्यातरी दूरवरच्या पर्यटन स्थळी जाणं सुद्धा सुयोग्य नाही.

8 पर्यटनाचा अधिक त्रास साधारणपणे वृद्ध लोक आणि बालक यांना होतो. अशा लोकांसह पर्यटन करताना विशेष काळजी घ्यावी.

पर्यटनाचा अतिरेक टाळावाHappyness is a state of mind. delightfulness is in your mind, not in places. मोबाईलच्या इंटरनेट डिटॉक्स सारखा पर्यटन डिटॉक्स करायची पण वेळ आली आहे का?

5 भाकरी फिरवली

आज वर्तमानपत्रात एक बातमी वाचली की आणखी एका राजकीय पक्षाने भाकरी फिरवली. (काही बदल केले)

मला आठवतं खूप वर्षांपूर्वी मॅनेजमेंटच्या अभ्यासाच्या दरम्यान एका प्रमुख पाहुण्यांनी सांगितलं होतं की भाकरी फिरवली नाहीतर करपते. त्यामुळे भाकरी फिरवावी लागते. अन्यथा चुलीवरचा जाळ हा समप्रमाणात सगळीकडे लागत नसतो, त्यामुळे भाकरी फिरवावी लागते. ती चिमट्याने धरून फिरवा, हाताने धरून फिरवा, कालथ्याने फिरवा पण फिरवावी हि लागते. ज्यामुळे जाळ सर्वत्र, ठीक समप्रमाणात लागून भाकरी छान फुगते आणि चविष्ट होते.

ऑफिसमध्ये सुद्धा साधारणपणे तीन चार तीन चार वर्षां नंतर, एका जागी राहून एक हाती काम बसल्यामुळे किंवा त्या व्यक्तीला अतिपरिचयात अवज्ञा झाल्यामुळे बदली केली जाते. सर्व काम, ही सगळ्यांना आली पाहिजे आणि कुणा वाचून अडू नये मुळे ठराविक काळानंतर, पदोन्नति नंतर कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या जातात. जीवनाचा पण असंच असतं. एका जागी जन्मापासून मृत्यूपर्यंत जी माणसं राहतात, ती तीच तीच ठराविक जागा, तीच तीच ठराविक माणसे यामुळे स्थिर होतात. आजूबाजूचा परिसर जरी तो बदलत गेला, काळानुरूप त्याच्यात बदल होत गेले, माणसं येत राहिली, तरीही, वृत्तीची भाकरी करपायची शक्यता जास्ती असते. वाहनाची चाकं सुद्धा काही दिवसानंतर पुढची मागे अशा प्रकारे टायर रोटेशन ने बदलली जातात.

त्यामुळेच असं म्हटलं जातं

केल्याने देशाटन, पंडित मैत्री,

सभेत संचार, शास्त्र ग्रंथ विलोकन,

मनुजा चातुर्य येतसे जाण.

म्हणजे वेगळ्या वेगळ्या गावी जाऊन, अनुभव घेऊन, माणसाला चातुर्य येत असतं. जीवनातल्या, ठीक मनोवृत्तीसाठी सुद्धा भाकरी फिरवणं, बदल घडवून आणणे आवश्यक असतं.

प्रत्येक गावाचं तिथल्या माणसांचं तिथल्या भूप्रदेशाचं, तिथलं अन्न हवा पाणी, भौगोलिक परिस्थिती, प्रवास अन्नपदार्थ, संस्कृती याचे वेगळे वैशिष्ट्य असतं. त्यामुळे वेगळ्या वेगळ्या ठिकाणी जाऊन आल्यावर आपल्याला बरं वाटतं. पर्यटनाचे तत्व हेच आहे की, वेगळ्यावेगळ्या ठिकाणीचे ज्ञान घेऊन, माणसाची मनोवृत्ती सुद्धा बदलत असते. अर्थात आपण पर्यटनाला गेल्यावर तिथल्या लोकल गोष्टी तिथली माणसं, खानपान, पद्धती यांच्या बद्दल पण माहिती करून घ्यायला हवी. जाऊन एसी हॉटेलमध्ये राहून ते पर्यटन स्थळ नीट कळत नाही. फायदा होत नाही आणि भाकरी पुरेशी फिरवली जात नाही.

हल्ली आधुनिक काळात ओव्हनमध्ये ब्रेड भाजतात, त्यामुळे भाकरी फिरवणं वगैरे ही संकल्पना हल्लीच्या काळात मुलांना अथवा अन्य लोकांना सुद्धा कालबाह्य वाटू शकते.

पण एक प्रसंग अजून सांगणार आहे. माझी एक मैत्रीण आहे. आम्ही छोट्या गावात सोबत होतो. तिचा मुलगा नैराश्यात केला. त्यावर ती म्हणाली,

"मी त्याला मुंबईला घेऊन जाणार आहे. छोट्या गावातले ना सगळ्यांना सगळं माहिती असतं. दोष आणि समोरच्या व्यक्तीची प्रतिक्रिया आपल्याबद्दलचं मत हे नजरेतून कळल्यामुळे व्यक्ती जास्ती निराशेत जाते. मी

त्याला मुंबईला नेले की मुंबईला कोण कुणाला विचारत नाही आणि कोण कोणाची पर्वा करत नाही. " त्यानुसार ठरवले, ते जमल्यामुळे ती आपल्या मुलाला मुंबईला घेऊन गेली. तो मुलगा, बऱ्यापैकी त्या बदलाने सुखावला. नैराश्य संपले. काही वर्ष गेली पण नंतर परत त्या मुलाला गड्या आपला गाव बरा असं वाटून ते परत आमच्या छोट्या गावी परत परतून आला. म्हणजे भाकरी काही काळ फिरवली आणि ज्याप्रमाणे सोयीस्कर वाटेल त्याप्रमाणे आपण परत आपल्या गावी सुद्धा स्थलांतर करू शकतो. बदली, बदल होत असताना, बदल मनात होत असताना स्थलांतराच्या वेळी नवीन गावी गेल्यावर कुठली माणसं आपल्या सहवासात येतात याच्यावर सुद्धा आपण तिथे किती रमतो हे अवलंबून असतं.

माणूस हा सामाजिक प्राणी आहे. नुसती भरपूर पगाराची नोकरी मिळाली, पॉश कॉर्टर राहायला मिळालं, ऑफिस एसी आहे, जेवणाचा डबा आहे या सर्व गोष्टी ठीक असल्या की बरे वाटते. तरीही काहीतरी नवे, काहीतरी एक वेगळा धागा तो त्या गावातून वावरणाऱ्या माणसातूनच आपल्याशी जुळावा लागतो तरच आपण त्या गावी अधिक रमू शकतो.

बदली झाली की पहिले बदली टाळण्याचा प्रयत्न होतो. कारण आहे त्या ठिकाणी चे ज्ञात धोके माणसाला ठीक वाटतात. अधिक धोके नको किंवा अधिक बदल नको असं सांगून माणसे पाऊल मागे घेतात. खंड पाडतात.

पर्यटनाला पण माणूस बदल का स्वीकारतो? कारण की त्याला माहिती असतं हा बदल तात्पुरता आणि तत्कालीन आहे. आपण परगावी परदेशी फक्त मजा करायला जातो आहोत. त्यामुळे पर्यटनाचा बदल, हवा असा वाटतो. पण बदलीच्या वेळी गाव बदलणं अवघड वाटत असतं. बदलीच्या गावी जाणं,

a
सहवासातले समूह बदलणं, मित्र-मैत्रिणींचा कंपू बदलणं, कुटुंबाच्या खाजगी सर्कलच्या बाहेर येऊन अन्य लोकांशी गप्पा, तो सुद्धा सहवास जाणणे, चर्चा घडवून आणणे, व्यक्तीमत्व घडवून आणायला हवे असते. तडजोड शिक्षण घ्यावे. मी आणि माझा टीव्ही आणि मोबाईल बरा या वृत्तीतून बाहेर येणे म्हणजेच भाकरी फिरवणे होय.

भाकरी फिरवून बघा कदाचित मनोवृत्ती आणि जीवन वृत्ती अधिक चांगली होईल. जीवनाचा स्वाद अधिक चांगला वाटेल.

**

6 ब्रेकप

ब्रेकअप म्हणजे प्रेमभंग होय. ब्रेकप हा शब्द तरुण-तरुणी टीनेजर्स हेच वापरतात असा आपला समज असतो. मध्यंतरी मालाडला एका कार्यक्रमात मला बोलावलं होतं. त्यावेळी 'ब्रेकअप कौन्सिलिंगचा पण कार्यक्रम मॅडम करा' असं मला सुचवण्यात आलं होतं. त्यावर मी त्या विद्यार्थ्यांना म्हटले,

"एका वृद्धाश्रमात आम्ही गेलो होतो तेव्हा मी ब्रेकअप बद्दल ओझरता संदर्भ मनाची मशागत, या कार्यक्रमात, सहज मध्ये केला. माझ्या कार्यक्रमात त्यावेळी ते वृध्द लोक सुद्धा असेच म्हणाले होते की ब्रेकअप साठी कार्यक्रम ठेवा. सगळी कॉलेजची तरुण मुलं हसली. टर ऊडवु लागली. कारण तरुणपणी प्रत्येकालाच वाटत असतं की हो आपण कधीच म्हातारे होणार नाही. वृद्ध आणि म्हातारे लोक हे काय (त्यांच्या मते) नॉन कॉग्नेझिबल म्हणजे दखल न घेण्यासारखे आहेत. पण ब्रेकअप कोणत्याही वयात होऊ शकतो. प्रेम जसं वयावर अवलंबून नाही तसं ब्रेकअप सुद्धा वयावर अवलंबून नाहीये.

एका ज्योतिषाकडे मी माझ्या मैत्रिणी सोबत कुंडली दाखवायला गेले. ज्योतिषी खाजगी पण. न जपतात संधी मिळाली असताना तिथे सगळ्यांसमोरच एकमेकांचे भविष्य सांगत होते. त्यावेळी एक बाई विचारायला आली होती की,

"माझा मुलगा व एका मुलीच्या नादी लागलाय ऐकतच नाही काय करावं काय करावं? "

त्यावेळी प्रेक्षक उर्फ प्रश्न विचारायला आलेले अन्य कलाकार /पब्लिक त्यातला एक माणूस म्हणाला,

"अहो काय सांगू तुम्हाला माझा भाऊ भजनाला जायचा तिथे एका बाईशी मैत्री झाली. हा इतका वेडा झालाय त्या बाईसाठी की हा तिचा नादच सोडत नाहीये. तिचा त्याने नाद सोडावा म्हणून काय करावे मला प्रश्न पडला आहे. " आणि अजून एक प्रेक्षकांमधला म्हणाला "अहो करू द्या त्याला काय प्रेम बीम करायचं असेल तर! प्रेम मिळालं नाही म्हणून मन खट्टू होत.. तरुणी आणि बायका असे साहसी निर्णय घ्यायला घाबरतात. "

"घरवाले दुःखी झालो. "तिसरा.

"आयुष्यात, या वयात? " अजून एक प्रेक्षकांमधला म्हणाला.

"अहो, म्हातारा झालो म्हणून काय झालं? आम्हालाही वाटतं मैत्रीण मिळावी. प्रेम व्हावं. कुणीतरी सहचारी असावा. "

"काही पुरुष आणि बायका असे निर्णय घ्यायला टाळतात आणि हळवी व्यक्ती त्याच्यात सहन करत असते. "

पूर्वीच्या काळी सुद्धा अशा गोष्टी होत्या. नाही असं नाही. ब्रेकअप हा काहीसा नवा शब्द हल्ली आला असला तरी प्रेम रंगी, प्रेमभंग झालेला कवी हातात झोळी घेऊन दाढी वाढवून रानोमाळ फिरतो, मजनू होतो, असं पूर्वी सुद्धा बोलले जायचं. ब्रेकअप झाल्यावर ची काही गाणी त्या व्यक्तीसाठी ठरवून दिली जायची.

1 तेरी गलियों में ना रखेंगे कदम आज के बाद

2 किंवा चांदी की दिवार ना तोडी प्यार भरा दिल तोड दिया,

एक धनवान की बेटी ने निर्धन का दामन छोड दिया.

3टूट गया, दिल का खिलौना है टूट गया!

4 जब दिल ही टूट गया हम जीके क्या करेंगे?

अशी गाणं म्हणत माणसं निराशेतून पार व्हायची. प्रेम हे पूर्वापर चालत आले आहे आणि ब्रेकअप सुद्धा हा शब्दप्रयोग न करता, न वापरता चालत आलेला आहे.

कारण माणूस जे ठरवतो ते घडतच असं नाही.

'अपने मन की हो तो अच्छा है!

मगर अपने मन की ना हो तो भी ठीक है क्योंकि वो भगवान की इच्छा है! वह होने वाली चीज है '

असं एक वाक्य आहे. त्यामुळे ब्रेकअप नवीन नाही. ब्रेकअप कौन्सिलिंग पूर्वी मित्र मैत्रिणी आई वडील गुरु निसर्ग आजी-आजोबा हे द्यायचे. आता ब्रेकअप कौन्सिलिंगचा वेगळा सेक्शन मानसोपचार तज्ञाकडे असतो. एकूण काय ब्रेकअप हे होत राहतात. ब्रेकप चे नवीन गाणं ये दिल हे मुश्किल मधलं आहे.

सुबह सवेरे उठकर मैने ब्रेकअप कर दिया!

कॉलेज की सहेलीयो से पॅचअप कर लिया!

जिंसे मिलना पायी ऊनको व्हाट्सअप कर दिया!

सैयाजी से आज मैने ब्रेकअप कर दिया!

म्हणजे हे ब्रेकअपचं दुःख न करता पुढे जाणारी माणसे सुद्धा समाजात आहेत. ब्रेकप पार्टीसाठी मध्यंतरी मला एका ठिकाणी बोलावलं होतं. मला

तर जायची हिंमत नाही झाली कारण ब्रेकअप हा शब्द मला तर फार घातकच वाटतो.

पण एकूणच प्रेम भंग, ब्रेकप या दुःखाचे कडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो आहे. काहीजण सकारात्मक पण होत आहेत.

"इतनाही उपकार समज, कोई जितना साथ निभाये! कोई न संग मरे!
"

ब्रेकप ला धैर्याने तोंड द्यायलाच लागते. पर्याय कुठे असतो?

a

7 अर्ध्यावरती डाव मोडला

भार पूर्वापार काळापासून चालत आलेलं, मराठी प्रसिद्ध गाणं म्हणजे 1953 सालाचे हे गीत होय.

भातुकलीच्या खेळामधली राजा आणिक राणी अर्ध्यावरती डाव मोडला अधुरी एक कहानी!! धृ!!

राजा वदला मला समजली शब्दा वाचून भाषा,

माझ्या नशिबासवे बोलती तुझ्या हातच्या रेषा!

का राणिच्या डोळा तेव्हा दाटून आले पाणी!! 1!!

राणी वदली बघत एकटक दूरचा तारा,

उद्या पहाटे दुसऱ्या वाटा दुजा गावचा वारा!

पण राजाला उशिरा कळली गुढ अटळ ही वाणी,

अर्ध्यावरती डाव मोडला अधुरी एक कहाणी!! 2!!

तिला विचारी राजा का हे जीव असे जोडावे,

का दैवाने फुलण्याआधी फुल असे तोडावे?

या प्रश्नाला उत्तर नव्हते राणी केविलवाणी!

अर्ध्यावरती डाव मोडला अधुरी एक कहानी!! 3!!

का राणिने मिटले डोळे दूर दूर जाताना? का राजाचा श्वास कोंडला, गीत तिचे गाताना?

वाऱ्यावरती विरून गेली एक उदास विराणी!

a

अर्ध्यावरती डाव मोडला अधुरी एक कहानी!! 4!!

संगीतकार पंडित यशवंत देव

गायक अरुण दाते

1953 साली प्रकाशित झालेले हे गाणं आज 2022 सालच्या काळात सुद्धा डोळ्यात पाणी आणते.

सत्ता बदलत राहते. खुर्चीवरची माणसं बदलत राहतात. जीवन बदलत राहतं. जीवनातली माणसं बदलत राहतात. पण कधीतरी कुठल्यातरी मावळतीला, संध्याकाळी झालेले अन्याय, केलेले अन्याय, माणसाला आठवावेच लागतात.

जीवन म्हणजे भातुकलीचा खेळ असतो पण ज्या क्षणाला तो मोडतं तोपर्यंत माणूस अहंकारात वावरत असतो. अतिशय सुंदर असं हे गाणं आठवणीतील गाणी मध्ये ऐकायला मिळेल आणि हे माझे सगळ्यात आवडतं गाणं आहे.

ठाणे

9869004712

**

8 मी रमले

मी सुद्धा या वृद्धाश्रमात आले तेव्हा काही फार खुश नव्हते. काही ना काही कारणामुळे काही प्रसंगामुळे माणसाला असे अनपेक्षित निर्णय कधी कधी घ्यावे लागतात. पूर्वी या विषयावर लिहू सुद्धा नको, नकारात्मकता येते असे लोक मला सांगायचे. पण मी मुद्दामच या विषयावर लिहिते आहे. कारण की अशा काळात, असे प्रसंग कुणावर आले तर त्याप्रसंगी त्याला तोंड देता यावं.

स्थलांतर अनपेक्षितपणे जीवनात येवु शकते. नव्या जागी देखील अन्न वस्त्र निवारा या तीन गोष्टी महत्त्वाच्या असतात.

तडजोड

नवीन ठिकाणी अन्नाची तडजोड करायला अवघड जात. वस्त्र आपली नेहमीचीच असतात पण ती स्वच्छ धुवून वाळून घालायची सवय असते. ते आवश्यक असतं आणि अवघड नसते. पण निवारा जागा बदलल्यावर घरच्यासारख्या सुख सोयी कुठेच मिळत नाहीत. जे आहे त्याच्यात जपून राहावं लागतं. जमवून घ्यावे लागतं.

नवी खोली वेगळी असते. ऑरा बदलतो. तडजोडीला वेळ लागु शकतो.

By law of attraction negativity not wanted.

मन पण उदास उदास होतं कुणी काही विचारलं की डोळ्यात टचकन पाणी येतं. पाण्याच्या प्रवाहात पडलोय प्रवाहा बरोबर वाहून जावं लागतं.

संकट आलं भोगाव लागत. आरोग्य नाही तसेच दिवस रेटावे लागतात. वातावरणाशी एकरूप झालो नसलो तरीही सोसावं लागतं.

मनाची तीव्रता सुरुवातीचे कढ, उकळ कमी होतो. साय उतु जाते किंवा खाली बसते. उष्णता निघून जाते किंवा खाली बसते. आहे त्या परिस्थितीतून सुटका नाही हे कळून चुकतं आणि मग आहे त्या परिस्थितीतच तडजोड करायला माणूस शिकतो.

सपाटून भूक लागली की काहीतरी मिळत असे आणि मग त्या समोर आलेल्या तुकड्यांना सुद्धा किती चव आहे हे निदान अर्धी पोळी खाईपर्यंत तरी कळत असे. नंतर मग जुने दिवस आठवून मन उदास होऊन परत ती तोंडाची कडू चव परत येत असे. पोटभर जेवण इथे मला कधी आवडलं नाही, जमलं नाही आणि झेपलही नाही. बारीक चांगल्यातला जिरग्या तांदूळ खायची सवय असल्यामुळे इथला भात खायची इच्छाच व्हायची नाही. अगदी वासाचा सुगंधित भात नसावा म्हणजे देणे जमत नाही, त्यांना किंवा परवडत नाही म्हणून ते देत नसतील पण बारीक तांदूळ वापरायला काय हरकत आहे? सर्वजण जेष्ठ नागरिकच तर होते. पण मी त्या गोष्टीची सुद्धा सवय करून घेतली. हळूहळू मी रुळू लागले, मी रमले. मी परिस्थिती बदलू शकत नव्हते. मी स्वतःची मनस्थिती बदलली. मी स्वतःला बदलले.

नवीन कोणी या वृद्धाश्रमात आलं की तो/ती आधी बिचकलेल्याच असतात. आज त्यांना मी समजून घेते आधार देते आणि माझ्या पंखाखाली घेऊन आश्रमाशी तडजोड करायला शिकवते.

मैत्री, आधार, नवीन जीवनाचा उपभोग घ्यायला तयार करते. लोक म्हणतात,

a

‘ बऱ्यापैकी तुम्ही छान रमल्या आहात. नवीन ठिकाणी सुद्धा रमता हो! ’ तुम्हाला काही होवो नवीन ठिकाणी रमाव लागतं. तो तडजोडीचा भाग असतो.

मी आता तर समुपदेशक म्हणजे नवीन आलेल्या माणसांना समजावून घेऊन या नवीन वातावरणाची जुळवायला मदत करते. हे सहकार्य करणं यात सुद्धा मी छान रमले आहे.

**

9 वाढदिवसाबद्दल

वाढदिवस हा जीवनात महत्वाचे दिवस असतो. तो साजरा करणे, किती महत्त्वाची गोष्ट आहे हे आपल्याला जागोजागी वाढदिवसाच्या शुभेच्छा म्हणून जे फलक लटकवले जातात त्यावरून लक्षात येते. गल्ली ते दिल्लीत होणारे वाढदिवस सुद्धा महत्त्वाचे असतात. जोरजोऱ्यात डीजे लावून गाणी लावून वाढदिवस साजरे केले जातात. जन्मतारीख असेल त्या दिवशी आपल्या जन्माचा उत्सव साजरा केला जातो. आपण हाच दिवस का साजरा करतो? साधारणपणे सण साजरा करायची माणसाला आवड असते. मनाला उत्सवाची तर ओढ असते. चांगलं चुकलं खायला आणि मजा करायला कुणाला आवडत नाही? मित्र कंपनीमध्ये एकत्र बसायला मजा करायला आपल्या सगळ्यांनाच आवडतं. सणांव्यतिरिक्त एकत्र येण्याची एक संधी, या दृष्टीने वाढदिवसाकडे बघितलं जातं.

हवा पाणी जागा आणि अन्न या चार गोष्टींवर तो प्रसंग आणि त्याच्या निगडीत आठवणी अवलंबून असतात. त्यामुळे destination birthday eventवाढदिवस, छान छान ठिकाणी party वगैरे करायची पण एक पद्धत असते. अशा रीतीने वर्षभरात बरेच परिचितांचे नातेवाईकांचे मित्रांचे मैत्रिणींच्या असे वाढदिवस आपल्याला बघायला मिळतात. खाणे साजरी करायला, गोडधोड खायला मिळते. वाढदिवसाला केक कापू नये, अन्नावर सुरी चालवु नये, दिवा फुंकर घालून विझवू नये असे आपल्या हिंदू धर्मानुसार सांगतात. आपण वाढदिवस साजरा करायला विरोध करत नाही. तर म्हणतो ज्या त्या राज्यधर्म यानुसार वाढदिवसाची पद्धत वेगळी असते.

पण शुभेच्छा सारख्याच असतात.

‘ तुम जियो हजारो साल,

साल के दिन हो पचास हजार! ’

या भावनेने वाढदिवस साजरा केला जातो. एक सण उत्सवाचा, आशिर्वादाचा अजून एक उत्सवी दिवस या दृष्टीने वाढदिवसाकडे आनंदाने बघावं.

10 दिवाळी कीटकवध

दिवाळीतील, पंचमी दिवशी वेगवेगळ्या कीटकांच्या आकृती करून त्यांचा दहन केल्याने वर्षभर त्या कीटकांचा त्रास होत नाही असा समज आहे. किटकांचा नाश करू न शकल्याने, वर्षानुवर्ष कीटक प्रतीक दहनाचा प्रथा चालू आहे.

पारंपरिक रित्या म्हणजे 500 600 वर्षापासून हे असंच चालू आहे. का? का? विज्ञानाने प्रगती केली. विज्ञान बदललं तरीही आपण छोट्याशा कीटकांवर विजय मिळवू शकत नाही. डास मलेरिया पसरवतात. माशा अनेक रोग पसरवतात. पण अजूनही आपण छोट्याशा या कीटकांवर का विजय मिळवू शकलो नाही? अपयश.

प्रगतीच्या मोठ्या मोठ्या थापा आपण मारतो. पण एवढासा छोटा डास तो चावून हैराण करतो किंवा डास चावू नाही म्हणून जेव्हा आपण एका झटक्यात आपले हात हलवतो, नेम चुकु शकतो, डास उडून जातो, तेव्हा आपल्या हातालाही वेदना होते, प्राण जाऊ शकतो.

मला आठवतं पूर्वी म्हणजे पन्नास एक वर्षापूर्वी आम्ही दिवाळीच्या सुट्टीत मामाच्या गावी म्हणजे धुळ्याला जायची. धुळ्याला खूप प्रकारे किडे असायचे. ब्लिस्टर चा किडा म्हणून प्लास्टिकचा किडा म्हणून असे वेगळ्यावेगळ्या नावाचे किडे बागेत असायचे. पूर्वी हिरवीगार झाडी सगळीकडे असल्यामुळे किड्यांचे प्रमाण पण जास्ती असायचे. कातीण चीरडली जायची आणि अंगावर फोड यायचे. एलर्जी यायची आणि डॉक्टर कडे कुणाला ना कुणाला तरी न्यायची वेळ यायची. आधी म्हणायचे पित्त

उठले, गांधी उठल्यानंतर म्हणायचे दुसरे काही झालं आणि डॉक्टर औषध द्यायचे.

पूर्ण दिवाळीचा आनंद त्या बारीक किड्यांमुळे नष्ट व्हायचा. रांगोळी काढायला गेलो की डास चावायचे. आजही या पन्नास वर्षानंतर सुद्धा माणूस परावलंबीच आहे. डास आणि किटक नाशासाठी उपाय शोधतच धडपडतोय. डास किटक नाशाचे साठी ठराविक वनस्पती लागवड करणे, स्वच्छता वाढवणे, फवारणी आवश्यक आहे.

तर काय याही दिवाळीत कीटकांच्या आकृती करून त्यांचं दहन करा आणि कीटकांचा त्रास होऊ नये अशी प्रार्थना करा.

आपण जय विज्ञान कधी म्हणणार? डासाचा नायनाट कधी करणार?

**

11लग्न आणि व्रत, तुळशी विवाह वगैरे

लग्न होऊन सुयोग्यवेळी सुयोग्य जीवनसाथी मिळावा म्हणून वेगळी वेगळी व्रत केली जातात. संतोषी मातेचे शुक्रवार, 16 सोमवार, मिठी संकष्टी चतुर्थी, रुक्मिणी स्वयंवर पूजा, गुरुचरित्र अध्याय वाचन. तुळशी विवाह अशी वेगळी वेगळी व्रत, विवाह हवा या हेतूने केली जातात.

अजूनही काही कुटुंबांमध्ये तुळशी विवाह खूप थाटात आणि जोरात केला जातो. 'तुळशीबाई तुला, नाक डोळा नाही! ' असा रीतीने कृष्ण तुळशीचे वर्णन केले जाते आणि या तुळशी मातेचा विवाह थेट श्रीकृष्णासारख्या देवरूप वराशी होणं हे एक कौतुकास्पद असतं. घरोघरी विवाहयोग्य तरुण-तरुणींचे विवाह ही एक काळजीची चिंतेची गोष्ट असते.

सावळी वधूवरी गौर वराला, असं म्हटलं तरीही सावळी वधू ही सहसा कोणाला नकोच असते. मध्यंतरीच्या काळात तर काळ अपेक्षा इतक्या बदलल्या की

अंगाने गोरी, हजार गुण चोरी, म्हणायची आली. याच्यापुढेही समाज गेला.

' हातात नोकरी हजार गुण चोरी' असं म्हणून नोकरी करणारी वधू हवी अशी सुद्धा मागणी होऊ लागली.

पूर्वी मध्यस्थां मार्फत परिचितांमार्फत लग्न जुळवलं जायचं. नंतर मध्यस्थ दलाल, अशी मंडळ आली. जातीतली मंडळ लग्न जुळवायचं काम करू लागली. त्यानंतर काही पुस्तक जी पूर्ण तया विवाह मंडळाच्या रूपाने

चालवली जात असत, अशी पुस्तक, नियतकालिके आली. त्या पुस्तकात नाव नोंदणी करून जाहिरात येई आणि त्यानुसार लग्न जुळवले जाई. हल्ली तर काही काही वर्तमानपत्रात रविवारची पुरवणी ही विवाह विषयक जाहिराती साठी असते. वयोमानानुसार, जाती धर्मानुसार, अपेक्षा नुसार वधु पाहिजे वर पाहिजे असे वेगळे वेगळे भाग करून या जाहिराती असतात. ज्या बघून आपल्या उपवर तरुणाला अथवा तरुणीला सुयोग्य अस स्थळ हवं, ते शोधण्याचे कामगिरीला, उपर उपवधुचे निकटचे लोक लागतात. नंतरच्या काळात शादी डॉट कॉम, अनुरूप अशी वेगळी वेगळी ऑनलाईन लग्न जुळवणारी सुद्धा मंडळ आधुनिक रुपात आली. गरज होती, पेड सोय झाली.

पण चांगली गोष्ट तिथे वाईटही येते. त्यामुळे ह्या मंडळांमधून, कधी मधी फसवणूक व्हायला लागली.

त्यानंतरच्या काळात स्त्री गर्भहत्यामुळे मुलींचे प्रमाण एकदम कमी झाल्यामुळे मुलीचं स्थळ दाखवतो या कारणाने सुद्धा फसवणूक होऊ लागली. फक्त स्थळ दाखवलं जायचं आणि पुढे काहीच सांगितलं जायचं नाही. कधी तर वेगळी फसवणूक होई किंवा लग्न झाल्यावर काही दिवसांनी ती तरुणी निघून जायची.

या अशा फसवणूक होतच राहतात. या फसवणुकीवर उपाय काय? जोखीम आहे? उपाय काहीच नाही. चौकशी केली, काहीही केलं तरी शेवटी फसवणूक करणारा तरबेज असेल तर फसवणूक होत राहते. या सर्व प्रश्नांमुळेच माणूस अधिकाधिक देव भोळा होऊ लागला आहे.

पूर्वीच्या काळी तुळशीचे लग्न थाटात करायचे. त्याचा हेतू सांगताना आपल्या मुलांना चांगली बायको मिळावी आणि आपल्या मुलींचा चांगल्या

a

घरी लग्न व्हावं हाच हेतू तुळशी विवाह करण्यात असे. होई आणि बऱ्याच जणांच्या बाबतीत मी असं पाहिले सुद्धा की तुळशी विवाह थाटात करणाऱ्यांच्या घरी तरुणींना चांगले उपवर तरुण मिळाले. धर्म म्हणा श्रद्धा म्हणा भक्ती म्हणा परंपरा म्हणा, पण तुळशी विवाह करून का होईना तरुण तरुणांना सुयोग्य वर मिळू दे, वधू मिळू दे आणि तो विवाह टिकू दे.

तरुण-तरुणींचे विवाह त्यांचे एकटेपण फिटण्यासाठी तरी आवश्यकच असतात. लिव ईन रिलेशनशिप चा कितीही सुळसुळाट झाला, तरी विवाह हा परंपरेने आवश्यकच असतो. त्यामुळे, व्रत्तवैकल्यही चालूच राहतात.

तुळशी विवाहा चा मौसम सध्या आहे. जीवनसाथी प्राप्ती त्या व्रताचं महत्त्व ही या कारणाने आपल्याला समजतं.

**

12पुस्तक संग्रह

माझ्या एका मैत्रिणीकडे मी गेले असता, तिच्या घरी कपाटात भरपूर पुस्तक साठवलेली होती. पण कुलूपलावून बंद होती.

"अर वा! का तुला पटकन काढून वाचता येते. पण कुलूप का? "मी

"लोक वाचायला पुस्तक घेऊन जातात आणि ती परतच करत नाही म्हणून आम्ही हे असं केलं आणि आमचा हा संग्रह खाजगी आहे" ती

मी तिला म्हटलं,

"तू तरी वाचतेस का? "

"मुल किंवा मी कधी कधी वाचते ग! पण ते कपाट उघडून ते वाचायला कंटाळा येतो. माझ्या नवऱ्याला सवय आहे. कुठे प्रदर्शनात वगैरे गेलो ना की पुस्तक विकत आणतो आणि ती पुस्तक घरी आणल्यावर डंप करतो. नंतर वाचू नंतर वाचू करून कपाटात ठेवून देतो. संदर्भ म्हणून कधी काही उपयोग होतो. बाकी हे कपाटात राहणे. "ती

"ऐक. पुस्तक ही वाचण्यासाठी असतात. " मी तिला म्हटलं.

"हो आता तू उद्देश करू नको. मान्य आहे की पुस्तक वाचण्यासाठी असतात पण वेळ नको का मिळायला? "

मी या विषयावर विचार करायला लागल्यावर माझ्या मनात आलं पुस्तक खरेदी करून वाचावी हे ठीक आहे. तरी पण दर पाच वर्षांनी आपल्या पुस्तकाचं कपाट सुद्धा नूतनीकरण करून नवं करावं. जुनी पुस्तक

वाचनालयाला, दूर एखाद्या शाळेला, एखाद्या गरीब संस्थेला दान देऊन टाकावी.

आधुनिक आणि नवीन पुस्तक खरेदी करत जावी. वर्षो न् वर्ष ही पुस्तक कपाटात भरून ठेवणं अथवा रॅकवर धूळ येईपर्यंत साठवून ठेवणं हे काही त्या पुस्तकांचा ध्येय साध्य करणार नाही. पुस्तक ही वाचण्यासाठी असतात. साधारणपणे माणूस एक पुस्तक एकदा वाचतो. काही दिवसांनी परत संदर्भ म्हणून वाचतो फार तर फार आयुष्यात तीन वेळा माणूस संदर्भ ग्रंथ म्हणून एक पुस्तक वाचतो.

अर्थात याला अभ्यासाची पुस्तक संशोधनाची पुस्तक आणि धार्मिक पुस्तकात अपवाद असतात. पण म्हणून त्याच्यासाठी कपाटात हा संग्रह करून ठेवणे आणि इतरांना वाचन सुखापासून वंचित ठेवणं हे योग्य आहे का?

ठीक आहे ज्याला घ्यायची ते विकत घेऊन वाचतील. पण प्रत्येकालाच वाचन करणं यासाठी पुस्तक विकत घेणं शक्य नसतं. हवं ते पुस्तक मिळेल, कुठे मिळेल या पण गोष्टी असतात. त्यामुळे वाचनालय समृद्ध व्हायला हवीत.

पण हे घरचे पुस्तकांचे खजिने आहेत ते पण लोकां साठी साठेदार रसिकांनी मोकळे करून द्यावे.

मध्यंतरी मी वाचनालयात गेलेले असतात खूप जुनी पुस्तके मला वाचायला मिळाली. त्यावर मी त्या मॅडमला विचारलं,

"मॅडम किती ही जुनी पुस्तक? ही कुठून आली? " त्यावर त्यांनी सांगितलं "करोना काळात बऱ्याच घरी जेव्हा अपमृत्यू झाले, तेव्हा हा पुस्तकांचा संग्रह वाचनालयाला दान करण्यात आला. त्याच्यात ही जुनी जुनी पुस्तक आली. सुंदर खजिनाच होता. तो पुस्तकांचा, रसिक वाचकाचा आपला

खाजगी सुंदर खजिनाच होता. पुस्तकांचा आपल्या घरचा ही पुस्तकांचा राखीव खजिना दडवून ठेवू नका. वेळच्या वेळी दान करा. तुम्हाला पाहिजे तर काही दिवसांनी पुस्तक परत खरेदी करा. विनाकारण पुस्तक दडवून ठेवू नका वेळच्यावेळी दान करा. कारण पुस्तक सुद्धा नंतर पिवळी पडतात. पान पत्रट झाली, हलकी झाली की फाटतात.

त्यामुळे पुस्तकाचा वॉर्डरोब पण पाच वर्षांनी रिनोव्हेट करा. आहेत ती पुस्तक महाग असली तरीही दान करा.

पुस्तक ही वाचण्यासाठी असतात शोभेसाठी कपाटात रचून ठेवण्यासाठी नसतात.

माझे विचार ट्रबल मेकर वाटतात व बंडखोर विचार समाजाला साधारणपणे रबल मेकर वाटत असतात. पण मी असे अजिबात म्हणत नाही की पुस्तक खरेदी करू नका. तर खरेदी करत जा पण ती पाच पाच वर्षांनी नवनवीन खरेदी करत जा आणि जुना खजिना हा इतर वाचकांना उपलब्ध करून द्या. इंटरनेटवर भरपूर पुस्तक वाचायला मिळतात. प्रत्यक्ष पुस्तक विक्री पण जोरात असते. पुस्तक वाचनासाठी उपलब्ध करून द्या असं मला सांगायचं आहे. केवळ शोभेसाठी पुस्तक ठेवू नका हा संदेश मला वाटतं पुस्तक सुद्धा माणसाला देत असतात.

a

13 जवळपासचे

जवळपास या शब्दात आपुलकी असते. internet ने, जग हे ग्लोबल व्हिलेज झाले आहे. त्यामुळे कुठूनही कुठेही फिरता येत, तर खरेदी करायला वस्तू सुद्धा ऑनलाईन अगदी काश्मीर ते कन्याकुमारी पासून न्युझीलँड ते अमेरिका पर्यंत कुठूनही ऑर्डर करून मागवता येतात. पण तरीही माणसाला थोड्या जवळपासच्या वस्तूंचा आकर्षण असतं. सहल म्हणून चेंज म्हणून बद्दल म्हणून दूरवरच्या मॉलमध्ये एखाद्या दिवशी जायला मजा वाटते, पण सामान्यत माणूस जवळपासचे किराणा दुकान, सुपर मार्केट, मॉल, चित्रपटाचे चित्रपट गृह, नाटकाचं नाट्यगृह, जवळपासची मैत्रीण, खादाडी गृह यांच्या सहवासात अधिक सहज सुलभतेने वावरतो.

वैज्ञानिकांनी याबद्दल अभ्यास करायचा प्रयत्न केला असता, त्यांना या निवडीचं कार्य, कारण, नीटपणे समजलं नाही. खरंतर दुरून डोंगर साजरे, अशा रीतीने दूरवरच्या गोष्टींचे आकर्षण माणसाला नेहमीच असते. पण मैत्री करताना गप्पा मारायला जाताना सहज दुपारी गप्पा मारण्यासाठी बसायला जाताना सहलीसाठी सोबत अशा जेव्हा व्यक्ती हव्या असतात, तेव्हा माणूस जवळपास त्याच प्रभागातील परिसरातील माणसं शोधायचा प्रयत्न करतो. खरं तर तुम्ही अमेरिकेत टुरला जाणार तर तुमच्यासोबत दिल्लीची व्यक्ती असली पाहिजे काय, कलकत्त्याची असली काय आणि शेजारची असली काय, काय फरक पडतो. पण तरी तुम्ही विचार करा शेजारची किंवा आपल्या नात्यातली कोणी व्यक्ती आपल्या सोबत असेल तर आपण त्याला अधिक प्राथमिकता देतो. जवळपासच्या माणसांच्या बद्दल आकर्षण असायचं कारणा बद्दल

अभ्यास केला तर पृथ्वी तत्वाच्या आणि चुंबकीय आकर्षणाच्या नियमाचा वापर करता येऊ शकतो. म्हणजे जवळपासच्या काही भागात आकर्षण, चुंबकीय आकर्षण हे जास्ती असतं. त्यामुळे माणूस मैत्रिणी आणि सहवासातल्या व्यक्ती सुद्धा आपल्या जवळपासच्या शोभतो. शाळा कॉलेजला जाताना पूर्वी सोबत घेऊन जाणे हा प्रकार असायचा. हल्ली तसे शक्य नसतं पण ही सोबत सुद्धा नेहमी जवळपास राहणाऱ्या व्यक्तींची शोधली जाते.

A road to your friends house is never longअसं म्हटलं जातं पण तरीही लांब वर जायच्या वेळी माणसाला वाहन हवं. जरा बऱ्यापैकी तयार व्हायला हवं. काहीतरी हातात खाऊ, भेट, वजन घेऊन जायला हवे किंवा काहीतरी इतक्या दूर जाण्यासाठी संयुक्तिक कारण हवं. पैसा खर्च करायची दानत हवी. त्यामुळे जवळपासच्या ठिकाणी साधेसुधे कपडे घालून गेले तरी चालतं. भेट म्हणून साधी वस्तू हातात नेली तरी चालते. वाचनालयात किंवा दूध आणायला जाता जाता, येताना सुद्धा आपण या जवळपास राहणाऱ्या व्यक्तीच्या दारावर टकटक करून, हॅलो हाय करून परत येऊ शकतो. जवळपासच्या मैत्रीत असे फायदे आहेत.

जवळपासच्याच व्यक्तींमध्ये वावरण्यात तोटे सुद्धा आहेत. पहिला तोटा म्हणजे कूप मंडूक वृत्ती तयार होते. प्रगतीचे मार्ग खुंटतात. स्वायत्तता स्वयंपूर्णता निर्माण होऊन आपल्यातले आपले असे स्वतंत्र बेट निर्माण होते. ज्यामुळे विचारावर मर्यादा येतात. जाळी म्हणजे जवळच्या व्यक्तींचं नेटवर्क, या शब्दापासूनच जवळी हा शब्द आला असावा. पण या जाळीत पण माणूस आणि विचार अडकून पडले तर कधी कधी प्रगती होत नाही. तर कधी कधी या जाळीत अडकल्यावर त्या गुंतागुंतीचा त्रास सुद्धा होतो. जवळपासच्या

नेटवर्किंगचा हा एक तोटा आहे. जवळपासच्या मैत्रीतला एक मोठा तोटा म्हणजे अति परिचयात अवज्ञा होऊ शकते.

सांगो वांग ऐकिव, ओळखीतून मिळालेली अशी माहिती जवळपासच्या व्यक्तींबद्दल मिळत असते. त्यामुळे धोकेही ज्ञात असतात. दूरवरच्या ठिकाणाचे धोके अज्ञात असतात. जवळपासच्या ठिकाणी खरेदी अथवा व्यवहारात फसवणूक झाली तर, आपण बदलण्यासाठी किंवा अन्य कारणासाठी भेट देऊ शकतो. वारंवार जाऊ शकतो. पण दूरवर जाण्यात वेळ जातो. ते त्रासदायक ठरू शकते. डॉक्टर अथवा वैद्य सुद्धा म्हणूनच जवळपास आपल्या परिसरातलाच शोधला जातो. जेणेकरून दुखत असताना आपण सहजपणे त्यांच्याशी संपर्क साधू शकतो. फॅमिली डॉक्टर ही संकल्पना सुद्धा आपल्या आसपासच्या जवळपासच्या डॉक्टरशी संपर्क साधणे या संकल्पनेतूनच आली. सहवासातला मैत्रीतला परिचयातला गप्पांमधला निर्मळ आनंद पण घ्यायलाच हवा पण अति झालं की मग नंतर वाद होतात. त्याच्यापेक्षा सुरू सुरुवातीला मैत्री करतानाच थोड्या अंतराने आणि थोड्या पथ्यांनी वागावे. अर्थात ते सोपं नसतं. माणूस एकदा मैत्री झाली, की प्रवाहपतीत होऊन जातो. जवळचे पैस भर अंतरावरचे आपल्या परिसरातले लोक आपल्याला अधिक जवळचे वाटतात.

जवळपास मला काय सांगायचे ते समजून घ्यायला हरकत नाही.

**

14 पालखी

पूर्वी राजे महाराजांना काही कामानिमित्त बाहेर जायच्या वेळी, अथवा शुभ कारणावर वधूला विवाहाच्या वेळी सजवलेल्या पालखीतून आणत. थाटामाटाने वरात निघे, नंतर पालखीला पुढे पुढे डोली असं नाव पडलं. पालखीला झिरझिरीत झगमगते पडदे व फुलांच्या माळाने सजवले जाई. दोन भोई खांद्यावर पालखी नेत. दंडी कंडी कावड या सर्व गोष्टी स्थलांतराची साधन असत. पालखीला सोबत अंगरक्षक, मशाल धरणारे, एखादा नोकर असा लवाजमा असे. चाकाचा शोध लागण्यापूर्वी चालत किंवा घोड्यावर प्रवासकेले जात असत. पालखीचे भोई बदलून नव्या दमाचे गडी घेऊन दिवसाला शंभर ते 200 किलोमीटरच अंतर या पालखीतून प्रवास करणारे प्रवासी पार पाडत असत. डोंगरदऱ्याने आड वाटेने जाताना दरोडेखोर पालखीतून जाणाऱ्या माणसांचे सोने नाणे चीज वस्तू लुटून नेत असत. रात्री तर ती पालखी घेऊन अंधारात जनावराची भीती असे. म्हणून दिवसा वाटचाल केली जाई. सायंकाळी शक्यतो पालखी खाली ठेवत आणि विश्रांती घेऊन तंबूमध्ये राहून पहाटे पुन्हा मार्ग अनुसरला जाई. आजही मंदिरात चित्रांमध्ये वाद्य वाजवत पालखी चाललेली आहे असे चित्र असते. राजे महाराजांची उत्तम कलाकुसर केलेली पालखी राजस्थानात बघायला मिळते. पालखी हे घराण्याचे सन्मानचिन्ह मानत असत.

पवित्र पापी चित्रपटाच्या वेळी तेरी दुनिया से होके मजबूर चला या गाण्याच्या चित्रीकरणाच्या वेळी गावात दिग्दर्शकाने पालखीचा शोध घेतला. त्यावेळी तेथील गावात एका वृद्धेकडे अशी पारंपरिक शिषम ची पालखी असल्याचे त्याला समजले. घराण्याच्या समृद्धीची साक्ष अशी ही नक्षीदार आणि अतिशय वेगळी पालखी होती.

a

“आम्हाला चित्रीकरणापूर्ती पालखी द्या आम्ही पैसे देऊ. ” अशी विनंती दिग्दर्शकांनी केली. मात्र तिने ती विनंती नाकारली. ती वृद्धा म्हणाली,

“या पालखीत राजघराण्यातील राणी महाराणी बसल्या. मी ती पालखी नटीला कशी देऊ? ”

मग त्या पालखीचा फोटो काढून तशीच, दुसरी, एक कृत्रिम मेणा बनवून चित्रीकरण पार पडले. पण या नव्या पालखीची सर त्या जुन्या पालखीला नाही ही खंत दिग्दर्शकाने एका मुलाखतीत व्यक्त केली. कारण त्या मूळ पालखीला परंपरा होती, वारसा होता. पालखीतून मिरवणूक हा एक सन्मान सोहळा असतो. पालखीत संस्कृतीचा सुगंध असतो. अशा पालखीतून वाजत गाजत आनंद यात्रा निघावी असे स्वप्न प्रत्येक राज्यघराण्यातील, श्रीमंतांचे असते. पालखी हा आठवणींचा खजिना वाहते.

ग्रामीण भागात अजिबात सुविधा नसताना अशा पालखी अथवा डोली मधून किंवा लाकडी झोळी बाळंतिणीला दवाखान्यात नेलं जातं पालखीचा असाही उपयोग होतो.

भारतीय संस्कृतीची दिंडी अशीच एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाते आहे. नव्या दमाचे भोई पालखीला लाभत आहेत. देवाधिकांच्या मंदिरात देवीची पालखी असते. खंडोबाची पालखी असते. काही काही संतांच्या पादुका पालखीतून भक्तांच्या दर्शनासाठी गावोगावी फिरवल्या जातात. साईबाबांची पालखी म्हणून गावोगावाहून साईला भेटीस जाण्यासाठी भक्त फोटो ठेवून पालखी आणतो. भक्ती येते. संतांच्या पालखीतून श्रद्धेचा अखंड स्त्रोत पुढे जातो आहे. उद आणि धुपाचा फुलांचा सुगंध मागे रेंगाळतो आहे. आपण सगळेच ही संस्कृतीची पालखी वाहत पुढे जाऊया. तिचं रक्षण करूया.

15छोटीशी भेग? छोटीशी भेग

एक खूप सुंदर अशी भिंत होती आणि त्याला एका कोपऱ्यात अगदी सहा इंचाची एक छोटीशी भेग होती. त्या भिंतीवर वेगळ्या वेगळ्या प्रकारची रंगीत चित्र काढली होती. सुंदर वेली चढवल्या होत्या. पण माणसांचे लक्ष त्या भेगेकडे जायचं. तसेच मानवी मन पण असतं जे सगळं चांगलं आहे ना, तरी त्याच्यात जी गोष्ट चांगली नाही त्याच्याकडे लक्ष जातं.

दादरला एका सुंदर सोसायटीच्या बाजूला पडकी अशी एक चाळ वजा खोली होती. इतके सुंदर सोसायटीच्या भोवती त्या खोलीमुळे शो जायचा. हे का बरं? बाजूचे आणि सगळे यानी पुनर्विकासाला होकार दिला. त्या चाळ वाक्यातील त्या एका बाईंनी दिला नाही. त्यामुळे ती खोली पाडु शकले नाही आणि इतक्या सुंदर बिल्डींग ला गाल बोट लावायचं काम ती छोटीशी चाळीतली खोली करत असे. एका महाला भोवती(मुघल राज्याच्या) एक भडभूंजन म्हणजे लाह्या शेंगदाणे फुटाणे बनवण्याची भट्टी चालवणाऱ्या म्हातारीची खोली होती. राजानी तिला पुष्कळ वेळा मनवलं की मला ती जागा हवी, तू अन्यत्र जा. तुला जागा देतो, तू जा. तुमचा मी राजा आहे, विनंती करतो. पण ती कधीच गेली नाही. त्या भडगुंजन ची खोली ही त्या सुंदर महालाला गालबोट लावत राहिली.

सुंदर स्विमिंग पूल असतो पण कोपऱ्यातल्या दोन-चार टाइल्स निघालेल्या असतात. लक्ष तिकडे जाते.

एक कथा ऐका. शिक्षक विद्यार्थ्यांना निबंध लिहीण्यासाठी कार्यपाठ देतात.

"मी तुम्हाला आता एक चित्र देणारे त्याच्यावर निबंध लिहा. " असं सांगतात. तो एक पांढरा कागद असतो, त्याच्यावर फक्त काळा ठिपका असतो. सर्वजण काळा ठिपक्याबद्दल लिहितात. पांढऱ्या कागदाबद्दल कोणीच लिहीत नाही. आपल्या आयुष्यात कृतज्ञ राहाव अशा खूप चांगल्या गोष्टी पण असतात पण आपण त्या काळ्या छोट्याशा टिपक्यावर लक देतो. आपण जास्ती मन कॉन्सन्ट्रेट करतो आणि जीवनाचा आनंद हरवून बसतो.

Black dot should be neglected

आयुष्याच्या उतार वयातच हे ब्लॅक डॉट्स मिळतात आणि जास्ती हैराण करतात. अशा वेळी आयुष्याचा आत्तापर्यंतचा पांढरा जीवनपट बघावा आणि ह्या काळ्या ठिपक्याकडे दुर्लक्ष करायचा प्रयत्न करावा.

सोप्प नसतं प्रयत्न करून बघा. बाकीच्या सुंदरतेपेक्षा, आतील निघालेल्या टाइल्स कडे लक्ष जातं. माणसांची वृत्ती सगळं छान आहे हो पण हे नाही, अशीच बोलायची असते.

म्हणजे थोडक्यात लॉ ऑफ मिसिंग टाइल्स असं या वृत्तीचं नाव आहे. म्हणजे जे नाही त्याच्याकडे माणूस बघत राहतो. काही जणांना तर अशी दुसऱ्याची काही कुठे कमतरता उणीव दिसते का? त्याबद्दल वारंवार बोलायला आवडतं.

काय ग आमच्या अमक्याला मूल नाही, काय ग अजून घर घेतलं नाही? काय ग घरातच बसून राहतेस? काय ग कसं तुझं घर जुन आहे? असं करून करून माणसाच्या कडे जे नाही त्याबद्दल वारंवार टोमणे घालायची सवय माणसांना असते.

छोटीशी भेग, उणीव गाल बोट ठरू शकते.

16ज्याचा त्याचा वेग

प्रत्येक व्यक्तीचा आपला, ज्याचा त्याचा स्वतंत्र, असा वैशिष्ट्यपूर्ण वेग, स्पीड असतो. ससा आणि कासवाच्या गोष्टीत ससा जोरात पळतो म्हणून आपण कौतुक करतो. कासव मागे हळूहळू चालतं म्हणून हसतो. गोगलगायीची तर नेहमीच टर उडवली जाते. पण परमेश्वराने प्रत्येकाला आपला स्वतःचा एक वेग दिलेला आहे.

स्वयंपाक करताना आई सकाळी लवकर उठून बराच वेळ हळूहळू स्वयंपाक करते. त्यामानाने पुढच्या पिढीत कुकरमध्ये पदार्थ लावून पटकन स्वयंपाक होतो. मुलं काही वेळा म्हणतात,

"किती वेळ लागतो तुला आई? किती वेळ लागतो तुला! "

पण आई ती पूर्ण त्या पाककृतीची पद्धत पाळते आणि तसा स्वयंपाक करते. म्हणूनच चुलीवरच्या स्वयंपाकाला वेगळी चव असते. दम पुक्त म्हणून हळूहळू बनवलेल्या बिर्याणीला वेगळी चव असते.

घाईघाईत उरकलेली गोष्ट आणि हळूहळू केलेली गोष्ट या दोन्हीमध्ये गुणवत्तेत पण फरक असतो, असू शकतो. निदान असतो असं नाही. कारण प्रत्येकाचा आपापली गती असल्यामुळे ती व्यक्ती तेच काम जलद करू शकते अथवा दुसरी व्यक्ती तेच काम हळूहळू करू शकते.

आजारी पडण्याची प्रत्येक व्यक्तीची गती असते. कुणामध्ये लक्षण पटकन दिसतात कोणात ती उशिराने दिसतात. करोना काळात आपण हे

अनुभवलं. तसंच आजारपणातून बरं होण्याची पण प्रत्येक व्यक्तीच्या शरीराची आपापली गती असते आणि ती निरनिराळी असते.

नातेसंबंधात गुंतण्याची प्रत्येकाची वेगळी गती असते आणि त्या नाते कम बंधातून बाहेर आल्यावर त्या दुःखातून सावरण्याची पण प्रत्येक व्यक्तीची गती ही निरनिराळी असू शकते. एखादी व्यक्ती एखाद्या धक्क्यामधून लवकर सावरते, दुसरीला सावरायला वेळ लागू शकतो. हे प्रत्येकाच्या भावनिक गतीवर अवलंबून असतं.

मला आठवतं एका पूजेच्या ठिकाणी मला खूप डाळिंब सोलायला दिली होती. मी पंधरा मिनिटात ती डाळिंब सोलून, दाणे तिच्यासमोर घेऊन गेले. ती बाई चकितच झाली. म्हणाली,

"मला वाटलेलं तू तीन चार तास तरी याच्यात घालवशील. "

नंतर तिने मला खोबरा किसायला दिल पण किसून मी भराभरा होऊन गेलं. माझं तिला खूप नवल वाटलं. तसा प्रत्येकाचा स्पीड असतो. अर्थात हा स्पीड वयोमानानुसार बदलत जातो.

हलद्वारा मी डॉक्टर कडे गेल्यावर नेहमी तक्रार करते की मला हल्ली पूर्वीसारखी गतीच येत नाही. चालताना पण मी हळूहळू चालते. काम करताना हळूहळू करते. काळ काम वेग ही गणित वेगळी असतात. वयोमानानुसार ती बदलत जाते

. गतीची ओढ माणसाला नेहमीच असते म्हणून तर पाठीवर बघून नेणाऱ्या भोया नंतर, पालखी, नंतर बैलगाडी, घोडा गाडी, छकडा, टांगा, सायकल मोटरसायकल, मोटार, रेल्वे गाडी. विमान, रॉकेट अशी अधिक वेगवान प्रवास साधने शोधली. जलद वाहनांकडे माणसाने प्रगती केली.

a

स्वयंपाक करताना सुद्धा अग्नीचा प्रमाण, पूर्वी मंद असायचे. आता ते अग्नीचे प्रमाण फास्ट व्हावं, स्वयंपाक जलद व्हावे म्हणून शोध लावले. चूल, शेगडी, गॅस वर चालणार्या स्वयंपाकाच्या शेगड्या, ओव्हन, मायक्रोवेव्ह अशी जलद गतीने काम करणाऱ्या उष्णता देणाऱ्या पदार्थ शिजवणाऱ्या उपकरणांची सोय झाली.

पूर्वी ऑपरेशन सुद्धा तीन तीन तास चार चार तास चालायचे. आता लेसर रेज ने चालणारी ऑपरेशन, रोबोटिक सर्जरीने चालणारी ऑपरेशन, आपोआप विरघळून जाणारे टाके, आधुनिक यंत्रणेच्या मदतीने केली जाणारी शल्य क्रिया अशी गति वाढत गेली आणि लागणारा वेळ कमी कमी होत गेला. प्रत्येकाची आपली गती असते आणि ती खास असते.

**

a

17 भित्रा ससा

भित्रे सशाची गोष्ट सगळ्यांनाच माहिती आहे. ज्यात ससा एकदा झाडाखाली उभा असताना डोक्यावर पान पडतं. तो वर बघतो त्याला निळा आकाश दिसतं. तो सगळीकडे सांगत सुटतो आकाश कोसळले पळा पळा! ससा आणि सगळेच पळायला लागतात. साधारणतः अशी सशाची मनोवृत्ती काही जणांमध्ये आढळते. अनामिक भीतीने ही माणसं नेहमी घाबरत राहतात. भित्या पोटी ब्रह्मराक्षस असं म्हटलं जातं. त्यामुळे त्यांना घाबरवणारी लोक सुद्धा या संधीचा फायदा घेतात.

उदाहरणार्थ आजारी पडल्यावर घाबरवतात. टोमणे मारतात, गोळ्यासारखे तू बिछान्यात पडशील. उपयोग काय अशा आयुष्याचा? असं बोलणारे भेटतात आणि मग विचारी भित्र्या लोकांच्या मागे हा ब्रह्मराक्षस लागतो. भित्रुड खथरूड असे म्हणणारे असतात. अर्थात हीच माणसं त्यांच्यावर वाईट वेळ आल्यावर महाभित्र्यासारखी वागतात. पण दुसऱ्याचं पर दुःख शितल असतं. त्याप्रमाणे भित्र्या माणसाच्या प्रश्नाकडे नेहमीच दुर्लक्ष केलं जातं. ती मानसिकता असते. भीती ही एक नैसर्गिक प्रतिक्रिया असते.

माणूस जंगलात राहत असताना समोर वाघ दिसल्यावर त्याच्या शरीरात भीती निर्माण व्हायची. वाघ आपल्याला खाईल. काही करुन आपण पळायला हवं. पुढे पुढे वाघाची भीती नाही राहिली. साप जनावर, सिंहाची, जंगली प्राण्यांची भीती नाही राहिली तरी अनाम संकटांची, आजार नैसर्गिक संकटांची, ऑफिसमध्ये त्रास देणाऱ्या लोकांची, कौटुंबिक त्रासदायक व्यक्तींची भीती वाटून माणूस तसाच घाबरत राह्यला. दडपण सोसत होया जसा

तो गुहेत राहत असताना, शिकारी दरम्यान वाघाला घाबरत होता. त्यावेळी पळून जाणं शक्य होतं तेव्हा तो पळून गेला. जेव्हा पळून जाणं शक्य नव्हतं तेव्हा त्याच्या शरीरात वेगवेगळे बदल होत राहिले आणि तो विविध आजारांना बळी पडला. शरीरात वेगवेगळे ताणजन्य आजार निर्माण होतात. भीती वाटली तर त्यात अनैसर्गिक काहीच नसतं. उलट मनातली भीती दडवून आपण फार शूर आहोत असा शौर्याचा प्रदर्शन चूक असते. आव्हानं सोसणे जास्तीत जास्त, ताणदायक ठरू शकते.

भित्रा ससा असू नये पण भीती वाटत असेल तर त्यात लपवायचं आणि लाज वाटायचं काहीच कारण नाही.

**

18आईने शिक्षा केली

वडिलांनी आजी-आजोबांनी कोणी शिक्षा केली तर आपण ते समजून घेतो. पुरुष माणूस कठोर असतात समजून आणि वडील रागावले काहीतरी शिक्षा केली बाहेर उभे केलं, काहीतरी काम दिले, फेऱ्या मारायला लावल्या कुठेतरी दरवाज्याच्या बाहेर थोडा वेळ उभं केलं तर चालते. मारणे, कान पिरगळणे त्या शिक्षा पुरुष करत असतात.

अमृता प्रीतम यांच्या बंद दरवाजा कादंबरी वर आधारित चित्रपट आणि त्यामुळे आपल्याला माहिती आहे की अशा शिक्षा पुरुष माणसांद्वारे केल्या जातात. पण आईने मात्र शिक्षा केली की

"किती कठोर बाई आई मुलं काय चुकत नाही का माफ करायला नको का? " असं म्हटलं जातं. पण मूल जर बिघडलं तर 'आईने वळण नाही लावलं' म्हणून आईवरच दोष येतो. म्हणून प्रसंगी आई कठोर शिक्षा करत असते.

एकूणच महिला या मुलांची जबाबदारी पूर्णपणे त्यांच्याच डोक्यावर टाकल्यामुळे गांजलेल्या असतात. स्वयंपाक पाणी आवर सावर, घर संस्कार, सणवार नातेवाईक, वर आता तू शिकलेली आहे म्हणून बाहेरची काम, अर्थ व्यवहार स्वच्छता, नाव ठेवणं हे सगळ्यांमुळे महिला थोड्या ओव्हरवर्कड च असतात. त्यामुळे राग आणि संताप व्यक्त होतो. राग करायला, तो पति वर करता येतोच असं नाही. त्यामुळे त्या मुलांवर राग काढतात आणि मुलांना शिक्षा करतात. मात्र आपल्या अपत्याला आईनी शिक्षा करू नये याबद्दलचं अपराधी भाव तिच्या मनात पुरेपूर भरवला जातो.

याबाबत मला तीन कथा नेहमी आठवतात.

पहिल्या कथेचे नाव होतं छत्री!

सहा-सात वर्षाचा मुलगा असतो. घरी गरीबी असते. पण आई कायम मुलाला पावसात छत्री देत असते आणि पोरगा, लहान गमराटपण यामध्ये गप्पांमध्ये पडल्यामुळे ती छत्री विसरुन येत असतो. पावसाळ्यात एक छत्री खरेदी करण्याची मारामार असते. दुसरी छत्री कुठून आणणार? म्हणून आई मुलाला नेहमी रागवत असते. आता परत मी तुला छत्री घेऊन देणार नाही. आज छत्री हरवुन आलाच तर याद राख. मुलगा शाळेत जातो. शाळेतून येताना एक ओढा ओलांडायचा असतो. त्या ठिकाणी ओढा जोरात असतो. ओढा ओलांडताना पाण्याच्या प्रवाहाच्या जोरामुळे त्याच्या हातात ती छत्री पाण्यात पडते आणि पाण्याबरोबर ती छत्री वाहून जाऊ लागते. त्या बालकाला आईचे डोळे वटारुन रागावून ओरडणे आठवतं.

"छत्री सोबत नसेल तर घरी येऊ नकोस. खबरदार छत्री न घेता घरी आलास तर आणि तो त्या ओढ्यामध्ये ती छत्री पकडायला जातो. छत्री पुढे जाते, तो पुढे जातो आणि वाहून जातो. छत्री पकडतो पण वाहून गेलेला असतो. म्हणजे आईनी मुलावर अशी सक्ती करू नये म्हणून कदाचित ही कथा त्या काळात आमची आजीने आम्हाला सांगितले असेल.

दुसरी कथा होती ती अशीच होती. त्या कथेचं नाव होतं वाघ! मूल आईला अतिशय त्रास देत असतं. घरात खायला प्यायला नसतं. पूर्वीच्या काळी खरंच अस असायचं. अतिशय गरिबी असायची आणि खायला सुद्धा मिळायचं नाही आणि म्हणून मूल त्रास देत असल्यामुळे आई त्याला रात्री दरवाजा बाहेर उभा करत म्हणते

"याच्यापुढे कधीही खाण्यावरून भांडायचं नाही. जे पानात वाढेल मी ते मुकाट खायचं. पकवान आणायला तुझा बाप काय बॅरिस्टर आहे का? "

आणि त्या मुलाला दरवाज्याच्या बाहेर उभा करते. रात्र चढू लागते. आईला अपराधी वाटत असतं पण आईला वाटतं की नाही आज आपण ह्याला धडा शिकवला ना की महागाईच्या दिवसात नंतर आपल्याला त्रास देणार नाही. पुढील आयुष्यात पण त्याला ते उपयोगी पडेल. हॉस्टेलवर राहावं लागतं कुठं नातेवाईकाकडे राहावे लागते, शिक्षणासाठी राहावं लागतं त्यामुळे ही शिस्त त्याला लावायलाच हवी. रात्र होते. मुल ओरडू लागते,

"आई आई दार उघड आई दार उघड. काय आहे ते सांगता येत नाही. आई समोर काहीतरी आहे. आई दार उघड. आई समोर काहीतरी आहे. "

रात्र चढू लागते आईला अपराधी वाटत असतं. पण आईला वाटतं की नाही आज आपण ह्याला धडा शिकवला ना की हा नंतर आपल्याला त्रास देणार नाही आणि पुढील आयुष्यात पण त्याला ते उपयोगी पडेल. हॉस्टेलवर राहावं लागतं कुठं नातेवाईकाकडे राहावे लागते शिक्षणासाठी राहावं लागतं त्यामुळे ही शिस्त त्याला लावायलाच हवी. मग हा नंतर आपल्याला त्रास देणार नाही आणि पुढील आयुष्यात पण त्याला ते उपयोगी पडेल. हॉस्टेलवर राहावं लागतं कुठं नातेवाईकाकडे राहावे लागते शिक्षणासाठी राहावं लागतं त्यामुळे ही शिस्त त्याला लावायलाच हवी रात्र होते मुल ओरडू लागते आई लक्ष देत नाही.

"नाटक करू नको मला माहितीये तू मला असा फसवून तुला घरात यायचंय आणि परत उद्या तू मला त्रास द्यायला सुरुवात करशील. "

a

मुलगा वारंवार सांगत असतो आई दार उघड दार उघड पण आई कठोर पण दाखवून दार उघडत नाही. थकलेली माऊली थोड्यावेळाने तिला झोप पण लागून जाते. पहाटे पहाटे तिला जाग येते. आठवते अरे असं घडलं होतं आणि महीला एकदम हादरून जाते.

ती आपल्या मुलाच्या मायेमुळे दार उघडते. बाहेर वाघानेअर्धवट कुरतडलेलं मुलाचं प्रेत समोर असतं. आई हंबरडा फोडते आणि म्हणते,

"अरे तुला तर वाघ सांगता येईना रे पण मला तरी कळायला पाहिजे होतं की जंगलातल्या वस्तीतला आपलं खेड्यातलं घर, तू घाबरला. अशी मला क्षमा कर रे. मला क्षमा कर! "

कथा 3मोबाईल

पुढची एक घटना आमच्या परिचयात घडलेली आहे. घरी खायची मारामारी असते पण पोरांना अशी मोठी मोठी स्वप्न का पडतात मला हा मोठा प्रश्न पडतो. मित्र मैत्रिणी भारी भारी मोबाईल घेतात चांगले कपडे घालतात म्हणून मुलांना असं वाटतं की आपल्याला पण आईने भारी कपडे घेऊन द्यावे. पैशाची सोय आई कशी करते हे आईलाच माहिती असतं. मुलगी रुसली. दसऱ्याला मोबाईल हवा होता, मोबाईल घेऊन दिला नाही म्हणून ओढणीने गळफास लावून आत्महत्या केली.

कुठल्या आईला असं वाटतं की आपल्या मुलांची हौस भागू नये? मुलांनी ती अगतिकता समजून घ्यायला काय हरकत आहे? मित्र-मैत्रिणींमध्ये आपल्या श्रीमंतीचा प्रदर्शन करणारे लोक इतरांच्या मनावर किती परिणाम करतात याचा विचार सुद्धा करायला हवा ना!

a

आई आणि मुलाचं नातं हे असं असतं शिस्त लावायला जावं तरी त्रास आणि शिस्त नाही लावली तरी त्रास! आई कधीच अशी इच्छा करत नसते की मुलाचं वाईट व्हावं. आई आपल्या आशीर्वादाने आपल्या संस्कारांनी मुलाला पोसतच असते. आईने शिक्षा केली म्हणून आईचा राग राग करण्यापेक्षा, स्वतःला सुधारण्याकडे, समजून घेण्याकडे अपत्यांनी कल ठेवावा.

***

19गावंढळ

गावाकडचा माणूस आहे असं म्हटलं तर शिवी वाटत नाही पण गावंढळ माणूस आहे असं म्हटलं की त्या कथित व्यक्तीचा अपमान केल्यासारखं वाटतं. खरं सांगायचं तर किंवा, ऐकलं तर गावाकडची माणसं खूप साधी असतात. हल्लीच्या दिवसात कोण कोणाला नमस्कार तरी करते का? त्यांनी नमस्कार आधी करू दे मग मी करेन. मी का करू आधी? असं म्हणून एकमेकांची तेवढा सुद्धा संवाद साधला जात नाही. गावाकडचे लोक, "या या बसा चहा घ्या पाणी घ्या दुपारी या गप्पा मारायला बोलत जा, कधीतरी फोन करत जा" असं सांगतात. गझाली करणारी मंडळी, माणसं सुद्धा दुर्मिळच झाली तर आहेत. खरंतर या भेटायला असं म्हणण्यात सुद्धा किती आनंद गोडवा सामावलेला असतो. ते एकाकी, कंटाळलेली एकट माणसांना कळवू शकतो. दुःखाला सुखाला माणसं आली तरी मनातला एकटेपणा तसाच राहिलेला असतो. तो जर असे दुपारी बसायला या म्हटलं, थोड्या वेळ मनातली मळमळ व्यक्त केली, गप्पा मारल्या की ताण कमी होतो.

शहरी वातावरणात जर गावंढळ कुणी आलं तर त्याच्या चेहऱ्यावरच्या, कमी मेकअप वरून, एक प्रकारच्या रापा वरून आणि फारशा भारी नसलेल्या अति पॉश नसलेल्या कपड्यांवरून माणसे लगेच ओळखतात. काय की हा गावंढळ आहे आणि त्याला /तिला गाव की गोरी शेतकरी, गावठी असं चिडवू लागतात.

पण खरं तर गावची लोक मनाने पार निर्मळ असतात. गावकी भाऊबंद ती भांडणं, अहित शहरात पण तर असतातच. पण गावात जिते जागत

वातावरणामुळे बरे वाटत असतं. भांडणे असतात, वाद प्रेमभंग असतात, पण शहरात एक अलिप्तता असते.

गावाकडची माती म्हटलं की शहरी माणसं मनात जरा हा मूर्ख असं म्हणतात. गावठी भाज्यांना चव असते, हवा चांगली असते वगैरे म्हणतात. या गावात सगळ्या लोकांना खूप भरभरून बोलायला आवडतं. गप्पांचे फड रंगतात. कुठलाही विषय असेल, पोटात खायला नसलं, तरी चालेल, पण चर्चा मात्र जोरजोरात करतात. या सर्व कहाण्या गोष्टी म्हणजे मिठाया, आंबट तिखट गोळ्या होत्या. कुरकुरीत भजी होती. शनिवारच्या वारी न कर्त्या वाराला मारुतीच्या देवळाच्या पारावर सर्व बायका पुरुष गावी गप्पा करत बसायचे. त्या शनिवारच्या गप्पांचं आकर्षण असल्यामुळे मारुतीचे भयानक असे वाटणारे दृश्य सुद्धा सुसह्य वाटे. ते मारुतीचे मंदिर आणि त्याच्या मागची ती अंधारलेली गुरुवाची खोली याबद्दल एक कुतुहल जाणवे. देवळातून रात्री परत यायला उशीर झाला, तर असू दे रविवारी शाळेत जायचं नाहीये, चालतो थोडा उशीर अस आई म्हणत असे. नवऱ्याला ऑफिस नाही म्हणून बायका तिथे गप्पा मारत बसत असत. मुला बाळांना रविवारी काय गोडधोड करायचं इतर काम काय करायची ह्या चर्चा त्या मारुतीने कित्येक वेळा ऐकले असतील. कणकेचे चढते उतरते दिवे, माफक अस तेल टाकून देवाला दाखवून अगदी थोड्या वेळ पेटवून भक्त परत जात असत. अशी गावातली अनेक देऊळ आणि त्यांच्या अनेक कथा मनात रुतून बसलेले असतात आणि त्या कथांच्या मालिकेतूनच आपण अधिकाधिक गावंढळ बनलेलो आहोत असं मला जाणवतं.

काही कारणाने मुलांपासून दूर राहण्याचा पर्याय माणसांनी स्वीकारला. कुटुंबांनी स्वीकारला. नोकऱ्या मिळत नाही म्हणून, अन्य कारणाने, घर लहान

म्हणून नोकरीवर जायला लांब पडते म्हणून वाद होतात म्हणून अन्य अनेक कारणांमुळे असेल, पण मुलांपासून आई-वडील दूर राहतात. तसे असले तरी तिन्ही सांजेला लतादीदींच्या आवाजातलं या चिमण्यांनो परत फिरा रे, गाणे, ते वाक्य ऐकलं की, शहरी गावंढळ सर्वांचे डोळे भरून येतात. ते गाणं मनात रेंगाळत राहतो.

गावंढळ लोकांना अशी स्वार्थासाठी तडजोड करायची सवय नसल्यामुळे गावंढळ माणसं मुलांच्या विरहात झुरत राहतात. जुन्या आठवणी काढत राहतात. स्वीकारलेली तडजोड सुद्धा अशा वेळी अंगावर येत राहते.

गावंढळ असणं हे शहर अथवा गाव याच्यावर अवलंबून असतं ती एक मनाची वृत्ती असते.

20 स्वभाव साचा

प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव वेगळा असला तरी मूलभूतपणे देवाने ह्या सगळ्यांना एकाच साच्यातून बनवलेले असते. मूलभूत समान स्वभाव दिलेले असतात.

देवाने प्रत्येक मॉडेल हे वेगळ्यावेगळ्या रितीने बनवले. पण साच्यातून बनवणारी माणसं कधीही पूर्णत समान, पूर्ण वेगळी नसतात थोडाफार फरक असतो अर्थात मनुष्याच्या स्वभावाचा विकाराचा साचा मूलभूतपणे तसाच असतो. पण स्वभाव हा प्रत्येकाचा स्वतंत्र असतो.

स्वभावाला औषध नाही स्वभाव बदलत नाही असं म्हटलं जातं. पण खरं सांगायचं तर स्वभाव बदलण्यासाठी कोणी प्रयत्नच करत नाही. मी हे सांगते ते देखील सत्य आहे. व्यासांनी निर्माण केलेलं ते व्यासपीठ असते आणि या व्यासपीठावर आपण काहीतरी विचार मांडत असतो किंवा समोरची व्यक्ती मानते जीवन म्हणजे 50% आपल्या विचार आणि 50% समोरच्याचे विचार असतात. त्या समोरच्याच्या विचारांमध्ये कर्मकांडविधी काहीही असू शकतं. मात्र हे सर्व पृथ्वीच्या हीतासाठी हवं.

ज्ञानाची उपासना करायला पाहिजे, इच्छांमध्ये स्वल्पविराम ठेवायला हवा कारण पुढची इच्छा हजरच राहते. मन करा रे प्रसन्न असे सर्व सण आपल्याला सांगतात. पण या सणांमध्ये एक वेगळा विचार सुद्धा असतो. हे सण आपल्याला पेरते व्हा अस सांगतात.

देव वेगवेगळ्या ठिकाणी असतो. शंकर देव स्मशानात भेटताथ. दत्तगुरु दारोदार फिरतात. गणपती उंदरावर बसून जातो. देवी सिंह वाहनावर फिरते. मग आपण देवळात का जातो? देवळाचा शोध बाहेर सुद्धा माणसांमध्ये लागू शकतो. स्मशानभूमीत जंगलात समाजात लागू शकतो. संतांची दिशा आपण फॉलो करू शकतो. माणुसकीची दिशा आपण वापरू शकतो. पण पारंपारिक स्वभाव बदलत नसतो. नकारात्मक मानसिकता, अज्ञान, अहंकार, दुसऱ्याला टोचून बोलायची, दुसऱ्याला दुःखी करण्याची इच्छा ती माणसाला काही प्रमाणात असतेच.

काही जण तर असे असतात की सुंब जळाला पण पिळ जळत नाही. राग, त्याच्यावर नियंत्रण करता येतं पण काही प्रमाणात! स्वभावाला औषध असते पण ते वारंवार घ्यावं लागतं, भरपूर दिवस घ्यावा लागते. रजगुण तमगूण आणि सत्वगुणांचे संतुलन करावा लागतं.

आपण म्हणतो12 राशीचे भविष्य खरं असतं का? पण हो साधारणपणे स्वभावानुसार बारा राशींमध्ये माणसांचं वर्गीकरण केलं जातं. स्वभावा 58 प्रकारचे असतात. पोट हट्टी असतं, यकृत चिडचिड करत, अहंकार असला तर हाड दुखतात. आपलं तेच खरं करणाऱ्या व्यक्तीला बद्धकोष्ठ होतो. गैरसमज असतात, ते वाढत जातात. वर्तमानपत्रातल्या बातम्या छळतात, मधुमेह होतो. पण त्या छळाच्याकडे दुर्लक्ष करायला आपण शिकायला हवं.

सांगायची गोष्ट प्रत्येकाची वेगळी असते. कोणाला काय आवडतं? कोणाला काय नावडतं. 20 वर्षात मोबाईल ने माणसाला मूर्ख बनवला आहे. पण आपल्याला नकाराचा अधिकार आहे. आपण काही काळ मोबाईल दूर ठेवू शकतो. टीव्ही दूर ठेवू शकतो. नकारात्मक भावना दूर ठेवू शकतो. त्रास

देणाऱ्या व्यक्तींना टाळू शकतो. विचार करण्यात तणावग्रस्त राहण्यास मनाची ऊर्जा खर्च होते. त्यामुळे तो तणाववग्रस्त व्यक्तीला निरुत्साही वाटते. थकवा येतो. राग आला की हात पाय लटपटतात. खोटं नाट सांगून सहानुभूती मिळवायची वृत्ती सुद्धा काही जणांची असते. मी गरीब विचारा आहे असं सांगून कडकलक्ष्मी सारखे, दया मांडून आपल्याला लोकांनी मदत करावी पैसे द्यावे अशी वाटणारी लोक असतात. दुसऱ्याचा दुःख मन मला सहन होत नाही असं सांगणारे खोटारडे पण असतात. मी याला चांगला ओळखतो त्याला चांगला ओळखतो म्हणाले तरी पण आधी स्वतःला ओळखायला हवं.

माझा स्वभाव चांगलाच आहे पण मला लोकच अशी रद्दी भेटतात अशी तक्रार करणारे लोक असतात. स्वभावाचे साचे सुद्धा असेच दुसऱ्याचा दोष बघणारे आणि स्वतःच्या दोषांकडे दुर्लक्ष करणारे असतात.

स्वभावो विजयी भवेत!

वदती वल्लभः श्रीहरी! म्हणजे स्वतःचा भाव हा तुम्हाला विजयी करो.

***

21 वाईटातून चांगलं

एखाद्या दुःखात आपण असताना लोक आपली समजूत काढण्यासाठी म्हणतात अगं वाईट झाले, यातून पण काहीतरी चांगलं निघतं. काळजी करू नकोस. होईल सगळं चांगलं! पण हे खरं असतं का? का खरं नसतं? का खरं असूही शकत? प्रत्येकाचे आपापले अनुभव असतात.

एका शिबिराच्या वेळी त्या सरांनी सांगितलं की मला पोलिसांनी पकडलं, दंड लावला, गाडी बाजूला घ्यायला लावली आणि ते चलन फाडण्यात वगैरे माझा अर्धा तास वाया गेला. तर वाईट झाले पण यातून चांगलं असं की त्यावेळी खरंच मला झोप येत होती आणि अपघात होऊ शकत होता. कदाचित देवाने पोलिसाच्या रूपाने येऊन मला त्या अपघातापासून वाचवलं आणि दंड अशासाठी झाला की आर्थिक नुकसान झाल्याशिवाय माणसाला नुकसान झालं असं वाटतच नाही. खरं तर बरीच अन्य प्रकारची नुकसानी सुद्धा फार मोठी असु शकते.

तर आज हे आठवायचं कारण म्हणजे माझे एका नातेवाईकांच्या घरी रात्री ती मंडळी झोपलेली असताना, ती तिच्या सासूबाई वगैरे कुटुंब झोपलेले असताना घराचा छताचा स्लॅब पडला आणि तो जेमतेम तिच्या डोक्यापासून तीन-चार इंचावर पडला. तिचं डोकं डोळा थोडक्यात बचावला. देवाच्या कृपेनेच तिच्या शरीराला हानी झाली नाही. आता घराचा स्लॅब कुठे कोसळेल, तो पलंगावर कोसळल का टीव्हीवर कोसळेल कोणी पण सांगू शकत नाही. बरीच बांधकाम हल्ली जुनी झालेली आहेत. त्यात प्रदूषण, रस्त्यावरचे वाहतुकीचे बसणारे हादरे, प्रत्येक घरी वारंवार केली जाणारी रेनोवेशन्स,

फर्निचर चे काम, ठोकाठोकी, घरी उड्या मारणारे आणि व्यायाम करणारे लोक, झोपाळ्यावर झुलत बसणारी माणसे यामुळे घर पूर्वी एवढी मजबूत राहिलेली नाहीयेत. अनेक मजले चढवलेले असतात आणि कमकुवत होतात.

त्या दरम्यान तिचा तो स्लॅब पडला तिला वाईट वाटलं. जवळजवळ दीड दोन लाख तो स्लॅब बनवायचा खर्च होता. त्या दरम्यान तिने दुसरीकडे सामान हलवून छोटे घर भाड्याने घेतलं. पहिल्या घरापेक्षा फ्लॅट छोटा होता पण घेतलं. कारण आपण सामान कुणाच्या घरी ठेवू शकत नाही. प्रत्येकाचीच घर लहान असतात आणि ज्यांची घर मोठी असतात ते आपले सामान ठेवून घ्यायला राजी होत नाही. नवीन घर तिने भाड्याने घेतलं. पावसाळा सुरू होता. काल ती मला सांगत होती.

"अग मी दुपारी झोपले होते आणि पडद्याच्या अडून बघते तर निळं निळं सुंदर आकाश दिसत होते. समोरचा प्लॉट आहे तो बांधकाम कधीच होणार नाहीये त्यामुळे हिरवा गार आहे. त्याच्या पलीकडच्या प्लॉटमध्ये बंगला आहे. त्यामुळे तिथेही उंची वाढणार, वारा अडवणार असं काही नाही. त्यामुळे मला प्लॉटमध्ये इतकं सुंदर आकाश दिसत होत. इतकी हवा सुंदर होती. हिरवं हिरवं गार वाटत होतं आणि पूर्व दिशेला तोंड करून असल्यामुळे सर्व खोल्यांमध्ये भरपूर सूर्यप्रकाश येत होता. म्हणजे सकाळच्या वेळी तर व्यायाम करायला गॅलरीत सुद्धा छान वाटते.

बदर होतो. त्यामुळे वाईट यातून चांगलं हे होतं. जसे की जुन्या घरापेक्षा या घरात माझी लाईफस्टाइल खूपच बदलली. समोरच मंदिर असल्यामुळे जाता येता मी हाच तरी जोडते. माझ्या सासूबाई त्या मंदिरात भजनाला वगैरे जाऊन बसतात किंवा आम्ही निदान गप्पा मारायला जाऊन बसतो.

नव्या घरी खूप सुंदर मित्र-मैत्रिणींचा ग्रुप मिळाला. एक मैत्रीण सापडली. एक मैत्रीण जे गाव सोडून मुंबईला जाऊन राहिली होती. ती सुद्धा तिला काहीतरी तब्येत एकसा प्रश्न निर्माण झाल्यामुळे मुंबईची धकधक झेपत नाही नकोस वाटतं म्हणून परत इथे राहायला आली. तिने सुद्धा याच सोसायटीत घर भाड्याने घेतलं. त्यामुळे माझ्या सासूबाईंना छान सोबत झाली. भजनाच्या मैत्रिणींचा चांगला ग्रुप जमल्यामुळे त्यांच्या गप्पा फिरण समुद्र किनारी जाणं, महिन्यात एखादी सहल करणे, एकत्र भजन म्हणणं, याच्यात वेळ पण चांगला जायला लागला. दुःखातून जन्म घेतलेला हा बदल सुखद वाटला. जुनं घर स्वतःच्या मालकीचा असल्यामुळे कर्जाचा हप्ता जात असल्यामुळे आम्ही कधीच सोडलं नसतं. त्यामुळे देवाने जणू काय आम्हाला हा बदल सुचवला.

माझं घर पण तीस वर्ष जुने झाले आहे. पहिल्या मजल्यावर येताना चा जिना थोडासा खराब झाला आहे. सोसायटीत कोणीच राहत नाही. जे ते मुलासूलांकडे परदेशी गेलेत. लिफ्ट नाही पार्किंग नाही. त्यामुळे दुखल्या खुपल्यास खूपच प्रश्न येतो. दिवस दिवस खाली उतरावे असे वाटत नाही. कारण जिना उतरताना काहीतरी अजूनच दुखतं.

सोसायटी च्या पुनर्विकासाची मीटिंग झाली त्या सभेमध्ये काहीही निष्पन्न झालं नाही. चार लोक जिथे राहतही नाही, मुला सुनाकडे परदेशी राहतात, ज्यांनी घर भाड्याने दिली आहेत त्यांनी विरोध केला आणि पुनर्विकास बारगळला. मी खूप स्वप्न पाहिली होती की आहे ह्याच आपल्या लाडक्या जागेत आपल्याला आधुनिक आणि चांगलं घर मिळेल. पण ते स्वप्न तुटलं. भाड्याने दुसरीकडे घेऊन जाऊन राहण्याची हिंमत नाहीये. अनेक मच्छर चालावे तसे किरकोळ त्रास होतात. वाईटातून चांगलं होतं म्हणतात मग हा पुनर्विकास नाकारून देवाने मला काय सुचवलं?

आता या वयात भाड्याने घर घेऊन दुसरीकडे जाऊन राहण्याची हिंमत सुद्धा होत नाही. त्यातून चांगलं निघत म्हणतात यातून काय चांगलं निघेल? ते बघू.

आरोग्य बिघडलं की माणसाला त्या शरीर संपत्तीची किंमत कळते. मित्रांनी दगा दिला की नातेवाईकांची कळते. नातेवाईकांनी दगा दिला की आई-वडिलांची कळते. शरीराचे आरोग्य बिघडलं की देवाची आणि आपल्या ला कठोर परिस्थितीत सोबत देणाऱ्या सख्यांची, जवळच्या मित्र नातेवाईकांची, आई वडिलांची किंमत कळते. करोना महामारींनी सगळे जग हैरान झालं पण माणसाला माणसाची किंमत कळली. या शरीर आरोग्याची किंमत कळली. आरोग्यपूर्ण जीवनशैलीची किंमत कळली. आजारी पडलो की आहारा आरोग्यदायी असावा याची किंमत कळते. वेळच्यावेळी औषध घ्यावं याची सुद्धा जाणीव होते. खूप मोठे टोले बसले की माणूस अध्यात्माकडे वळतो. चांगल्या प्रकारचा सद्गुरु करु शकतो. बघू वाईट झाले, यातून काय होईल? देवाला माझ्या मनासारखं न करून, त्याच्या मर्जीप्रमाणे करण्यात काहीतरी अधिक चांगला सद्हेतू असेल आणि वाईटातून चांगलं होईल अशी आशा करायला हरकत नाही.

***

22 महानायक अमिताभ बच्चन

मंगळवार 11 ऑक्टोबर 2022 या रोजी नायक अमिताभ बच्चन 80 वर्ष पूर्ण करत आहेत. अमिताभ बच्चन यांच्यासोबत चे अनेक कलाकार काळाच्या पडद्याआड गेले असताना, अमिताभ बच्चन यांच्या, अजूनही कार्यरत, दीर्घायुष्यी होण्याचे रहस्य काय?

1 अमिताभ बच्चन हे पूर्ण तया शाकाहारी आहेत.

2 अनेक संकटांमध्ये जाऊन सुद्धा सकारात्मक वृत्तीने ते वावरले.

3 त्यांच्या आईचे संस्कार, वडिलांचे संस्कार, नम्रता याचा हात धरून त्यांनी मन खंबीर ठेवलं.

साठी नंतर साधारणपणे आज समाजात अनेक आजार, ससरामान्य पणे सर्वाना लागले आहेत. अशावेळी 80 वर्ष आरोग्यपूर्ण आयुष्य जगणं हे अमिताभ बच्चन यांचं कौतुक करत, भले शाब्बास म्हणायला पाहिजे. खरंतर आरोग्य कसं सांभाळावं याचा आदर्श म्हणून आज आपण अमिताभ बच्चन यांच्या बद्दल बोलणार आहोत.

1982 कुली चित्रपटाच्या शूटिंगच्या दरम्यान पुनित ईस्सर नटाचा ठोसा लागल्यामुळे अमिताभ बच्चन, वय 40 वर्षे, यांच्या पोटात प्रॉब्लेम झाला आणि ते बरेच दिवस आजारी होते. त्यावेळी ते लोकप्रियतेच्या शिखरावर होते त्या दुखण्यातून ते सावरले. मात्र त्यानंतर त्यांची तब्येत त्यांना जपावी लागते.

आपल्याला माहिती आहे की अनेक श्रीमंत लोकांचे हे स्वतःचे डॉक्टर, पर्सनल सेक्रेटरी, खाजगी डॉक्टर, सल्लागार सोबत असतात आणि ते त्यांची सर्व काळजी घेत असतात. त्यामुळे अमिताभ बच्चन यांच्या आरोग्याची

काळजी अतिशय चांगली घेतली जाते. जया त्यांच्या पत्नीचा देखील त्यांच्या आरोग्य वाटचालीत वाटा आहे.

अमिताभ जी आजही त्यांच्या शूटिंगमध्ये व्यस्त असतात. स्वतःच्या मनावरचे, खाण्या पिण्याच्या सवयीवरच्या संयमावरचा पण समावेश त्यांचे आरोग्य कुंडलित आहे.

या कुली चित्रपटाच्या दरम्यान 1982 साली अपघाताच्या दरम्यान अमिताभ बच्चन यांना अनेक बाटल्या रक्त देण्यात आले आणि ह्या रक्तातून त्यांनाही हिपाटीटीस ची बाधा झाली तेव्हापासून त्यांच्या लिव्हरवर सुद्धा थोडा परिणाम झाला आहे. त्यामुळे अमिताभ बच्चन यांना, आहार ते विहिर सर्व सांभाळावं लागतं.

त्यानंतरच्या काळात एक वेगळा आजार ज्यामुळे अंधारानंतर किंवा काही काळानंतर अशक्तपणा जाणवतो अशी लक्षण असलेला असा myasthavia gravis नावाचा सुद्धा एक आजार 1984 साली झाला. पण आजार हरुन गेला आहे.

सदीचे महानायक अमिताभ बच्चन यांचा आदर्श घेण्यासारखा आहे. 2005 साली पोटाचा आजार झाला होता. अमिताभ बच्चन यांना मध्यंतरीच्या काळात टीबी झाला होता, पण त्यांनी त्या टीबीवर यशस्वीरित्या मात केली. रुटीन चेकप, औषधोपचार ते नियमितपणे करतात. 2018 साली शूटिंग चे वेळी अमिताभ बच्चन यांची तब्येत बिघडलेली होती. 2020 साली करोना19 महामारी जेव्हा सर्वत्र पसरली तेव्हा अमिताभ बच्चन यांना कोरोनाची देखील बाधा झाली. पण अमिताभ बच्चन यांनी करोनाला यशस्वीरित्या तोंड दिलं.

a

अमिताभ बच्चन यांना अस्थम्याचा पण त्रास आहे असं एका ठिकाणी वाचण्यात आलं होतं.

2022 साली कोण होणार करोडपती च्या शूटिंगच्या दरम्यान त्यांना पायाला देखील जखम झाली होती. तरीही या सर्व संकटांवर यशस्वीरित्या मात करून अमिताभ बच्चन हे खंबीरपणे उभे आहेत.

मला आज हे सांगावसं वाटलं कारण की साठी नंतर साधारणपणे प्रत्येकच व्यक्तीला काही ना काही तरी आजार असतो. गुडघे दुखतात, हाड दुखतात, हाड ठिसूळ होतात. कोरोना महामारीत बरेच ज्येष्ठ नागरिकांना विविध आजार झाले.

देह आहे तो हाड मास रक्ताचाच बनलेला आहे. जरा मरण पण अटळ आहे. या शरीराला जे दुखणे ही होणारच. या दुखण्यांवर मात करून, मन खंबीर ठेवून पुढे चालत राहायचं.

उतारवयातील आरोग्याचा आदर्श म्हणजे अमिताभ बच्चन होय. संध्याछाया आनंदी व्हाव्या.

अमिताभ बच्चन यांना 80 व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा.

**

a

23 असं बोलायला नको होतं

माणूस कधी सहज, कधीं पर्याय शोधत, बोलून टाकायच्या भरात काहीतरी बोलतो, काम चुकीचं करतो. थबकतो आणि नंतर त्याला वाटतं अरे मी असं बोलायला नको होतं. मी असं वागायला नको होतं.

मला तर आठवते, वर्षे झाली 'तिने असं लिहायला नको होतं' अशा नावाच एक नाटक होतं. ज्यात त्या बाईला रोज डायरी लिहायची सवय असते आणि ती डायरी एकदा, एक दिवस नवरा वाचतो आणि त्याला धक्का बसतो. तेव्हा नाटकाचे नावानुसार, नवरा म्हणाला तर तिने असं लिहायला नको होतं.

जीवनात अनेक फुलपाखरांच्या मागे आपण धावत असतो. फुलपाखरू हे खूप आनंद देऊन जाते. मला आठवतं मध्यंतरी मी आजारी असताना खिडकीशी खुर्ची घेऊन मला सुनबाई नी थोडा वेळ हवा खा म्हणून बसवलं होतं. तेव्हा खूप सुंदर फुलपाखरू खिडकीशी आलं आणि माझा पूर्णपणे मूड बदलला. तसं फुलपाखरू माणसाला खूप आनंद देत असते. खरं तर फुलपाखरू हे सर्वोत्तम निसर्ग पर्यावरणाचे लक्षण असतं. बटरफ्लाय गार्डन, बाग, फुलपाखरू उद्यान वगैरे या ठिकाणी म्हणूनच माणसाला आनंदी वाटत असतं. फुलपाखरू हे स्वप्न असे समजून, भावना म्हणून आपण फुलपाखराच्या मागे धावत असतो. आपली स्वप्न पूर्ण नाही झाली की आपली स्वप्न अन्य कुणातर्फे म्हणजे मुला तर्फे भाच्या तर्फे शिष्या तर्फे पूर्ण करण्यासाठी आपण ते फुलपाखरू हातात घेतो. नंतर ते फुलपाखरू उडाले कि वाईट वाटे. वाटते, असे व्हायला नको होते.

a

सिनेमा नाटकं करमणुकीचे कार्यक्रम, ईव्हेंट, वेगवेगळ्या रुपकातील फुलपाखर असतात जी काही क्षण आयुष्यात काहीतरी आशा देऊन मनाला उत्साह देऊन जातात. पण एकूण बाकी आयुष्य म्हणजे असं व्हायला नको होतं अशा प्रकारातच मोडत असतं.

हे व्हायला नको होतं, हे बोलायला नको होतं, अस आपल्याला बऱ्याच वेळा वाटतं. पण त्या त्या क्षणी आपण ते बोलायचा घेतलेला निर्णय हा स्पॉटेनियस अथवा विचारपूर्वक किंवा कसाही असो पण तो त्या प्रसंगी योग्यच असतो. जो कालांतराने बरा वाईट चुकीचा बरोबर असा ठरू शकतो. माझ्या सहवासातील, सल्ल्या साठी, कुणा कडे आलेले बरेच लोक आम्ही असं वागायला नको होतं, आम्ही असं बोलायला नको होतं, आम्ही हे सांगायला नको होतं अशा गोष्टी लिहितात. पश्चात्ताप करतात.

एक कविता होती.

या इथेच बोलायचो आम्ही एकमेकांशी, वाटेल ते बोलावेसे वाटेल ते बोलू नये ते आज सुद्धा या इथेच उभी आहे मी कुण्या तरी पतीची पतिव्रता पत्नी मी!! 1!!

गळ्यात काळे मणी लेवून, टिळा लावून,

जुन्या चुका उरी भरून, आता असं वाटून,

मी असं बोलायला नको होतं,

तू असं वागायला नको होतं!! 2!!

चूक होऊन जाईल पण ते घडलं होते,

आता मी इथेच उभी राहते,

a

तुझी याद अश्रूत लपवून जाते,

मी गपचूप निघून खाली मान घालते!! 3!!

अन परक्यासारख्या नजरेने बघते,

तुझ्याकडे बघून दुर्लक्ष करून जाते,

असं व्हायला नको होतं वाटते,

खरंच असं व्हायला नको होतं.!! 4!!

ब्रेकअप च्या वेळी, विवाह विच्छेदाच्या वेळी, नातेसंबंध तोडताना, करियरचे निर्णय घेताना, शेजारीबाजारी भांडून वाद करताना, बऱ्याचदा आपण अशा काही गोष्टी बोललेल्या असतो त्याबद्दल नंतर वाटतं अरे असं व्हायला नको होतं.

***

a

२४ शक्ती देना

हमको मन की शक्ती देना,

मन विजय करे!

असं भजन दुर्गाबाई फार सुंदर म्हणायच्या. आज नाही, म्हटल. संध्याकाळ झाली तरी त्यांना ते भजन म्हणण्यासाठी आग्रह केला जायचा. कौतुक पण व्हायचं.

पण एवढ्या काही दिवसात त्या आमच्या कट्ट्यावर, आमच्या देवळांमध्ये, आमच्या ज्येष्ठ नागरिकांच्या नाना नानी पार्कमध्ये दिसत नव्हत्या. म्हणून मी त्या दिवशी दुर्गाबाईंच्या घरी त्यांची खाली खुशाली विचारायला गेले. अशी आमच्या कट्ट्यावर पद्धतच होती, कोणी आजारी पडला कि जा त्याच्याकडे! कोठेही चहा नाश्ता करायचा एखादा तास गप्पा मारायचं परत यायचं. महीन्यात 30 दिवसाचे बेत असत. ककट्टा नाहीतर काही जणांकडे जायचं. रोज एकच काम करायचे. एकाच व्यक्तीकडे जायचं. जास्ती खूप कार्यक्रमांची भारम भरताड नाही. पण तो दिवस जरा फील गुड मध्ये बरा वाटायचा. ‘ आहे कुणाला तरी आपली गरज आहे. कधी तरी आपण हवे आहोत. ’असे वाटे. मग या कुणाबरोबर तरी वेळ चांगला जातो. ‘ समथिंग इज हॅपनिंग’ असं वाटायचं.

. ज्येष्ठांना डस्टबिन म्हणायचे दिवस आता आलेत हे सगळ्यांनाच लोकसत्तातले एका लेखापासून माहित झाले. पण तरीही आयुष्य आहे, तरुणपणी कष्ट केलेत. आता थोडा आराम हवा म्हणून आम्ही आनंद मानतो. आहे त्याच्यात बरे मानून खुशीत राहत होतो.

a

घरी काहीही दुखत असो, पसारा असतो बावळट ध्यान म्हणून दुर्लक्षित बसणारे जरी असोत, पण कट्ट्यावर जाताना बाहेर पडताना, आवरताना टापटीप तोंडावर पावडर लावून हलकीशी लिपस्टिक लावून बहुतेक सगळ्या बायका यायच्या.

तर त्या दिवशी दुर्गाबाई आल्या नाही म्हणून आम्ही, मी आणि माझी दुसरी एक मैत्रीण दुर्गाबाईच्या घरी पोचलो. दुर्गा बाईच्या घरी वेगळच वातावरण होतं. दुर्गा बाईचा परदेशी राहणारा मुलगा अचानक आला होता. त्याचं काहीतरी, अचानक म्हणून विसाच काम होतं. घर टापटीत सुंदर दिसत होतं. स्वच्छता केली होती. पाच हजार रुपये देऊन बाहेरचा माणूस बोलवून घर स्वच्छ करून घेतल्यामुळे घर छान वाटत होतं. पण शेवटी जुनच! जुन्या वास्तूला डागडुजी करुन ठिगळ लावून, शिवण टाकण्यात आली होती. तरी ती अशी दिसून दिसून किती सुंदर दिसणार? आणि नव्याची सर तिला येणारच नाही. आम्ही बसलो. दुर्गाबाई म्हणाली की,

"हा जाणार आहे पुढच्या आठवड्यात, मग मी येईल. " बर असं म्हणून चहा नाश्ता करून आम्ही जायला उठलो. तेवढ्यात त्यांचा मुलगा आला. म्हणाला,

"अहो एवढ्या श्रीमंत मुलाची आई आहे. माझी आई पण ती पॉश बेस्ट राहतच नाही. बघा कसा बावळट गबाळा देश वेश घेऊन वावरते. मी तर तिचे सगळे जुने कपडे फेकून दिले. . प्लास्टिकची खुर्ची ती पण फेकून दिली. प्लास्टिकच्या खुर्चीने सगळा शो जातो. प्लास्टिकचा स्टूल, प्लास्टिकच्या वस्तू जुने कपडे रॅक चपला जुन्या मांडण्या सगळ्या वस्तू फेकून दिल्या. "

दुर्गाबाई थोड्याशा कसनुशा सुद्धा झाल्या. आम्ही पण एकदम लेकाने गृहकलह दाखवल्यामुळे नाराज झालो आणि घरी आलो.

तसं थोड्याफार फरकाने प्रत्येकच घरी दोन पिढ्यांचा बेपनाह बेबनाव असतोच. मुलांना सगळं छान हव असतं आणि म्हाताऱ्या माणसांना खराब! बाम लावायला झोपताना तेल लावायला, बाहेर जायला याला त्याला द्यायला, अशा जुन्या वस्तू हव्या असतात. प्लास्टिक स्टुल वर लेप लावण्यासाठी बसता येते. फडकी पुसायला लागत आहेत. जुन्या बादलीने आंघोळ करता येते. प्लास्टिकची खुर्ची सहज उचलता येते. त्यामुळे प्लास्टिकचे फर्निचर सुद्धा म्हाताऱ्यांना बरं वाटत असतं.

रात्री झोप न आल्याने मला कसतरीच वाटायला लागलं. उगीच म्हणून मी दुर्गाबाईंना फोन केला. त्यावर दुर्गाबाई म्हणाल्या,

"आमच्या माघारी मुलाना काय फेकायचं ते सगळं त्यांना फेकू दे पण आम्ही असेपर्यंत आमची गैरसोय होते ना! आता तो गेल्यावर मला आंघोळीच्या वेळी बाथरूम मध्ये बसायला परत मी नवीन खुर्ची आणू का? पंधराशे रुपयाची खुर्ची आहे. आणि फेकायची तर खाली कशाला फेकायची? एखाद्या गरीबाला द्यायची. तर तो म्हणतो. हल्ली जगात कोणीच गरीब नसतो तुझे जुनी भांडीकुंडी देशील ना, कपडे देशील ना, ते तो तथाकथित गरीब भंगारात विकणार आणि पैसे करणार. त्याच्यापेक्षा फेकून दे. सर्व गैरसोयीचे होते आहे. असु देत. तो जाणार आहे उद्या रात्री! नंतर बोलू. " असं म्हणून त्यांनी फोन बंद केला. मुलगा परदेशी गेल्यानंतरही दोन दिवस दुर्गाबाई न आल्यामुळे मी परत दुर्गाबाईंच्या घरी गेले. यावेळी मी एकटीच गेले होते. शेजारणीचा एक तुटका स्टुल त्यांनी मागून आणला होता. कसं तरी होत, हात

दुखतो डॉक्टर कडे घेऊन जावे असे म्हणाल्या. वर म्हटल्याप्रमाणे बोलणे झाले.

"आहो अंघोळीला बसायला स्टुल लागतो, परत कुठे नवा आणायचा आणि परत नवा महागाचा आणून ही मुला परत आल्यावर फेकून देणार! "

खूप जुना तेलकट, नवे मुलाने फेकले म्हणून गाऊन घातला होता. घरात परत पूर्वीसारखा थोडा फार पसारा पसरला गेला होता. गचपण, लपवलेलं सामान बाहेर आले होते. चादरीवर तेलाचे डाग पडले होते. घरात बामचा वास येत होता. आम्ही पॉश सोफ्यावर बसलो होतो. दुर्गाबाईंनी जमिनीवर गादी टाकली होती. पॉश आणि स्मार्ट मुलाची आई या पदावरून दुर्गाबाई परत एक वृद्धा झाल्या होत्या.

बाहेर वावरताना माणूस टीप टॉप राहतो. चांगले चुंगलंच दाखवतो. याचा अर्थ असा नव्हे की त्याला काही प्रश्न नसतात. त्यामुळे इतर घरांशी तुलना करून आपण आपल्या घरातल्या ज्येष्ठांना अपमानास्पद वागणूक तर देत नाही ना? आरोग्य, वय हे प्रश्न प्रत्येकाचे वेगळे आहेत. वॉकर, औषधोपचार वस्तू, काठ्या, पट्टे, सोईसाठी घरात काही वस्तू जर असतील तर त्या फेकून घराचं पॉश पण वाढवता येतं पण ज्येष्ठांची गैरसोय सुद्धा वाढते.

एक आठवडा गेला दुर्गाबाई काही कट्ट्यावर येईना. मी फोन केला दुर्गाबाईंना म्हटले,

"अहो काय झालं? मुलगा परत गेला. तुम्ही अजुन परदेशी मुडातच आहात का? सकाळी नाना पानी पार्कचे ठिकाणी अजून तुम्ही येत का नाही? "

"सध्या मुडच नाही. त्यामुळे नंतर येईन. घर पूर्वीसारखं सुरळीत होत नाहीये. खूप सामान फेकून दिल्यामुळे आणि आवरावर केल्यामुळे आम्हाला घरात काही सापडत नाही आहे. मुलांनी भांडीकुंडी सुद्धा, आजीची जुनी झाली आहेत ती नको म्हणून फेकून दिली. त्यामुळे काहीच सुचत नाही. खालच्या फडताळ्यात ठेवलेल्या वस्तू, तुम्हाला तर माहितीये मला खाली बसून काढता येत नाही. त्यामुळे फार गैरसोय आहे. येईन दोन-तीन दिवसांनी येईन. मुलाने पाटा-वरवंटा, खलबत्ता, घरी तीन पोल पाट लाटनी होती त्यातली दोन पोलपाट लाटणी या अशा वस्तू टाकून दिल्या. मिक्सर वापर फूड प्रोसेसर वापरावा म्हणून अस केल. पण मुलानी या वस्तू टाकल्या त्या शेजाऱ्यांनी वगैरेच नेल्या होत्या. अहो एवढ छान दगडी जात होतं, धुवायचा दगड होता. त्या खालच्या काकूंनी वस्तु नेल्या. पण त्या परतच देत नाही. ते लोक म्हणतात,

"देणार नाही. तुमच्या मुलाने घरी तीन पोल पाटलांनी होती त्यातली दोन पोलपाट लाटणी या अशा वस्तू टाकून दिल्या. मिक्सर फूड प्रोसेसर वापरलेल जुन म्हणून या वस्तू टाकल्या त्या नोकऱानी वगैरेच नेल्या असत्या. अहो एवढ छान जात होतं. दगड होता त्या खालच्या काकूंनी नेल्या पण त्या परतच देत नाहीत. सांगितलं तुमच्या मुलाने फेकल्या होत्या, आता मी परत देणार नाही. त्यामुळे थोडेफार ते मदत करायचे, अडीअडचणीला यायचे तर आता त्या वस्तूंमुळे भांडण होऊन त्या देखील मदत करेना. अवघड झाले आहे. येईन. "

एका आठवड्यानंतर दुर्गाबाई परत कट्ट्यावर आल्या पण पूर्वीसारखं तेज नव्हते. ताज्या टवटवीत फुलाचे निर्माल्य व्हावं आणि रंग उडून जावे किंवा

नव्या कोऱ्या चित्रांमध्ये रंग किंचित फिकट पुसट व्हावे तसे त्यांचं झालं होतं. एरवी स्वतःच्या घरचे गृह चित्र दुर्गाबाई कधीच बोलत नसत. हवा पाणी पुस्तकाचं वाचन फुल निसर्ग स्वयंपाकाच्या कृती या विषयावरच बोलत असतात. कुणाच्याही कौटुंबिक गोष्टीत त्या दखल देत नसत आणि स्वतःच्या घरचेही सांगत नसत. पण मुलाने सगळ्यांसमोर असं बोलल्यामुळे त्यांची गृहछिद्र उघडी झाल्यामुळे थोड्या त्या नाराज झाल्या होत्या.

"सगळ्यात जवळची व्यक्ती सगळ्यात जास्ती दुःख देते. " दुर्गाबाई म्हणायच्या. ते वाक्य मला आज पटलं. मी, ईतर सगळ्यांनी खूप आग्रह केला तरीही त्या हमको मन की शक्ती देना हे गाणं म्हणायला तयारच नव्हत्या. उद्या म्हणेल उद्या, अस करत होत्या. शेवटी एक दिवस त्या नाईलाजानेच ते भजन म्हणायला उठल्या आणि म्हणाल्या "हमको मन की शक्ती देना,

मन विजय करे"

त्यांच्या डोळ्यातून घळघळा पाणी येत होतं. देवाने त्यांना आहे त्या परिस्थितीत आनंदी आणि आरोग्यदायी राहण्यासाठी शक्ती द्यावी ही प्रार्थना मी पण मनातल्या मनात केली.

कुणी सांगावं काही दिवसांनी माझ्यावर पण अशी परिस्थिती येऊ शकते. जात्यातले रडतात आणि सुपातले हसतात. तेव्हा देवा, हमको मन की शक्ती देना!

***

a

25 वेळ काळ प्रसंग

वेळ काळ आणि प्रसंग बघून माणूस शक्यतो वागायचा प्रयत्न करत असतो. पण त्याला ते दरवेळी जमतं असं नाही. उमजत पडत नाही.

मै तनु समजाया, म्हणून माणूस जेव्हा दुसऱ्याला समजवतो तेव्हा तू कुठेतरी खोल स्वतःला सुद्धा समजावत असतो. पण तरीही काळ वेळ आणि प्रसंग बघून वागणं दरवेळी शक्य होतच नाही. अशा प्रसंगी असं वागाव, अशा प्रसंगीत धीर बाळगावा, अशा प्रसंगी आरोग्य सांभाळाव, व्यायाम करावा, आहार संभाळावा वगैरे या गोष्टी सांगितल्या जातात. तरीही काळ वेळ आणि प्रसंग यांच्या सोबत पण एक वेगळा घटक तो म्हणजे मनस्थिती सुद्धा येते. आपण त्या मनस्थितीत नसू तर त्या काळ वेळी आणि प्रसंगाला अनुरूप वागणे शक्य होतं का? जग रहाटीने अशा प्रसंगी जावे, अशा प्रसंगी भेटावं, कधी लोकांना बोलवावं, चारचौघात मिसळावं हे सगळं सांगण ठीक आहे, पण माणसाची तशी अनुरूप मनस्थिती पण हवी. तरच त्या काळचा वेळ प्रसंग साजरा करायला आपण सुसज्ज होऊ शकतो. त्या प्रसंगाच्या इव्हेंट मध्ये सामील होऊ शकतो. हा इव्हेंट चांगला असतो, वाईट असतो. प्रसंग चांगला किंवा सामान्य सुद्धा असतो पण तो ताण देणारा नक्कीच असतो.

एकाच दिवशी सकाळी दहाव्याला दुपारी ऑफिस, मग लग्नाला रात्री रिसेप्शन पार्टीला असे चार चार ठिकाणी माणूस जातो तेव्हा प्रसंगानुरूप कपडे सोबत असतील तरच ते घालू शकतो. नाहीतर काळ काय वेळ काय आणि तू कशी आलीस असं सुद्धा म्हटलं जाऊ शकते.

मनस्थिती सुद्धा सकाळच्या दहाव्या तेराव्यातून बदललेली नसेल तर माणूस त्या रात्रीच्या इव्हेंटचा पण आनंद घेऊ शकत नाही. इव्हेंट म्हणजे काय फक्त चांगलं खाणं आणि कपडे मिरवणं नसतं. त्या वातावरणातील भावनांच्या प्रवाहांशी पण एकरूप व्हावं लागतं ना! हे जरा जास्तच खोल पातळीवरच असलं तरी ते सत्य आहे.

'राजा की आयेगी बारात रंगीली होगी रात, मगन मै नाचूंगी' असा वरातीला सूर, ती भावना, आनंद हवा. पण काळ वेळ आणि प्रसंग या रीतीने मनस्थिती नसेल तर तो केवळ एक उपचार होतो. एक इव्हेंट अटेंड केली एवढाच उपचार ठरतो.

पूर्वीच्या काळी विवाहाच्या वेळी दिलेलं आहेर लिहून घ्यायचे. का? तर तसा तशाच प्रकारे आहेर द्यावा. त्याची परतफेड पुढच्या विवाहात करावी लागते. आपण विवाहाला त्या यजमानांच्याकडे परत एकदा जाऊन उपस्थिती नोंदवू शकतो. त्यांनी आपल्याकडे आल्यावर आपण त्यांच्याकडे जाऊ शकतो. एवढाच या काळ वेळ आणि प्रसंगाचा हिशोबी उपयोग असतो. का?

तरी हल्ली पुष्कळ परिस्थिती सुधारली आहे. आपण न जायला, पटेल असे ऑडिओ तब्येत अशी कारण सांगता येतात. जाणे नाकारता येते. पण पूर्वी हे सगळं भेटणं जाणं आवश्यक, अति अवश्यक असायचं. भेटीला न गेले तर माणसं तुटायची.

एका पार्किनसन झालेल्या अतिशय आजारी मैत्रिणीच्या घरी आम्ही दोन बायका तिला भेटायला गेलो होतो. ती तिच्या परीने, तिच्या परिस्थितीवर मात करत जीवनाचा खूप आनंद घेत होती. बरीच पुस्तक वाचत होती. रडत औषधोपचार करत जगत होती. घरी खूप पुस्तक होती. ती म्हणाली

“वाचनालयातून एक व्यक्ती मला घरी आणून देतो. जर नाही त्यांनी आणून दिले, तर माझी पूर्वी वाचलेली परत वाचते. पुस्तकांचे पारायण करते. जी पाच दहा पुस्तके आहेत तीच मी परत वाचते. देवाच्या पोथी वाचते. टीव्ही बघते. गाणी ऐकते. तिचा हात थरथरत असल्यामुळे जेवणाचा डबा येतो आणि आहे त्या परिस्थितीत ती खुश आहे. पण काळ वेळ प्रसंग बघून बोलणं हे सगळ्यांना जमतच असं नाही. माझी अन्य एक मैत्रीण तिला म्हणाली,

“बाई ग असले आयुष्य जगण्यापेक्षा मरून जावं. ”झालं माझ्या आजारी मैत्रिणीने रडायला सुरुवात केली. काळ वेळ प्रसंग बघून माणसाने धीराचे दोन शब्द बोलत जावं.

सामान्य पणे देवदर्शनाला जाताना, फिल्मी स्टाईल नटून थटून जायची पद्धत असते.

“देवदर्शना निघती ललना हर्ष माईना गगनात! ” अशा परिस्थितीत नटून थटून जातात. लग्नाला तर काय फॅशन शो असतो. मध्यंतरी एका पार्टीबद्दलची एक सिरीयल बघितली. नुसते दागिने कपडे, फॅशन शो, 70 70 हजाराचे ड्रेस, कानात हिऱ्याचे दागिने यांची जणू काही जाहिरात होती. तर अशा प्रकारे ती मालिका चालू होती.

नातेसंबंधात कशी आहेस? काय कसे आहे? ही चौकशी करायची सोडून कपडे कुठे घेतले आणि दागिने कुठे केले? हे नवीन घेतलं का? ते जुने घेतलं का? असे चालू होते. अजून किती फ्लॅट घेणार वगैरे अशीच चर्चा या सर्व प्रसंगांमध्ये असते. माणूस किती मटेरियलीस्टीक म्हणजे भोगवादी झालाय बघा!

a

माणसाने माणसाला मार्केट मधली एक कमोडिटी बनवली आहे. देवळात सुद्धा खरंतर भक्ती भावानी साधी कपडे घालून आणि जो वार असेल त्याला रंगानुरूप वेष करुन जायचं असतं. पण देवळाच्या बाहेर बसून कुचाळक्या करणारी, फोटो काढत असलेले लोक सुद्धा खूप बघायला मिळतात.

काळ वेळ प्रसंग यांचे भान राहिलं पाहिजे. त्या अनुरूप वागता आलं पाहिजे. तो नियम नसतो. ती मनातून आलेली एक माणूसकीची संवाद भावना असते.

**

26 लई नाही मागणे

पोटापुरते देई विठोबा, पोटापुरते देई! आता लई नाही मागणं!! धृ!!

भाकर ताजी अथवा शिळी,

देवा देई भुकेच्या वेळी,

आता लई नाही मागणं!! 1!!

मज दळणं अथवा कोंडा,

देवा देई भुकेच्या तोंडा,

आता लई नाही मागणं!! 2!!

वस्त्र नव अथवा जुन,

देवा देई अंग भरून,

आता लय नाही मागण!! 3!!

तुका म्हणे देवा आता,

करू नका पाया परता!

आता लई नाही मागणं!! 4!!

हे भजन संतसूर्य तुकाराम महाराजांचे आहे. लहानपणी जेव्हा कानी पडायचं तेव्हा मला बरेच शब्द कळत नसत, आणि त्यांचा गहन अर्थ सुद्धा कळत नसे. दळण कळण कोंडा आहे काय? हे देवाकडे मागायचं? देवा मला पंचपकवान दे असं म्हणावं असं मला त्या वयात वाटत असे.

जुन वस्त्र? मागून मागून काय मागितलं तर जुने वस्त्र? का?

तुका म्हणे पाया पडता, करू नका पाया परता! म्हणजे मी तुला मनापासून नमस्कार करतो आणि मला आता तू परत, आल्या पावली परत पाठवू नको. तुझा सहवास तुझी भक्ती आयुष्यभर लाभू दे.

याबाबतीत अर्थ मात्र आम्हा सर्व नातवंडांना आजोबा इतकी रंगून सांगत असत की त्या भक्तीत अवघा रंगाची एकच झाला असे वाटत असे. आम्ही भक्तीरसात बुडून जात असु. कृष्ण तुळशीच्या माळा ओवुन, विठोबाच्या फोटोला घालायचे काम आम्ही आनंदाने स्वीकारायचो. तुकाराम महाराजांच्या वेबसाईटवरील अभंग गाथा भजनांमध्ये या वरच्या भजनाचा उल्लेख आढळला नाही. तरीही हे शब्द आवडतात.

टाळ-मृदंगाच्या गजरात गळ्यात तुळस मला घालून पंढरपूरला जाणारे भक्त, माळकरी, वारकरी, या संप्रदायाबद्दल असीम आदर त्या बालपणातच आमच्यावर या भजनाने रुजला होता.

त्यानंतर मधली काही वर्ष पोटासाठी धावपळ करण्यात गेली. नंतर एकदा बेस्ट बसमध्ये हे भजन ओझरत कानावर पडलं.

त्यावेळी मी भुकेचे आजचे जुगाड या विषयावर लिखाण करत होते. महागाई खूप वाढली आहे याचा अभ्यास करत होते आणि मला त्या लहान वयात कानावर पडलेल्या तुकाराम महाराजांच्या सर्व ओव्यांचा अर्थ तात्काळ उमगला. भूक, महागाई संतोष, भक्ती या सर्व भावनांचा संगम, मनात एखाद्या कोपऱ्यात मंद सांजवाते सारखा तेऊ लागला.

संत तुकाराम महाराजांच्या जन्माला(1608) चारशे चवदा वर्षे पूर्ण झाली म्हणून संत साहित्या बद्दल अनेक लेख वाचनात आले होते. पण त्या क्षणी, त्यावेळी वारकऱ्याच्या क्षीण सारख्या थरथरत्या आवाजात हे भजन

ऐकले आणि मला साक्षात पंढरपूरच्या विठोबाच्या दरबारी त्याच्या चरणी लिन होऊन मी दर्शन घेते आहे असे वाटले. मी माझे मागणे मागते आहे, गाहाने घालते आहे असं मला वाटलं.

बस मधील गर्दीतून तो वारकरी उतरून निघून पण गेला. पण त्याचा तो भगवा झेंडा माझ्या मनात रोऊन गेला. त्या साधुचा साधासुधा वेश करुण होता, पायात वहाणा सुद्धा नव्हत्या. कृश अशी शरीरयष्टी अशक्त वृद्ध व क्षीण काया मला आदरणीय विठोबाच्या चरणी अर्पण केलेल्या ओव्यांचा अर्थ सांगून गेली. ती फिकट आकृती मला संस्कृती शिकून गेली. वारंवार देवदर्शनासाठी पंढरपूरला जाणारे वारकरी थंडी वारा पावसाळा याची पर्वा न करता म्हणून मैलोन मैल प्रवास करून जातात ते फक्त त्या विठोबाच्या काही क्षणाच्या दर्शनासाठी जातात. विठोबांशी त्यांचं नातं फक्त अथांग भक्तीचाच असतं. म्हणून तर विठोबा रायाला त्या काळ्या देवाला मागणी घालताना साकडं घालताना भक्त म्हणतात, 'आता लई नाही मागणं' ! विठ्ठलाच्या भेटीची दर्शनाची आस लागलेला विठ्ठल भक्त, फक्त/ केवळ शरीराला आवश्यक इतके अन्न आणि केवळ थंडी वाऱ्यापासून आणि उन्हापासून स्वतःचे रक्षण करण्याचे वस्त्र मागतो. बेसिक अशा वस्त्र अन्न निवारा यातील निवारा फक्त मागतच नाही. कारण हे विश्वस्त त्या विठोबाचे घर आहे. कुठेही निजायचं आणि पुन्हा यात्रा सुरू करायची.

डोक्यावर तुळस घेऊन, हातात भगवा झेंडा, डोळ्यात भक्ती भाव एवढ्याच शिदोरीवर पंढरपूरच्या वाटेवर निघालेल्या वारकऱ्यांची भक्ती आपल्याला तुकाराम महाराजांनी ओव्यांमध्ये फार सुंदर शब्दात व्यक्त केली आहे.

ज्या भक्तांनी ती जाणली त्यांनी मग फारच अर्थपूर्ण बनवली आहे. कस्तुरी मृगाला जसं कळत नाही की सुगंध कुठून येत आहे? सैरभैर होतो आणि तो शोधत राहतो की तो सुगंधाचा स्रोत कोणता आहे? तसे मानवाचे होते. सुखाचा शोध घेत मानव फिरत राहतो. पण सुख हे त्याच्या मनाच्या समाधानातच संतोषात भक्तीत असतं. हे ह्या भजनातून कळते.

श्री तुकाराम महाराजांच्या अभंगाबद्दल लिहावे अशी खरंतर माझी शक्ती नाही, अनुभवही नाही, पण भक्ती मात्र आहे.

मुंगी साखरेचा रवा,

लहानपण देई देवा!

म्हणून मी आज अभंगाबद्दल लिहीत आहे. यात फक्त एकच भक्तीचा भाव आहे आणि विठोबाचा विसर पडू नये हीच माझी इच्छा आहे. चूक झाली असल्यास क्षमा असावी.

देवा करू नका पाया परता,

आता लई नाही मागणं.

**

27 पापा कहते है.

पुत्र व्हावा पुंडा, ज्याचा तिन्ही लोकी झेंडा!

वारस

पुत्राने/कन्येने मोठे व्हावं, खानदानाचं नाव रोशन करावं असं वडिलांना नेहमीच वाटतं. आपल्या त्या अपत्यात संस्कार रुजवण्यात आईएवढाच बापाचा सुद्धा मोठा वाटा असतो. बाबा, पप्पा, अण्णा, बापू दादा अशा विविध नावांपैकी एखाद्या नावाने संबोधले जाणारा जन्मदाता पिता मुलाचा रक्षण कर्ता असतो. म्हणून ग्रेट माणसाला बाप माणूस म्हणतात. त्या त्या क्षेत्रातील पारंगत माणसाला बाप मानले जाते. वेदना झाली की आई ग, अस रडणारा माणूस, भीती वाटताच किंवा अकल्पित प्रसंग येताच बापरे म्हणतो. फादर्स डे जूनमध्ये असतो, पण घरोघरी फादर्स डे रोजच असतो.

जाहिरातीतला बाप

माय डॅडी स्ट्रॉंगेस्ट म्हणून वडिलांबद्दल कौतुकाने बोलणाऱ्या मुलगा जाहिरातीत असतो. एका शीत पेयाच्या जाहिरातीत जानते हो मेरा बाप कोण आहे? म्हणत वडिलांच्या स्टेटस ची बढाई मारणारा मुलगा दिसतो. बँकांच्या गुंतवणुकीच्या जाहिरातीत योग्य निर्णय घेणारे वडील दाखवतात.

पालक

आई व बाप दोघेही श्रेष्ठच असतात. मात्र 'आईसारखे दैवत साऱ्या जगतावर नाही' म्हणून आईची महती सर्व जगाने गायली आहे. अशी बरीच गाणी पण आहेत. पण वडिलांबद्दल एकही नाही. वडिलां वाचून काया नाही,

आई वाचून माया नाही! अशी टिप्पणी आहे. आई बद्दल श्रुती स्मृती पुराणा हूनही अधिक लीहील गेलं. पण आईच्या त्या आईपणाला मातृत्वाला सन्मान आणि सुरक्षा बापामुळेच मिळते. नाही तर जग किती कठोर असतं. म्हणूनच वडील मोठे ठरतात.

गुडविल

वडिलांचा वारसा व गुड बिल ज्या त्या ज्याच्या त्याच्या क्षेत्रात मिळत. धंद्यात वडील मुला-मुलींना आपल्या आपत्यांना धंद्याची खास ट्रेड सिक्रेट शिकवतात व धंद्याच्या परंपरेची बेगमी करतात. अनेक कला आणि संस्कृतीचे वारसे जतन करण्यात हे गुडवेल उपयोगी पडतं. या वडिलांच्या गुडविलचा फायदा मुलांना मुलींना व्हावा म्हणून तो पिता झटतो. सुपुत्र सकन्या, सुपीता बाप- लेकाची जोडी त्यांचे सख्य असतच पण सुपीता आणि सुकन्या यांचीही माया स्पृहणीय असते. मुलांवर खुलकर प्रेम करणारा पिता, मुलीशी अंतरावरून वावरत असला तरी तिला काय हवं ते बघ असं बायकोला मध्यस्थ घालून थोड्या अंतरावरूनही अलिप्तपणातूनही बघतो. तो ध्येय पूर्ण होईल इतपत स्नेह धागा जपतो. तो जोड मजबूत असतो. फेविकॉल हून पक्क असं पिता आणि अपत्याच नातं असतं.

पित्याचा आशीर्वाद.

मुलगा व मुली बापाची चिंता असतात. मुलगी वयात आली की बेटी तो हे धनी पराया म्हणून अवघडलेला पिता झोप उडून स्नेहार्द शाश्रू नजरेने मुलींकडे बघतो. अभिमानाने त्याचं डोळ्यासोबत मने भरून येतं. मुलीचे लग्न सुयोग्य व तिला आवडणाऱ्या तरुणांशी करून देणे व तिला लग्नात आशीर्वाद

देणे हे पिता आपलं स्वप्न कर्तव्यच मानतो. अगदी मृत्यूनंतरही पित्याचा आत्मा मुलांसाठी तळमळतो.

हिशोब

बाळाला वाढवण्याचा दूध पाजल्याचा हिशोब जसा आई करत नाही तसाच केलेल्या कष्टाची परतफेड व्हावी ही अपेक्षा पिता पण ठेवत नसतो. स्वतःच्या इच्छा मारून वडील पैसे साठवतात. ते मुलांच्या शिक्षणासाठी कर्ज काढतात. ते मुलांच्या डोक्यावर छप्पर मिळावा म्हणून घर बांधतात. स्वतःचे जे आयुष्य आपण जगलो त्याहून अधिक चांगलं राहणीमान मुलांना द्यायचा प्रयत्न वडील करतात.

आजार

आजार अडचणीच्या वेळी वडिल कडेवर खांद्यावर उचलून घेतात. आजारपणात आई इतक्या नाही तरी थोड्याफार खस्ता काढतात. घसातला घास बाजूला काढतात. परिस्थिती असेल नसेल मुलाला तुला काय हवं ते विचारतात. हे त्या पित्याचे मोठेपणच आहे. जेवणाचा घास घेण्यापूर्वी साधारणतः प्रत्येक वडील तो किंवा ती म्हणजे आपली आपत्य जेवली का नाही हे विचारतात. गौरव

इतर गोष्टी देऊ शकेल ना शकेल पण पिता लेकराला देतो त्या गोष्टी म्हणजे नाव गौरव हिम्मत आणि आधार. त्यात मुलांचे हितासाठी आग्रही राहणे व मुलांवर आपली आवड लादले यातला एक फरक जाणून वेळप्रसंगी मुलांसाठी आपला आग्रह दूरही ठेवतात. उदाहरणार्थ मुलांच्या पसंती च लग्न, करिअर परदेशी जाण!

वडिलांनी मला काय दिलं?

a

वडिलांनी मला काहीच दिलं नाही म्हणून दुषण देणारा एक माझाच नातेवाईक मला भेटला होता. मी त्याला म्हणाले,

"लहानाचं मोठं केलं संस्कार दिले. वडिलांनी सुद्धा आईच्या बरोबरीने डोळ्यांचा दिवा आणि हाताचा पाळणा करून वाढवलं नसतं तर रोगराईने तू एवढ्यात मेला असतात. जगाच्या कठोर वागण्याने आपला बळी घेतला असता. हे तू विसरलास का? आपण त्यासाठी पालकांचे कृतज्ञ राहायला हवं. "

बाप किती कमवतो त्याने आपल्याला काय दिलं यावर का त्या वडिलांची तो कुणीतरी आहे काहीतरी आहे अशी किंमत ठरते का?

खांदे

आजारी लेकरू वडिलांचे खांद्यावारी आधार शोधतो. लेकराला त्याचं वय शून्य ते 50 कितीही असू दे वडील त्याला धरून उचलून, कसे तशी झेपेल तसं कडेवर घेऊन दवाखान्यात नेतात. तो क्षण आठवा. गळ्यात एखादा अडकवून दुसरा हात वडिलांच्या खांद्यावर ठेवून आणि विश्वासाने मान टाकून अपत्य जातो, तो पितृप्रेमाचा अनोखा आविष्कार असतो.

सामना व पिताश्री

लहानपणी मला कुत्रा चावला तेव्हा दादा दवाखान्यात न्यायचे तेव्हा घरी गाड्या नव्हत्या. गावात असलेला टांगा ना दुरुस्त होता. शिवाय दादा तेव्हा अशक्त आणि आजारी होते. पण त्यांनी मला उचलले तेव्हा जगातील सर्व दृष्ट शक्तींची सामना करायला ते समर्थ आहे तसेच मला वाटलं. हा विश्वास बाप लेकाच्या बाप लेकीच्या नात्याचे सामर्थ्य असतो.

नकोसा हवासा पिता!

a

वडिलांच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यात निळा शिऱ्यांनी भरलेल्या त्या वळयामध्ये आपले बालपण असते. त्या जाळीमे वृद्ध कृश हातांनी आपले भविष्य जोपासलेले असते. आज ते थकले तेव्हा आपली त्यांना गरज आहे. आपण वृद्ध झाल्यावर आपली मुलं कशी वागतील? आपण जे पेरणार तेच उगवणार! एक आई-वडील चार-पाच मुलांना सांभाळतात. चार-पाच मुलांपैकी किमान एक मूल किंवा एकाने दोन दोन महिने वाटून सहा मुलं वृद्धपित्याला सांभाळू शकत नाहीत का? वडील व्यसनी आहेत म्हणून त्यांना कुठेतरी टाकून दिलं असं सांगणारी सुद्धा एक मैत्रीण भेटली. मला धक्काच बसला.

वृद्धा आई-वडिलांना सांभाळायला सरकारला कायदा करायची वेळ यावी? विचार करा मुलांच्या भेटीसाठी आसुसलेल्या वडिलांना आपल्या भेटीने किती आनंद होईल? त्यांची खुशी काय विचारता? मग ते तोंड भरून आशीर्वाद देतील.

बीते तेरे जीवन की घडिया,
आराम की ठंडीच्या छाव मे!
काटाभी ना चूभने पाये कोई,
मेरी लाडली तेरे पाव मे!!
हॅप्पी फादर्स डे!
बेटा हमारा बडा काम करेगा,
पापा कहते है बडा नाम करेगा.

28 देवाक काळजी

देव सगळी काळजी घेतो. फार पूर्वी एका कॅलेंडरवर, देव आहे, अशा शीर्षकाने खाली एक जाहिरात होती. तेव्हा सकारात्मक वाटे. देव आहे का नाही हा वाद बऱ्याचदा घातला जातो. पण देव ही शक्ती आहे हे सगळ्यांनाच कबूल करावं लागतं. डॉक्टर श्रीराम लागू नी देवाला रिटायर्ड करा वगैरे असे लेख लिहिले होते. क्वचित नास्तिक असले तरी देव आहे ही संकल्पना प्रत्येक व्यक्तीच्या मनात असते.

कुणी कर्मकांड, तर कुणी श्रद्धेने भक्ती भावाने पूजा करतो. कोणी शो करतो आणि ईव्हेंट करतो.

आज लिहावसं वाटलं कारण माझी मैत्रीण म्हणाली की नवरात्रीचे नऊ दिवसाचा मेनू मी ठरवला. एक दिवस श्रीखंड एक दिवस बासुंदी एक दिवस शेवयाची खीर एक दिवस गव्हळ्याची खीर एक दिवस पुरणपोळी इत्यादी इत्यादी. त्यावर माझ्या मनात आलं गोरगरिबांना आज महागाई एवढी वाढलेली असल्याने दोन वेळा जेवण मिळणं अवघडे अशावेळी देवी काय फक्त हिचा मेनू बघून खुश होणार आहे का?

आपल्याला जे आवडतं आपल्याला जे खायचं असतं ते आपण देवाला प्रसाद म्हणून त्या त्या पारंपारिक ऋतूनुसार आपल्या संकल्पनेनुसार आपल्याला आई-वडिलांनी सांगितलं असेल त्यानुसार आपण तो पदार्थ खाद्यपदार्थ देवाला नैवेद्य म्हणून दाखवतो आणि तो आपणच खातो. असं म्हटलं जातं जर देव प्रसाद खायला लागला तर लोक देव देवाला प्रसाद दाखवणेच बंद करतील. तो प्रसाद आपल्याला स्वतःलाच खायचा असतो

म्हणून आपण वारंवार नैवेद्य दाखवतो. काही संतांच्या बाबतीत तर रोज केलेला स्वयंपाक सुद्धा देवाला दाखवून नैवेद्य करून खावा असं सांगितलं जातं. या सर्व गोष्टींचे चांगले फायदे सुद्धा मिळतात. मनशक्ती वाढते, जेवण अंगी लागतं. जेवणातील सगळे चांगले पदार्थ पोटात जातात. अजूनही एक गोष्ट आठवायचं कारण म्हणजे आमची बिल्डिंग अगदीच जुनी आणि कशीशी झालेली असताना मी आजारी पडल्यावर आपण कसं करावं? हा मोठा प्रश्न मला पडतो. माझ्या 90 वर्षाच्या सासूबाईंना माझ्याकडे आणणे भागच होतं. तिसरा मजला लिफ्ट नाही. जिन्यात थोडी पडझड झालेली, पॅसेज मध्ये शेवाळ आलेल आहे. अशावेळी मी त्यांची कशी सेवा करणार? त्यांना स्वतःला सुद्धा ती शिक्षा होती आणि मला देखील ती शिक्षा होती. कारण माझे वय 65 च्या दरम्यान आले आहे आणि त्या 90 वर्षाच्या आहेत. नोकर माणसांची हल्लीची परिस्थिती आपल्याला माहिती आहे. सुविधा अयोग्य होते. वृद्ध लोकांना स्वीगी आणि झोमॅटो चे जेवण आवडतच असं नाही. त्यावेळी देवाने त्यांची दुसऱ्या भावाकडे राहायची सोय केली. तिथून त्यांनी फोन केला. मी कसे आहात काय आहात विचारले. तेव्हा त्या म्हणाल्या,

"इतकी चांगली मोलकरीण मिळाली आहे. मला आई आई म्हणते. माझी सगळी सेवा करते. मी दुपारी बागेत जाऊन बसते. पक्षी किलबिलतात. झाड, शाळेत जाणारी मुल मजा येते. जेवण चवदार करत असते. तस फारसं ऊन नसतं हवा चांगली आहे. जी स्वयंपाकाला 24 तास बाई आहे ती प्रत्येक पदार्थ मी सांगेन तसा सांगेन त्या पद्धतीने करते आणि मला तिने बनवलेले जेवण खूप आवडतं. घरचे नोकरीवर जातात ते संध्याकाळी येतात. ते थोडे काही वेळ गप्पा मारतात. फोन असतो, मोबाईल असतो, टीव्ही असतो. एक नर्स तरुणी तळपत चोळायला येते. देव आपली सगळी काळजी घेत असतो.

तुला पण बरं वाटेल. तुझ्याही घराचं रिडव्हलपमेंट पटकन होईल. देवाच्या मनात आलं तर देव लगेचच पुनर्विकासक उभा करतो आणि काम होऊन जातं. अशी घरात राहून राहून तुझे होणारे हाल आम्ही जाणतो, तसा तो देव सुद्धा जाणतोच ना! ”

“पूर्वी आपल्या घरी नवरात्र मांडायची किती धूम असायची पण तब्येतीला झेपता येईना झाल्यावर आपण ते बंद केलं. सगळं बंद पण मनातल्या मनात पूजा करत राहायची. ”मी

“देवाची प्रार्थना करायची. मंत्र म्हणायचा कंबरेच्या दृष्टीने बसून पोथी वाचन होत नसेल तर राहु दे. नाही तर मनातल्या मनात मंत्र म्हणत रहा. आरोग्य जपत रहा. घराबाहेर पडून देवीची ओटी भरता येत नसेल तर घरी येणाऱ्या मोलकरणीला साडी बांगडीजोडी दे किंवा रोख रक्कम दे. त्या देवाने आज 90 वर्षाची होईपर्यंत माझी काळजी घेतली. तो देव सगळ्यांचीच घेत असतो. तुझी घेईल. देवीला शक्ति माता म्हणतात. देवी ही आई असते. आई मुलाचं कधीच वाईट करत नाही. जय देवी आई माता. देवाक काळजी.

*

29 उपस्थिती

एखादे व्यक्तीची उपस्थिती सुद्धा आपल्याला खूप आनंद देऊन जाते. समाधान देऊन जाते. त्या व्यक्तीच्या सोबत वावरलो की आपण बदलून जातो. त्या नात्यांमधला आनंद, समाधान आपल्या वागणुकीत दिसू लागतं. कृतज्ञतेने आपण त्या व्यक्तीच्या डोळ्यात बघत असतो. किरकोळ किरकोळ विनोदांना हसत असतो. दोघांना समोरच्या व्यक्तीला ही प्रेरणा मिळते.

समोरची व्यक्ती दुःख कष्ट विसरते. निदान काही काळ तिला गुड फिल वाटतं. मनाचा कल्लोळ शांत होतो.

काही लोक सदैव दुर्मुखलेली असतात. काही जणांना काहीतरी सामीश बोलून अस सुचवतात जणु आपण फार चतुर रसिक आहोत. हे असं दाखवायचं असतं, हे बोलायला सुद्धा काहीना आवडतं. तर काही लोक सदैव दुर्मुकलेलं तोंड करून वावरत असतात. या लोकांची उपस्थिती हवी कि नको हे समोरच्या व्यक्तीच्या अभिरुची वर अवलंबून असते. समान गुणेशू सख्ख्यं! या न्यायाने माणसाची मैत्री होत असते. त्यामुळे काही काही वेळा अशा प्रकारातल्या विचित्र लोकांची उपस्थिती टाळली जाते.

नातवंड बालक शेजारची लहान मुलं यांना सुद्धा कोणती आजी/ कोणते आजोबा आपले लाड करतात हे बरोबर कळतं. अशा आजी आजोबांची उपस्थिती त्यांना आवडते. अन्यथा ते एकदम गप्प गप्प बुजल्या कावल्यासारखे होतात.

तेरा मुझसे है पहले का नाता कोई,

युही नही दिल लुभाता कोई!

हे वाक्य खरं असलं तरी समोरच्या व्यक्तीची वर्तणूक आणि दर्शनीयता सुद्धा तिची उपस्थिती प्रार्थनीय आहे की नाही त्यावर परिणाम करते. काही काही व्यक्तींची वृत्ती अशी असते जे दुसऱ्याला समाधान देतात. तर काही नकोशे ठरतात. बाहेरुन आतून शुद्धता या बाबतीत विचारात घेतली जाते.

शंभर टक्के आरोग्य हे कुणाच्या हि बाबतीत सहसा तरी शक्य नसतं. सात्विक तब्येतीच्या विकार काहीतरी चालूच राहतं. पण या सहवास योग्य व्यक्तीने बोलणे बरे वाटते. किरकोळ किरकोळच उपाय आपल्या आरोग्यासाठी हव्याशा व्यक्ती सांगतात किंवा त्यांच्या सहवासात त्यांच्या स्पर्शाने त्यांच्या बोलण्याने नुसत्या त्यांच्या जवळ आल्याने पण बरं वाटतं. गुरुदेव भक्त हे सुद्धा त्यांच्या ओरांमध्ये किंवा तेजोवलयात आल्यावर जसा बदल आपल्या शरीरात घडवतात तशाच प्रकारे या चांगल्या व्यक्ती आपल्या शरीरात चांगले घडवतात. सज्जन प्रेमळ व्यक्ती हल्ली तशा दुर्मिळच असतात पण त्यांच्या सहवासात आपण खुश होतो.

काही शुभकार्यांना पार्टीला मेजवान्यांना गेट-टुगेदर किंवा आनंद मेळाव्याला सुद्धा जायला कधी कधी आपल्याला टेन्शन येतं. कारण की तिथे आनंद मिळाव्यात अशा व्यक्ती असतात ज्या आनंद हिसकावून घ्यायचा प्रयत्न अधिक करतात. त्या नकोशांची उपस्थिती आपल्याला खटकते.

आपण कुणाला आनंद देऊ शकलो नाही तर निदान त्याला टोचून बोलू नये, (हो आणि मग त्या अधिकच लोकशा ठरतात) एवढी सुद्धा जाणीव त्या लोकांना नसते. साळुबाई सारखे एकमेकांना काटेरी टोचे मारून त्या लोकांना स्वतःला आनंद मिळतो पण हळूहळू लोक त्यांना टाळू लागतात. त्यांची उपस्थिती समाजात फारशी हवीहवीशी मानली जात नाही. केवळ पैसा स्वार्थ

पद याच कौतुक म्हणून कधी कधी त्यांना समोर उभं केलं जातं पण त्यात नकोसा भाव दडलेला असु शकतो. तो उपचार नकोसा होतो.

हव्याशा याउलट नकोशां अशा काही व्यक्तींची उपस्थिती अशी असते की त्या दुसऱ्याला अस्वस्थ करतात. त्या समोरच्याचे दुखऱ्या जागेवर टोचतात.

उदा. तुला आयुष्यात काय हवं हे विचारल्यावर आपण आपल्याला जे हवं त्या दोन मोठ्या गोष्टी सांगितल्यावर ती कमतरता आपल्याला आहे हे माहिती असते. पण समोरची व्यक्ती बोलून बोलून आपल्या त्या समजून आलेल्या कमतरतेवरून आपल्याला टोमणे हाणते. आपल्यातली उणीव वारंवार दाखवते. अशा व्यक्तींच्या उपस्थितीत नको वाटते.

Some people bring happyness wherever they go but some people bring happyness whenever they go.

some people give happyness when they speak, some people do so when they are left or when they shut up.

आपण कसे बनायचे आपली उपस्थिती कशी ठेवायची हे आपणच ठरवायला हवं ते सोपं नसतं पण प्रयत्न करायचा.

***

a

30 हे करू या का?

माणूस आयुष्यभर विचार करत राहतो हे करू या का ते करूया? हा निर्णय घेऊ या की तो निर्णय घेऊ या? स्थलांतर करू या, दुसऱ्या गावी राहायला जाऊ या? घर बदलू या? नोकरी बदलू या? मित्रमैत्रिणी बदलू या? कट्टे बदलू या? हे करू का ते करू या? मै यहां जाऊ या वहा जाऊ? अशा कायम निर्णयाच्या गर्दीमध्ये आणि पर्यायांच्या भाऊ गर्दीमध्ये एकही पर्याय योग्य वाटत नसतो. उत्कृष्ट हवे म्हणून आतुर झाल्यासारखे निघालो तरी कुठेतरी सुख मिळायचे आशेनी जाते आणि तोंड फोडून घेतो. असं का होतं? आता काय करायचं, आता काय करायचं? एका पूर्वीचे नाटकात तो माणूस सारखा आता काय करायचं आता काय करायचं? असं हताश होवून, वर पाहताच, एकसुरीपणे म्हणत घराच्या /झोपडीच्या दारात बसत असतो आणि बाहेरच्या जगाशी संबंध तोडून टाकतो. तशाच परिस्थितीत माणसे बरेच वेळा जात असतात.

काय करावं हा निर्णय स्वतः घेणे सोपे कधीच नसते आणि चुकलेल्या निर्णयाची जबाबदारी घेणं तर जास्ती अवघड असतं.

मार्केटिंग करणारे हुशार असतील तर पुस्तक विकतात, गाद्या, औषध, तेल, योजना, वस्तू विकतात. न लागणाऱ्या गोष्टी गळ्यात मारतात आणि मग घरातलं ते सगळे पसारे आणि अर्थव्यवहार बघून असं वाटतं आता काय करायचं?

काय करावे? जीवन सोपे आहे, या शीर्षकाचे काही लेख वाचले की असं वाटतं, कुणाचं असतं आयुष्य सोप्प? आपलं तर नाहीये!

लहान वयात आपण आपल्याला अनुभव नाही, आपल्याला कोणी फसवेल म्हणून काय करू काय करू असं विचार करून बरेच निर्णय टाळतो. वृद्धापकाळात आता आपल्या अंगात शक्ती नाही, चोराने आपल्याला, अथवा अन्य कोणी ढकलून दिल आणि पाडलं तरी आपण मरून जाऊ, अशा वेळी आपण कुठे हे व्यवहार करायचे असं म्हणून आपण पाय मागे घेतो.

काय करू, काय करू असं म्हणून काहीच करत नाही. मला आठवतं माझ्या बहिणीचे मिस्टर वारले तेव्हा ती म्हणाली की मी हे सगळं सोडून पुण्याला दुसऱ्या फ्लॅट आहे तिथे जाऊन राहीन. माझे आई वडील वारले तेव्हा आम्ही ठरवलं होतं की आपण हे सगळं सोडायचं आणि भावाकडे राहायला जायचं. पण गेलो नाही. माझ्या वहिनी वारल्या तेव्हा त्यांच्या मुलांनी ठरवलं होतं की आपण हे सगळं सोडून पुण्याला जाऊन राहायचं. माझ्या मैत्रिणीने तिचे पती वारल्यावर ठरवलं होतं की परदेशी मुलाकडे जाऊन राहायचं. बरेच दिवस चर्चा केली हे करू का ते करू! मग तिकडे जायचं म्हणजे सर्व तयारी हवी म्हणून इथूनच ऑपरेशन करून जायचं (गुडघ्याचं) का तिकडे गेल्यावर करायचं? या घराचं काय करायचं? हे भाड्याने द्यायचं? काही सामान विकून टाकायचं ठरवले. खूप गोंधळ मतांतर चर्चा यातच बराच काळ गेला. पण ईथे राहायला लागले. वेळ जातो, ताण येतो, आयुष्यात कुठलाही निर्णय घेणे सोप्पं नसतं.

असं म्हणतात चुकीचा निर्णय घेणारी माणसं सुद्धा आयुष्यात यशस्वी होतात पण कोणत्याच निर्णय घेऊ न शकणारी माणसं मात्र अपयशी होतात. तसेही असेल पण आपण घेतलेला निर्णय चुकला तर आयुष्याच्या अशा टोकावर आपण येऊ शकतो की तिथून आपण परत सुद्धा जाऊ शकत नाही.

रडणे आणि घेतलेल्या निर्णयांचा पश्चाताप करण्यापलीकडे हातात काहीच राहत नाही.

घर हा फार मोठा प्रश्न असतो. पूर्वी तरी बंगले असायचे त्या बंगल्यांमध्ये काही तोडफोड करता यायची. लहान वाटला तर वरती एखादी खोली बांधता येत असे. आजूबाजूला बदल करता येत असत. आता त्या फ्लॅट मधल्या त्या पाचशे स्क्वेअर फुटच्या जागेत आपण काहीच बदल करू शकत नाही. त्यामुळे आहे त्याच्यातच कसंतरी कोंबून कांमून किंवा इकडची भिंत तिकडे करून, इथे रॅक, तिकडे कपाट लावून हे टेबल तिकडे सरकवून अशी आपल्याला तडजोड करावी लागते. पण तरीही राहतं घर सोडून दुसरीकडे जाऊन राहण्याचा निर्णय होतच नाही. तो किती अवघड असतो.

वाटते की सर्व बहिणी भाऊ मिळून एकत्र राहू या. एकाच जागी राहू या, एकाच बिल्डिंगमध्ये चार जण विकत/ भाड्याने घेऊन जाऊ या. पण असं ठरवलं तरी भाड्याची रक्कम बघून सुद्धा भीती वाटते. त्यामुळे माणूस बदल करायला घाबरत असतो. न्यूटनच्या इनरशिया या नियमानुसार माणूस नवीन निर्णय घ्यायला कंटाळाच करत असतो.

माझ्या मिस्टरांचे मित्र आहेत. एकटेच राहतात. सारखे सारखे म्हणतात की मी आता वृद्धाश्रमात जाणार. सतत आम्हाला वृद्धाश्रम शोधायला लावतात आणि आम्ही मग त्यांच्यासाठी वृद्धाश्रम शोधतो. पण शेवटी ते कुठेच जात नाहीत. घरीच राहतात.

माझी एक मैत्रीण तर रात्री हार्ट अटॅक ॲडमिट झाली. तरी सुद्धा, कधीपण वृद्धाश्रमात जायच्या वेळी ती म्हणायची मी 75 च वर्षाची आहे. मी पुढच्या वर्षी राहिला जाईल. असं करून तो निर्णय न घेण्यात तिचा बळी गेला.

माझं पण काही वेगळं नसतं. मी बऱ्याचदा ठरवते की नाही आपल्याला आपल्यात बदल हवा. काहीतरी जीवनशैली बदलायला हवी. आपण काहीतरी डायटिंग करुया घर बदलु या. निर्णय घेऊन आहे त्या स्थिर एनर्जी, ठहराव यातून बाहेर पडायला हवं. पण हे स्थिती स्थापकत्व जे आहे ते माणसाला प्रगती करू देत नाही. कारण की आपण जी करणार ती प्रगतीच आहे का अधोगती आहे? हा पण प्रश्न पडतो. पुढे जाऊन निर्णय चुकला म्हणून परत येण्याला सुद्धा फार हिम्मत लागते. फार मोठे नुकसान त्या चुकीच्या निर्णयाने होऊ शकतं. त्यामुळे मी काय करू मी काय करू हा प्रश्न माणसाच्या मनात सदैव रहातच असतो.

तुम्हीTo be or not to be that is the question म्हणता. औषधोपचार आणि गुण येत नसेल तरी डॉक्टर बदलायची सुद्धा हिम्मत होत नाही. निर्णय होत नाही. गल्लीबोळात दवाखाने असतात पण हा डॉक्टरचा अनुभव वाईट, त्याचा वाईट, याचा चांगला, त्याचा बरा, हा महाग, तो स्वस्त याच्यामध्ये आपण कुठलाही निर्णय घेता न घेता आहे ते चालू ठेवतो.

पुढच्या वेळी ऑपरेशन करायला सांगितल्यावर माणसे आठ आठ दहा वर्ष निर्णयांमध्ये घालवतात. लग्नाचा निर्णय सुद्धा असाच असतो. पटकन होत नाही. कधी चुकतो. कधी दीर्घकालीन संकटाची मालिका ठरतो. सिनेमाला जायचं, नाटकाला जावं, फिरायला जावं, देवळात जावं कट्ट्यावर जावं का तलावावर फिरून यावं असे बरेच विचार मी रोज करते. पण करत काहीच नाही. खिडकीशी बसून सूर्यास्त बघत बसते.

काय करू मी काय करू मी काय करू असंच म्हणत बसते. खूप कंटाळा आला की टीव्ही लावते इडियट बॉक्स आहेच. आपल्या सगळ्यांच्या

मदतीला मी काय करू हा माणसाचा चिरंतन प्रश्न आहे? को अहम असं बाळ रडतं ते मी कोण आहे म्हणून कदाचित रडत नसावं मी काय करू म्हणून रडत असावे असं मला वाटतं.

**

31 खरेदी जत्रा

व्यक्तीचे एका आयुष्याच्या ठराविक क्षणानंतर आयुष्यात बदल फारसा घडणं शक्यच नसतं. असेही हल्लीचा काळ असा आहे की क्षणोक्षणी टेक्नॉलॉजी बदलत असते समाज बदलत असतो पण म्हणावा असा भावनिक बदल होतच नसतो.

पूर्वी एकत्र कुटुंबात कुटंबना भांडण वाद नात्यांचा स्तर, आई, नात्यांची गुंतागुंत यामुळे वेळ कसा पटकन चालला जायचा. हल्ली मोबाईल टीव्ही कॉम्प्युटर सिनेमे हे सगळं असूनही वेळ कधी कधी खायला उठतो.

क्लब मध्ये जाऊन पत्ते कुठतरी मजा करणारे रमी खेळणारे हे प्रकार पूर्वी सिनेवात दाखवायचे. तेव्हा ते आपल्याला माहिती होते. कट्टे भिशी ग्रुप हे सुद्धा आपल्याला माहिती होते. पण हल्ली एक नवीनच व्यसन समाजात निर्माण झाला आहे ते व्यसन म्हणजे खरेदी करणे.

पूर्वी सेल लागला की पावसात पुण्याला सेल मधील साड्या चांगल्या मिळतात म्हणून लोक धावत जायचे. मुंबईला कलानिकेतनला साड्यांचा सेल लागतो म्हणून त्या सेल साठी बायका धावत जायच्या. आता साड्यांच्या दुकानांवर अशी परिस्थिती आहे की साडी बदलून ड्रेस मिळणार नाही असा बोर्ड लावला जातो. मानपानाला सुद्धा हल्ली ड्रेसच कापड दिले जातं. साडी दिली जात नाही. तर विषय हा आहे की खरेदी यात्रा पूर्वी ही होती. देण्या घेण्यासाठी होईल, उपयोगी होईल याबद्दल म्हणून साड्या खरेदी करत. दिवाळीत द्यायला होईल, वाढदिवसाला द्यायला येईल, अशा कारणाने सेल मध्ये खरेदी केली जात असे. स्वस्तात मिळत म्हणून सेलमध्ये चपला पुस्तकं

कपडे वस्तू घेतल्या जातात. सबसे सस्ता दिन म्हणून मग ग्रॉसरी खरेदी करायची फॅशनच आली. या खरेदीचा आजार एक मोठ्या प्रमाणात वाढतो आहे.

आपल्या जीवनातील काहीतरी कमतरता अथवा उणीव असेल ती भरून काढण्यासाठी माणूस खूप खरेदी करत असतो. पूर्वी दोनच कपडे असायचे एक मांडीवर एक दांडीवर! आता बायकांचे पुरुषांचे सगळ्यांचे कपडे यानी कपाटच कपाट भरलेली असतात. या खरेदीमध्ये अजून एक खरेदी वाढली ती म्हणजे सौंदर्यप्रसाधन!

स्त्रियांच्या बरोबरीने पुरुष सुद्धा सौंदर्यप्रसाधन खरेदी करत असतात. या खरेदी जत्रेला एकट जाण्यात काही मजा नसते कुणीतरी सोबत हवं की ज्याचं मत घेता येते. नाहीतर खरेदी करून आणलेली वस्तू दारात शिरताच नकोशी वाटायला लागते. बऱ्याच घरी तर खरेदी करून आणलेल्या वस्तू या घरात आल्यावर फेकल्या जातात आणि त्यानंतर उघडून सुद्धा बघितल्या जात नाहीत. इतकं खरेदीचे व्यसन समाजात वाढलेलं आहे.

या खरेदीत अजून एक भर पडली, ती म्हणजे ऑनलाइन खरेदी! या ऑनलाइन खरेदीनुसार व्हिडिओ बघून फोटो बघून, माहिती बघून खरेदी केली जाते. अर्थात फोटोतली वस्तू आणि प्रत्यक्षातली वस्तू यांच्यात फरक सुद्धा येऊ शकतो. रंग वेगळे येऊ शकतात पण त्यात क्रेडिट कार्डवर, पे लेटर असा पण ऑप्शन असल्यामुळे माणसं ऑनलाईन खरेदी सुद्धा करत असतात.

ऑनलाइन खरेदीची वस्तू परत करायच्या वेळी देव पण आठवतो. मी फूड प्रोसेसर घेतला आणि जागेत मावेना म्हणून दुसऱ्या दिवशी पासून मी तो

फूड प्रोसेसर परत करण्यासाठी आटापिटा करते अजूनही तो फूड प्रोसेसर नवा कोरा बॉक्स न उघडलेला माझ्या घरी पडलेला आहे.

ईझी रिटर्न असं लिहिलेलं असलं तरी ऑनलाईन खरेदीत हा धोका असतोच. पूर्वीच्या काळी खरेदीला एखाद्या मैत्रिणीला सोबत नेलं जायचं. हल्ली मॉलमध्ये बडी म्हणून एक बाई दिली जाते. जी बाई तुम्हाला खरेदीसाठी सेकंड ओपीनियन देत असते.

खरेदी सुलभ व्हावी म्हणून अनेक युक्त्या लढवल्या जातात पण एकूणच जागतिक मंदीमुळे खरेदी गेल्या दोन वर्षात कमी झाली आहे त्यापूर्वी तर खरेदीचा फुगवटाच होता.

खूप खाणं अथवा अन्नधान्य जंक फूड ड्रायफ्रूट्स, ऑनलाइन आधुनिक परदेशी मूळ असलेले पदार्थ, यांच्या खरेदीची क्रेझ खूपच वाढलेली आहे. पोटाच्या भुकेपलीकडेही अधिक हे अन्न मागवले जात, वाया जाते.

गणपती नवरात्र दिवाळी ख्रिसमस आणि गुढीपाडवा या पाच सणांना खरेदीचा वेलू वगनावरी वाढलेला असतो. बोनस घेऊन उसनी उधारवार काढून माणस सणाच्या वेळी जोरात खरेदी करत असतात. खरेदी जत्रेमध्ये एक फील गुड चा भाव असतो.

काहीतरी खरेदी करताना माणसाचं मन आनंदित होतं आपल्या खिशात असलेला तो पैसा आपल्याला उब देऊन जातो. खरेदीच्या मानसशास्त्रात फील गुड चा फार मोठा भाग आहे. कुठलाही व्यापारी स्वतःचे नुकसान पत्करून सेल लावणे, डिस्काउंट देणं शक्यच नसतं. तरीही सेल आणि डिस्काउंट या भ्रामक शब्दांच्या मागे धावून माणूस खरेदी यात्रेत सामील होत, फसत राहतो.

a

पूर्वीच्या काळी गावात एखादा रोड खरेदी साठी असे. वाण्यचं दुकान असायचं. एखादाच कपडे वाला असायचा किंवा जत्रेत मिळणाऱ्या आनंद हा एकमेव आनंद असायचा. आता वारंवार खरेदी वारंवार जत्रा, वारंवार खाणं, वारंवार मजा करणे खरेदी जत्रेची क्रेझ वाढते आहे. माणसाकडे कमोडिटी म्हणूनच बघितले जाते किंवा त्याच्या खरेदी शक्तीचाच विचार केला जातो आहे.

अतिरिक्त खरेदी ही पर्यावरण र्हासाला सुद्धा कारणीभूत ठरत असते. पण ते लक्षात न घेता माणसं खरेदी करत सुटतात. दिवाळीची खरेदी जत्रा चालू आहे.

आवश्यक ते जरूर घ्या पण अनावश्यक कचरा खरेदी करू नका हीच विनंती.

**

a

32 कपाटच कपाटे

आमच्या एका परिचितांनी घर विकले. ते दोघे ज्येष्ठ नागरिक स्वतंत्र राहत होते. नातवंड आणि त्यांची मुलगा आणि सून वेगळे फ्लॅटमध्ये राहत होते. त्या चौघांनी एकत्र राहायचं ठरवलं. याचे कारण की नातवंड फोरीन ला गेली. दोघं कपल्स हे वृद्ध होते त्यावेळी तिने जुनं घर मोडलं. संसारातल्या सर्व सामानासह विकून टाकायच ठरवलं. कारण की त्यांना मुलगा आणि सून म्हणाले की फक्त तुम्ही तुमचे कपडे आणि औषध घेऊन यायचे. बाकी सगळं सामान तुम्ही तुम्हाला जसं वाटेल तसं विल्हेवाट लावून टाका. माझे हे परिचित 75 वर्षाचे आहे म्हणजे 45 वर्षाचा संसार सॉरी पंचावन्न वर्षांचा संसार साठवला आहे. कदाचित सुरुवातीची दहा वर्षे आनंदाने उपयोगी म्हणून घेतला असेल आणि पुढे नंतर साठवणूक करून किंवा जमा करून करून तो संसार वाढला असेल. जागा मोठी घेतली म्हणून स्टोअर रुम मध्ये ठेवला असेल. तिला मी म्हटलं,

"कसं काय करशील तू किती सामान आहे तुझ्याकडे! "

त्यावर ती म्हणाली,

"हो ना ग! खरंच इतकं सामान, इतक्या वर्षांचा संसार, जिथे-जिथे बदली होत गेली तिथला जमा झाला. चपला सर्व भार अधिभार भेटीला आलेल्या वस्तू, कपडालत्ता खूप आहे. कपाटच कपाट9 कपाटच आहेत.

ते घर विकायला काढले त्याच्या 3 बेडरूम मध्ये नऊ लाकडी कपाट होती. शिवाय एक आपलं नेहमीच पैसे आणि दागिने ठेवायचं लोखंडी कपाट

आहे. 60 साड्या वगैरे कपाटात गाठोडं मध्ये सापडले. हल्ली सगळेच ड्रेस घालतात आणि पडायची भीती वाटू नये म्हणून पंजाबी सूट वापरले जातात. करोना काळात दोन वर्ष गोदरेज कपाट काय आणि बॅगग काय काहीच उघडलं गेलं नाही. त्यामुळे या साड्यांचं काय करायचं हा मोठा प्रश्न आला. मिस्टरांचे कपडे शर्ट पॅन्ट ड्रायव्हर झाडूवाला देऊन टाकले. साड्या एका स्वयंसेवी संस्थेला देऊन टाकल्या. खूप बदल्या होत. वर त्यामुळे घरात मोठ्या मोठ्या बॅगा होत्या. त्या मध्येच सामान घालून देऊन टाकलं. तांब्या-पितळेची भांडी एका मैत्रिणीने आनंदाने घेतली आणि घासून पुसून तिच्या घरामध्ये ठेवून दिली. त्या बदल्यात तिने आम्हाला दोन दिवस जेवायला सुद्धा बोलवलं. तांब्याच्या भांड्यातील पाणी वापरायचे म्हणून खूप तांब्याची भांडी आणली होती. पितळी कळशा कधीतरी माळ्यावर ठेवल्या गेल्या होत्या. त्या काळच्या पितळी वस्तू माळ्यावरच्या काढून त्याची पितळी मोड दिली. त्याच्या बदल्यात पितळी दिवा आणला. पण सुनबाई म्हणतो की हा दिवा तरी काय करायचा? घरात अडचण होणार. चांदीच्या छोट्या-छोट्या वस्तू पुष्कळ होत्या. चांदीची मोड द्यायला गेल्यावर काहीच पैसा येत नाही. त्यांचं काय करायचं हा मोठा प्रश्न होता. बजेट मध्ये बसतो म्हणून छोटे मध्यम अशी जरा हलक्या प्रतीचे चांदीच्या खूप वस्तू बक्षीस मिळतात. त्या मोडीत दिल्या. बारशाला जेवणाला वाढदिवसाला पूर्वी लेमन सेट, कुकर, भांडी दान करण्याची पद्धत होती. नंतर मधल्या काळात कॅसेरोल थर्मास दिले गेले. नंतर ती मोठी दिसणारी वाढगि येत. जी उपयोगी नाही. नंतर ती प्लास्टीकच्या वस्तूची भेट आली आली. झुंबर ही देण्याची पद्धत आली. जुने मिक्सर तीन आहेत. त्या सगळ्या वस्तूंनी माळा भरला आहे. ”ती.

a

नीता तर अशा वयात आहे की माळ्यावर सामान सुद्धा ती चढून काढू शकत नाही. गडी माणसाला चढवायचं तरी तिला बाजूला उभा राहून ते सगळं बघायला सुद्धा शक्ती नाही.

"होईल. "मी समजावल.

"अंथरुण, स्वेटर कार्पेट ब्लॅकेट सोलापुरी चादरी इतक्या होत्या की विचारू नको. अजूनही त्यातल्या शिल्लक आहेत. कारण की जुन्या त्यांचं काय करायचं हा मोठा प्रश्न आहे. या व्यक्तीला मी हा फ्लॅट विकणार आहोत. ती आम्हाला म्हणते की क्लीन पजेशन हवे. त्या सामानाच तुम्ही काहीही करा. त्या सामान फेकण्याचे साठी खर्च आहे. मी त्या खरेदी दाराना म्हटलं, मी ते सोडून जाते. तुम्ही पाहिजे ते याचं करा. तुम्ही वाटल्यास तुमच्या नोकरांना द्या. रंग लावायला येणाऱ्या माणसांना द्या. पण त्या व्यक्तीने सांगितलं, कि तुमच्या वस्तू तुम्ही डिसपोज करा आम्हाला क्लीन पझेशन हवं. "ती

तिचे नात्यातील मैत्रीण तिला मदतीला जाते. तिने बरंच सामान आवरायला मदत केली. ती मदतनीस पण वयस्कर आहे पण ती बरीच शक्तिशाली असल्यामुळे तिने स्वच्छता आवरणं एकत्र करणं काही गोष्टी गिफ्ट देणं काही गोष्टी दान देणं काही भांडीकुंडी मोडीत टाकणं ही सर्व कामात नीताला मदत केली. दिवसेंन दिवस ज्येष्ठ नागरिकांचा प्रमाणही वाढले आहे. त्यांना धड स्वतंत्र राहणे शक्य होत नाही एकत्र राहणं पण शक्य होत नाही. योगायोगाने मी माझ्या घरी ही पसारा भरलाय.

परत फोन आल्यावर मी तिला म्हटलं.

“नंतर कधीतरी आपण भेटू बोलू. पाण्याची ड्रम्स वगैरे शाळांना दे. झाडांच्या कुंड्या झाड सोसायटीला दे. ते रोप आवारात लावू शकतात. छोटे छोटे टेबल पीसेस किंवा फर्निचर पिसेस एखाद्या वृद्धाश्रमात दे. ”

त्यावर ती म्हणाली अगं वअनाथाश्रमात या वस्तू पोचवायला गाडी करायला गाडीवाला 7000 रु मागतो. नाहीतर आश्रमातल्या ऑफिस मध्ये वगैरे किंवा तिथल्या देता येतील, पण तेही शक्य होत नाही. जुन्या काळचा संगणक आणि टीव्ही होता पाच हजाराला विकून टाकला. ”ती

“चला बरं झालं तेवढे तरी पैसे सुटले. ” असं मी तिला म्हणाले. त्याचवेळी आमच्या शेजारी एक नव कुटूंब राहायला आलं.

“आमचं जुनं घर रिनोवशन ला टाकल्यामुळे आम्ही येथे राहायला आलो आहे. ” असं ती मैत्रीण म्हणाली.

“सासूबाईंनी सामान जमा केल आहे. त्या वारल्या. याचं काय करायचं मला मोठा प्रश्न पडतो. म्हणे सत्तर एक पांघरून अंथरुण चादरी ब्लॅकेट आहेत. जाताना काय सोबत नेणार होत्या का? जिवंतपणी का देऊन टाकले नाही मला कळतच नाही. ”ती

“माणसाला थोडीच माहिती असतं की आता मरण येणार आहे की या आठवड्यात येणार आहे. घराकडे सगळे आवरून बसाव. ”मी

“हो तेही खरंच म्हणा! ” तिने त्या सगळ्या कुठल्यातरी आश्रमात देऊन टाकल्या. जुन्या या वस्तूंमुळे नकारात्मकता येते, असे ती सांगत होती.

“असे आहे की नाही? उलट पारंपरिक गोष्टींचा दुकाने इथे आहे. तिथे पितळी तांब्याचे दिवे डबे, पान डबे या वस्तू गंगाळ मेणबत्तीचे स्टॅन्ड लोक हौशीने विकत घेतात. ”मी.

“कोणी नाही घेत. नुसते बघतात आणि छान म्हणतात आणि परत जातात. तांब्या-पितळेच्या वस्तूंना वारंवार पॉलीश ब्रासो करावा लागतो आणि त्यांची देखरेख करावी लागते. आधुनिक घरांमध्ये या गोष्टी वापरल्या जात नाहीत. ”ती

माझ्या मनात विचार आला खरच आपण किती सामान जमवतो. कपाटच कपाट कपड्यांनी भरलेली असतात. साड्या जुन्या झाल्यावर नजरेआड पडतात. बाहेर ठिकाणच्या लायकीचे नसतात. साड्या कपड्यांवर भांडी घेणे हल्ली अजिबात बरं वाटत नाही. कुणाला द्यायचं तर ती व्यक्ती सुद्धा ड्रायव्हर गाडी पुसणारे सुद्धा म्हणतात आम्हाला नवीन द्यायचं तर द्या जुने देऊ नका. शनि मंदिराच्या बाहेर बसलेले भिकारी सुद्धा शनिवारी कपडा घ्यायला तयार नसतात. या अतोनात कपड्यांचा काय करायचं? मध्यंतरी एका देशाने सुद्धा अतिरेकी कपडा खरेदी करू नका या कपड्यांचा वेस्टचे काय करायचं हा प्रश्न आपल्या पृथ्वीच्या पर्यावरणाला घातक ठरत आहे असं सांगितलं होतं.

अतिरेकी खरेदी हा मानसिक आजार असतो आणि घरात या अशा वस्तू साठवून ठेवणे म्हणजे देखील या हा मानसिक आजाराचा पुढचा प्रकार होर्डिंग असतो. अर्थात मानवी मनाने थोड्याफार प्रमाणात आपण जुन्या गोष्टी साठवत असतो. माझ्या त्या परिचित नीताचा फोन आला.

"सगळं सामान दिलं. फर्निचरसह फ्लॅट विकला. आम्ही पैसे घेऊन मुलाच्या सोबत राहायला आलोय. घरे घरासमोर कारंजा आहे. चकचकीत घर छान वाटतं. "

खूप सामान मी/ आम्ही साठवलं आहे. आम्ही मुलांना म्हणतो आमच्या माघारी तुम्ही फेकून द्या. पण आज वाटतं नीताला निदान तिच्या जिवंतपणी तरी घेतलेल्या सामानाची विल्हेवाट लावायला मिळाली हे खूप चांगलं झालं.

तिच्या डोळ्यासमोरच ह्या वस्तू सत्कारणी थोडे फार का होईना उपयोगी ठिकाणी दान दिल्या गेल्या.

घरी कपाट कपाट सामान असेल तर आजच थोडी आवरासावर करा. न लागणाऱ्या वस्तू काढून टाका. ते आपल्या मानसिक आरोग्याला ठीक नसतं. मी तुम्हाला सांगत असले तरी मला सुद्धा ते कठीण जातं. माझ्या मळ्यावर ते चाळीस वर्षापासून ज्या वस्तू ठेवल्या त्या मी कधीही बघू शकले नाही. कारण की वय वाढले कि कंबर दुखते.

सामान कपाट कपाट भरून ठेवू नका. पूर्वीच्या काळी एक दांडीवर आणि एक मांडीवर अशी दोनच वस्त्र असायची. आता शंभर साड्या झाल्याची पार्टी दिल्या जातात. छोट्या-मोठ्या फोल्डर मध्ये साड्या शरारा पार्टी ड्रेसेस भरून ठेवले जातात, जे कधीही वापरले जात नाहीत. कपाट रिकामी करा. वेळीच काही देऊन टाकावे आणि थोडं हलकं व्हावं

हा लेख लिहिल्यावर मला थोडा हलका झाल्यासारखे वाटते. आवरायला नोकर बोलावले आहेत. तरी पण माझ्या घरातली कपाट रिकामी करून हलकं कधी व्हायचा योग येईल?

a

33 आता बास

बऱ्याच वेळा एखाद्या दुःखाचं अथवा वैतागाचा अतिरेक झाला, ओव्हरडोस झाला की आपण म्हणतो, ‘ देवा आता बास! ’ माणूस आता बास कधी म्हणतो? एक मर्यादेपर्यंत माणूस सगळं काही सहन करत असतो. आनंद, दुःख, वैताग, त्रास, वेदना, कष्ट आणि त्यानंतर त्याला जेव्हा वाटायला लागतं, खूप झाल, रबरी ताणामुळे तुटुन शकते, तेव्हा तो म्हणतो आता बास!

तसं सुखाच्या बाबतीत सुद्धा अस असतं का? नाही खाण्याच्या बाबतीत असू शकते की आपण पोटभर खाल्ल्यावर म्हणतो, ‘नको नको आता अधिक देऊ नको. आता बास! ’ पैसा इस्टेट प्रॉपर्टी घर प्लॉट जमिनी शेअर्स व्याजदर याबाबत आपण कधीही म्हणत नाही की आता बास! कारण की आपल्याला ते अजून अजून अजून अजून हवं असतं. आता बास असं म्हणण्यात जो बास शब्द आहे त्याचा संबंध म्हणजे बासुरी किंवा पोकळ बांबू याच्याशी असावा का? आता पुरे, आता बास कशा प्रकारे हा शब्द वापरला जातो?

माणसाची हाव कधीच संपत नसते. पोट भरलं तरी आपण त्या टीचभर जीभेसाठी खात राहतो. खात राहतो. नंतर वजन वाढतं, आजार लागतात. तरी पण आता बास हे म्हणत नसतो. कारण की तो येणारा आनंद, मिळणारं सुख, ते स्वाद सुगंध मेजवानी युक्त जेवण, अजून अजून हवं. म्हणजे थोडक्यात काय प्रत्येक गोष्टीची मर्यादा संपत आली कि माणूस म्हणतो आता बास, देवा आता बास!

कितीही जमीन, बंगले शेअर्सची चळत असली तरी ती दौलताबाद माया कमीच पडते. सहा फूट जमीन दफनाला लागते आणि तरी हाव ठेवत धावत शेवटी माणूस मरून पडतो. बुफे जेवण करताना आपण पाहतो. किती खाल्लं तरी, अजून थोडा हलवा, थोडा खाऊ, एक प्लेट आईस्क्रीम, दोन प्लेट आईस्क्रीम, पदार्थ खावासा वाटत असतो आणि मग शेवटी आपण म्हणतो आता बास!

कुठे थांबावं हे आयुष्यात ज्याला कळतं तो खूप यशस्वी होतो. भांडणाच्या वेळी, दरम्यान सुद्धा नवरा बायकोला, बायको नवऱ्याला, बहिण-भावाला, मित्र मित्रांना आता बास असं म्हणतात. चिडवाचिडवी चा पण अतिरेक झाला की आता बास असं म्हटलं जातं.

अति काम करणाऱ्याला सुद्धा असं म्हटलं जातं का की आता बास? नाही तो काम करतो तोपर्यंत त्याला कर कर करून लावतात. किती केल तरी काम करतच रहावं असं म्हटलं जातं. विश्रांती घेणाऱ्याला मात्र आता विश्रांती बास! आता फोनवर बोलणं बास! आता तू पुढचं काम कर असं सांगितलं जातं.

अधिक घरांचा मोह धरू नये. पूर्वीच्या काळी एवढी घर का बांधली जात नव्हती? कारण की एकत्र कुटुंबात एका घरात पंधरा-पंधरा वीस-वीस माणसं राहत असायची. आता एका चार माणसं असलेल्या कुटुंबाला आई वडिलांची आणि दोन मुलांची दोन वेगळी अशी चार घराची मागणी असते. बांधकाम वाढली आहेत. प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आणि स्वतंत्र बेट झाले आहे. त्याला स्वतःच्या नावाने काहीतरी प्रॉपर्टी करायची आहे. हे सुद्धा आता थांबले पाहिजे.

a

खर म्हणजे आता बास हा शब्द आपल्या स्वार्थ, फायद्यानुसार माणूस बदलत असतो. एक सुरी आयुष्याचा कंटाळा आला की आपण म्हणतो, आता बास! काहीतरी बदल हवा! बदल होतो तेव्हा आपल्याला असं वाटत आता हे बदल बास. एक सूरी आयुष्यात आता बास नंतर काहीतरी बदल हवा बदल होतो तेव्हा आपल्याला असं वाटत, आता हे बदल आता ही एक्साइटमेंट आता ही अस्वस्थता बास! सुख पण दुखत. कुठलीही एक सूरी वाट आली आयुष्यात कंटाळा देते. कुठलेही असो ती एका लिमिट नंतर एका मर्यादेनंतर असेही होते. माणूस म्हणतो आता बास.

आज पर्यावरणाचा सुद्धा असंच झालं आहे. पर्यावरणाची इतकी हानी आपण केली आहे, की आता म्हणायला हवे आता बास! अवकाळी पाऊस, ऋतू बदल, आजार आणि वादळांचा मेळ जाणं, यामुळे निसर्गच आपल्याला सांगतोय की मला ओरबाडलं आता बास!

त्यामुळे मित्र-मैत्रिणींनो आता आपण पर्यावरणाची हानी करण्याच्या बाबतीत सुद्धा आता बास, हा इशारा ऐकून थांबलं पाहिजे. नवनवीन झाडे लावली पाहिजेत. आहेत ती झाडे जगवली पाहिजेत.

सावध ऐका पुढल्या हाका

अतिरेक करू नका!

पर्यावरणाचा ऱ्हास,

मित्रांनो आता बास!

आता बास आता बास!

**

a

34 किती सांगायचय तुला

माणसं खुप बोलतात खूप म्हणजे खूप बोलतात. एका गुरु नी फक्त मंगळवारी मौन सांभाळा असं सांगितल्यावर सुद्धा ते मौन पाळू न शकणारे लोक असे देखील आहे. विपश्यना ध्यानधारणा ला आणि त्या मेडिटेशन साठी गेल्यावर बोलू नका सांगतात. त्यांचं म्हणणं ते आवश्यक आहे.

तर असं की बोलतांना माणूस खूप खोटं, अर्धसत्य, कमी जास्त तिखट मीठ मसाला लावून सांगतो आणि त्याच्यासोबत विचारांची मालिका सुद्धा तयार होते. त्यामुळे न बोलणे हा मनशांतीचा सगळ्यात सोपा पर्याय असतो आणि या मौनाच्या मिठीमध्ये आपण परमेश्वराच्या अधिक जवळ जातो. गप्प रहाणे इतके त्रासदायक का असतं? हा प्रश्न मला स्वतःलाच पडतो. कारण मला कायमच बोलायला कुणीतरी लागतं. टीव्ही वाचन गाणी पूजा असतं. किरकोळसंवाद असतो तरीही कुणाची तरी बोललं की बरं वाटतं. वर्षानुवर्षाचा मनात जे साचलेलं असतं, त्याचा निचरा कुठेतरी व्हावा असं वाटतं.

वर्तमानपत्र वस्तु त्यातल्या बातम्यांमुळे निर्माण झालेल्या प्रतिक्रिया भावना विचार त्यां भावनानासुद्धा कुठेतरी व्यक्त होण्याची गरज आहे.

एखादी गोष्ट तुटली, खूपली तर तिच्यावर चर्चा करावीशी वाटते. काही दुखत असेल, काही आजार असेल तर औषध उपचार तर भरपूर असतात पण त्याव्यतिरिक्त कुठलातरी देशी उपाय काही तरी किरकोळ औषध होईल अशी बोलणी झाली की बरं वाटतं.

तेव्हा असेच आजार झालेल्या अन्य कुणाचे अनुभव बोलता-बोलता कोणी सांगितलं की बरं वाटतं. त्यांचे ऐकिव अनुभव सकारात्मक असतील म्हणजे याला याला आमच्या समोर औषधाने बरं वाटलं. ऑपरेशन नी ठणठणीत झाला, ऐकल तर मग ठीक पण वाटतं. पण 'नाही हो त्याला बरंच नाही वाटलं. अटल बिहारी वाजपेयी, लतादीदींच्या गुडघ्याचे ऑपरेशन कुठे व्यवस्थित झालं? ते त्या ऑपरेशन नंतर चालू शकले नाही. ' अशी व्यक्तीसांगते. ऐकायची वेळ येते तेव्हा मग त्या चर्चेतला फोलपणा जाणवतो किंवा मन थोडं नकारात्मक भावनेने विचाराने भरून येतं

बालपणापासून आपल्या आत्ताच्या वयात, समजा वय पन्नास धरलं तर त्या पन्नास वर्षातले कळत्या वयाच्या 45 वर्षाचे अनुभव माणसाच्या मनात साठलेले असतात. भलेबुरे आनंददायी किंवा स्थितप्रज्ञ सुद्धा असू शकतात. नातेवाईकांचे नातेवाईक, मित्रमंडळी, परिचित, शेजारी, कट्ट्यावरचे ग्रुप मधले, सहप्रवासी या सगळ्यांचे विचार आपण वेळोवेळी ऐकत असतो. त्यांच्या बद्दल चर्चा करत असतो. त्यांच्या खाजगी जीवनाबद्दल पण थोडीफार माहिती करून घेत असतो. हे सगळे विचार मनात भरून येतात. हे सगळे विचार कुठेतरी मांडावेसे वाटतात. कारण पुढच्याला हे सगळे विचार पुढच्या पिढीला ह्या पिढीने हे सगळे विचार कुठेतरी उपयोगी वाटु शकतात. कारण पुढच्या पिढीला ह्या पिढीने जे सोसलं जे भोगलं किंवा या काळात जे समाज जीवन आहे त्याबद्दलची माहिती व्हावी अशी इच्छा असते. बोलायचे आहे, त्यामुळे किती सांगायचं, किती सांगायचं ते सांगत रहावसं वाटतं. लोक तासनतास फोनवर बोलतात. लोक पानन पान पण पुस्तकात लिहितात. डायरी लिहितात चर्चा करतात. भाषणे देतात. कारण हे ईतर सगळ्यांना कथनकार माणसाला सांगायचे आहे. हे सांगायला तरी त्याला जवळची व्यक्ती हवी आहे. आपण

a

घरातल्या वृद्ध माणसाने एखादी गोष्ट सांगितली की म्हणतो बाबा हि बाब आत्तापर्यंत तुम्ही 20 वेळा सांगितलेली आहे. तीच तीच रेकॉर्ड परत वाजवू नका. पण त्या बाबांना ती गोष्ट परत परत सांगावीशी वाटते कारण की ती त्याच्या हृदयातून मोकळी झालेली नसते. ती रूदयात कुठेतरी रुतून बसलेली असते.

एखादी गोष्ट सांगणं म्हणजे मनातला तिच्या भावनेचा निचरा करणे सुद्धा असतं. कधी कधी उलट सुद्धा होतं की आपण त्या गोष्टीवर वारंवार बोलल्यावर ती गोष्टच जास्ती तीव्रतेने जाणवू लागते. उदाहरणार्थ मंत्रजप केल्यावर कसं होतं, तसं आपण वारंवार त्याच दुःखाचा अथवा त्यात घटनेचा अपमानाचा मंत्र जपू लागतो की त्रास होतो.

काही असो कसेही असो मन मोकळं करणं अतिशय आवश्यक असतं. किती सांगायचे तुला,

किती सांगायचे मला!

हे सत्यच आहे.

a

35चुका

माणूस आयुष्यात बऱ्याच चुका करत असतो. अशा ज्या घटना, चुका त्याला त्या क्षणाला बरोबर वाटतात आणि नंतर कळतं की त्या चुका आहेत. कधी भूल किंवा चूक झाल्यावर लगेचच कळतं की ही चूक आहे, पण ती दुरुस्त करणे शक्य नसतं. तर कधी ती चूक झाली होती, हे कळायलाच बरीच वर्ष निघून जातात. त्यामुळे ती दुरुस्त करणे तर फारच दूर राहिल! एका प्रसिद्ध लेखकाच्या आत्मचरित्राच नाव आहे जाहल्या काही चुका!

एक कविता प्रहार मधले एका कलिगनी सांगितली होती.

जन्म मुका मृत्यु मुका,

मधल्या काळात अगणित चुका!

माणूस आयुष्यात खूप चुका करत असतो.

जाहल्या काही चुका आणि सुर अधुरे राहिले!

असं म्हटलं जाते. तरी पण भय इथले संपत नाही की आपण कुठल्या क्षणाला कुठली चूक करू आणि आपली कुठली चूक आपल्याला महान दुःखाकडे घेऊन जाईल.

चपलेला मारलेल्या छोट्या छोट्या खिळ्यांना सुद्धा चुका म्हणतात. कदाचित या चुका जशा पायाला टोचतात, तशा आयुष्यभर माणसांनी केलेल्या चुका त्याला टोचत राहतात. त्यामुळेच या छोट्या खिळ्यांना किंवा तरकस यांना चुका असं म्हटलं जातं. चूक होणे करणे माणूस म्हणून सहजपणे होत असतं. माणूसच चुकतो असं नाही देवाधिक सुद्धा चुकतात. आपण

अनेक देवांच्या पोथ्या पुराणांमध्ये कथांमध्ये पण पाहतो की देवांकडून संतांकडून मोठ्या माणसांकडून सुद्धा चुका होत असतात आणि या चुका या विधीलिखित असतात. माणसांनी कितीही ठरवून दक्षता पाळली तरी, नकळत त्याच्याकडून काहीतरी चूक घडते. वाईट आणि जे घडायचं ते घडत असतं. होणारे न चुके जरी येई ब्रह्मा तया आडवा! चुकून चुकलो, चुकून चुकलं असं म्हटलं तरी ती चूक झालेलीच असते, जी सुधारता येणे शक्य नसतं.

Irreversible mistakes cause great damagesछोट्या छोट्या कामा मधल्या वस्तू बनवण्या मधल्या स्वयंपाकामधल्या चुका असतील तर त्या सुधारल्यात जाऊ शकतात किंवा त्या किरकोळ चुका असल्यामुळे थोडा वेळच मन खट्टू होतं. पण जीवनातील नातेसंबंधांमधील किंवा कायदे कानून मधील, काही घटनांमधील, दुर्घटनांमधील, अपघाता मधील घातांमधील, बोलण्यामधील नाते तोडण्या मधील, जोडण्या मधील काही चुका असतात ज्या आयुष्यभर सतावत राहतात.

ज्या वळणावर चूक झाली ते वळण आठवत राहतं. ज्या व्यक्तीच्या बाबत चूक झाली ती व्यक्ती आठवत राहते. एखाद्या व्यक्तीचा आपण अपमान करून चुकतो. कारण की आपल्या नीतिमत्तेत इतक विचित्र वागणं बसत नसतं. त्यामुळे आपल्याला नंतर वाटतं की आपण हे काम करून चुकलो. प्रयत्न करुन पण ती चूक सुधारणे सुद्धा शक्य नसतं.

चूक भूल द्यावे घ्यावे असे म्हटलं तरी आयुष्यात कोणीही चूक भूल देत घेत नसतं. चुका लक्षात ठेवत असतो. चित्रगुप्त म्हणजे देवाचा अकाउंटंट किंवा खजिनदार तो सुद्धा माणसांच्या चुकांचा हिशोब लिहून ठेवत असतो. शेवट एका शेर ने करते.

भूल हो गई हो हमसे तो भूल समजकर माफ करना,

भूल से भी मगर हमको भूल न जाना!

आयुष्याचा पूर्वकाळ, इतिहास, पूर्व इतिहास, पूर्ण इतिहास पाहिला की कळतं कुठल्या कुठल्या क्षणाला आपण चुकलो. कधीकधी भूगोल पाहिल्यावर म्हणजे वाढलेले वजन बदललेला आकार बघितल्यावर सुद्धा कळतं की आपण किती चुकलो. तब्येत बिघडल्यावर कळतं की अरे आपण जीवनशैलीमध्ये चुकलो. आरोग्याकडे दुर्लक्ष केलं, या आजाराकडे दुर्लक्ष केलं, एखाद्या चुकीच्या डॉक्टरकडे गेलो, अशा सुद्धा चुका जीवनात होत राहतात. एखाद्या अपघातानंतर कळतं अरे आपण निर्णय क्षमतेत चुकलो किंवा आपण वयोमानानुसार गाडी, वाहन चालवणं, बाहेर पडणे कमी किंवा बंद करायला हवं होतं. एकटे किंवा कोणी सोबत नसताना एकट्याने जाऊन धैर्यात प्रवास करणं धाडसी निर्णय घेणे ईत्यादि टाळायला हवं होतं. चुकाच चुका अनंत चुका! जीवन म्हणजे एक चुकांची मालिका असते. कोणी कबूल करत कोणी कबूल करत नाही.

मी हा चुकांबद्दलचा लेख लिहून, चुकीचं लिहून, चूक लिहून चूक तर करत नाही ना!

**

36 गेले ते दिन

वेगवेगळी फुले उमलली रचूनी त्यांचे झेले,
एकमेकांवरील उधळले गेले ते दिन गेले!
अशा रीतीने आनंदाचे दिवस किंवा जुने दिवस हे निघून जातात.

'मेल्या म्हशीला मणभर तूप' अशी म्हण आहे. त्याप्रमाणे जुने दिवस कधी कधी चांगले वाटतात, तर कधी कधी वाईट पण वाटतात. कधी कधी तर असं वाटतं आयुष्यातल्या ज्या दिवसांना आपण अगदी वाईट म्हणतो तेच आपल्या आयुष्यातले खूप चांगले दिवस होते की काय? असाही नंतर प्रश्न पडतो.

मला आठवतं आमच्या मूळ गावी सतीची समाधी होती. त्यासतीच्या समाधीपाशी आधी बरेच उत्सव व्हायचे. नंतर हळूहळू नुसत पत्र्याचं काहीतरी खोपट उरलं आणि आता तर त्या गावात गेल्यावर ती सतीची समाधी कुठे आहे त्याचा शोध सुद्धा घेता येत घेणं अवघड झालय. जे शेतीप्रधान होतं, ते इतकं बदलले. ते गाव समृद्धी महामार्ग वगैरे आल्यामुळे बदलून गेले आहे. आशीर्वाद सगळ्यांना मिळतात म्हणून आमच्या काळी किती देवळात खूप पूजा केली जायची पण आता गुगलवर शोधून सुद्धा सतीची समाधी सापडत नाही. आम्ही लहानपणी तिथे एकदाच गेलो होतो. बाजूला चक्क ओढा वाहत होता. वडाची झाड, बाजरीचे शेत, अंधारलेली खोली, मोठ अंगण होते. तिथे थोडं पुढे गेल्यावर एक छोटीशी शाळा होती. बाजूला एक वड होता आणि त्या वडाच्या पारावर देवळाचे पायऱ्यावर गावातले जेष्ठ वरिष्ठ छोटी-मोठी मंडळी, रिकामटेकडे, बिझी असलेली लोकं सगळेच चर्चा करत बसलेली

असायची. गावातल्या ज्येष्ठ व्यक्तीचा तेव्हा सल्ला विचारला जायचा. तो पाळला जायचाच असं नाही पण सल्ला घेऊन विचारांची देवाणघेवाण करून निर्णय घेतला जाई. आता जो तो स्वतःलाच ग्रेट समजत असतो. अकाळी येणाऱ्या पावसासारखे अनेक अस्मानी सुलतानी राजकीय अराजकीय आरोग्याची अशी संकट आज कोसळत आहेत. साथीचे रोग पूर्वी एवढे नाही. तर आता जीवनशैली होणारे आजार सुद्धा बळी घेत आहेत. करोना ने तर कहरच माजवला. जुने दिवस गेले पण नवीन आलेले आधुनिक असले तरीही सारखाच ट्रॉमा देणारे आहेत.

उमेदीत ते दिवस सरले. कदाचित त्या वयात डोळ्यात स्वप्न होती. वय नव उमेदीचं होतं. त्यामुळे ते दिवस आवडत असतील. आता विस्कटलेल्या हाडांची साखळी घेऊन ज्येष्ठ समाजात वावरतात, अशी ही परिस्थिती निर्माण झाली असावी. साठी नंतर काही दिवस निवृतीचा आनंद, नंतर निरामय वार्धक्य आणि नंतर नकोसं वार्धक्य असा प्रवास आज जो झालाय तो पूर्वीच्या काळी नसायचा. कारण घरातच एक प्रकारची सपोर्ट सिस्टीम अस्तित्वात होती. एका वृद्धाश्रमात, एका वर्तमानपत्रासाठी लेख लिहायचे होतं म्हणून मी गेले तेव्हा आल्यावर मलाच आजारपण आले. जे वास्तव दिसत होते, ते प्रश्न, ती नाती बघून मला कसतरीच वाटायला लागलं.

गावी पूर्वी तिथ गोट्या, लगोऱ्या सूर पारंब्या खेळत बसलेली मुलं अजून आठवतात. त्या वयात आम्ही लहान होतो. कट्टी बट्टी करायचो. सारखे अबोली धरायची फॅशन होती. भाऊ भाऊ पण भांडायचं. जत्रेत जाणं म्हणजे फार कौतुक असायचं. सिनेमाला जाणं म्हणजे आधी आठ दिवस खुशी असे. सिनेमाच्या दिवशी एक दिवस खूप मजा आणि पुढच्या आठ दिवस स्टोरी एकमेकांना सांगणं ही गंमत असे. रात रात्र रात्र जागून गणेशोत्सवातली नाटकं

बघितली जायची. लग्नाच्या वरातीत धुम असायची. पेट्रो मॅक्सच्या बत्या बघायला लोक जमायचे. पेटत्या मशाली घेऊन गडावरती देवीला रात्री जायचो. आकाशात उठणारे ते पलीत्यांची धूराची रेषा नक्षी अजून आठवते. तो नजारा आठवत लोक अजूनही गड चढून जातात. भयप्रद वाटे. बाजूला पाय घसरला तर दरीत पडु, रात्र सरू दे, कोसळु देवु नको अशी प्रार्थना करून चढत असु. सर्व आजारी, अशी परिस्थिती होती तरी देवदर्शनाला वर्षातून एकदा जायचंच. आम्ही जाताना भयंकर थंडी असायची. रस्तोरस्ती लोक शेकोट्या पेटवून बसलेले असायचे. संध्याकाळच्या वेळी खरंच गायीच्या घंट्यांचे आवाज यायचे. (हल्ली तर संध्याकाळी कुठे गायी दिसत नाही आणि घंट्यांचे आवाजही येत नाही) पक्षी किलबलत. संध्याकाळी आकाशात घिरट्या घालणारे, परत फिरणारे, घरट्यात परतायला आतुर असत. असे भेलकांडे घालणारे पक्षी स्वतःचे घर शोधत असतात. माणूस सुद्धा त्याच्या मनातल्या अस्वस्थ भावनांना कुठे स्वस्थता मिळेल अशी प्रेमाची उब असलेले घरट शोधत असतो.

आता संध्याकाळचे बाहेर पडलं की घराघरातून टीव्हीचे आवाज येत असतात. लोक माणसांशी बोलण्यापेक्षा टीव्ही बघणं अधिक पसंत करतात.

देवाजीने करुणा केली, शेत पिकली मोत्या वाणी! असं म्हणायचे दिवस दूर सरले. आता, बिल्डरने करूणा केली,

शेत विकली पैशापायी चन्यावाणी!

असं म्हणायचे दिवस आले आहेत. अंगणात गॅलरी तुळस लावणं सुद्धा हल्ली लोकांना नको असतं. कारण की किडे येतात मुंग्या येतात. डास येतात. उंदीर नको म्हणून बागकाम हा प्रकार तर जवळजवळ नष्ट झाला आहे. पूर्वीचे दिवस खरच दूर निघून गेले आहेत.

a

37 पुढच्या वर्षी

गणपती बाप्पाला निरोप देताना आपण सांगतो,

"गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या. " म्हणजे एका वर्षाच्या कालावधीनंतर गणपती बाप्पा आपल्याला परत भेटायला येणार याची रिन्युअलसाठी सांगतो. आपल्याला खात्री असते बाप्पा येतील.

परतण्याची खात्री असते. माणूस आयुष्यात सुद्धा असाच नेहमी वारंवार आणि पुन्हा पुन्हा वेगवेगळे बेत करतो. त्यात पुढच्या दिवाळीला भेटूया. पुढच्या मे महिन्यात इथे सहलीला जाऊया. पुढच्या वर्षी आपण आपलं स्वतःचं घर करूया. पुढच्या वर्षी आपल्याला पदोन्नती मिळेल. पुढच्या वर्षी आपल्याला वेतनश्रेणीत लाभ मिळेल. अशी पुढच्या वर्षीची योजना, नवे बेत करत असतो.

एक वर्ष म्हणजे 365 दिवस असतात. या 365 दिवसाला 24 तासांनी गुणलं तर किती मोठा काळ असतो. पण पुढच्या वर्षी लवकर या वाक्यामध्येच एक आश्वासन असतं की पुढच्या वर्षी आपण नक्की भेटणार आहोत. एका वर्षाचा हा काळ आता बघता बघता उडून जाईल आणि आपण पुढच्या वर्षी परत नक्की भेटू. निरोप देतानाचा हा पुढच्या वर्षी भेटण्याच्या आश्वासनाचा आनंददायी भाव सुद्धा त्या निरोपाच्या विरोहाच्या किनारीला चमकत असतो. वर्ष पटकन जाईल, आता थोडेच दिवस राहिले आता थोडेच दिवस राहिले म्हणून आपण हे एक वर्ष पार पडतो. निसर्गाचे चक्र सुद्धा एक वर्षाचंच असतं. उन्हाळा हिवाळा पावसाळा अशी तीन ऋतू ची साखळी, म्हणजे चार चार

महिन्यांचे तीन ऋतू वारंवार फिरून एक वर्षांनी परत भेटत असतात. तसेच माणसाने पण एक वर्षात भेटावं अशी अपेक्षा असते. एका वर्षात वय वाढलं जातं. कालचक्रातला बदल शारीरिक दृष्ट्या मानसिक दृष्ट्या झालेला असतो आणि एक वर्षानंतर आपण स्वतःत झालेल्या बदलाला साक्षीदार होऊ शकतो. आपल्या नातेवाईकांमधील आपल्या अपत्यांमधील मित्र-मैत्रिणींमधील बदल सुद्धा या एक वर्षात आपल्याला समजतो. पुढचं वर्ष हे आनंददायी व्हावे, असे प्रत्येकालाच वाटतं म्हणून तर 31 डिसेंबरला सगळे मजा मजा करतात. चिनी चांद किंवा मराठी नूतन वर्षानुसार पाडव्याच्या दिवशी गुढी उभारून नवीन वर्षाचे स्वागत करतात. नवीन वर्ष चांगले जाईल अशी अपेक्षा करतात. या एक वर्षाच्या वारंवारितेत आरोग्याचा भाव सुद्धा असतो. तो असा की या एक वर्षाच्या चार ऋतूंमध्ये आपल्या आरोग्यात जे काही प्रश्न निर्माण झाले ते पुढच्या वर्षी होऊ नये. येईन अशी सूचना सुद्धा बाप्पा सतत देत असतात. सणात, निर्माल्यात बदल झाला. विसर्जनाच्या पद्धतीत बदल झाला पूर्वीच्या काळच्या गणेशोत्सवांमध्ये सुद्धा बदल झाला आहे. पुढच्या वर्षी नवं काहीतरी येत पण जुनं सुद्धा काहीतरी त्यात उरलेलं असतं. पुढच्या वर्षी भेटण्याचा हा भाव खूप सुखद असतो.

निरोप घेताना उन्हाळ्याची सुट्टी संपूर्ण मजा करुन मुलं आजोळहून ताजी होऊन जेव्हा आपल्या घरी येतात. शाळेच्या चौकटीत आता उद्यापासून वावरायचे या कल्पनेने खिन्न होतात. तेव्हा देखील त्यांच्या मनात हा भाव असतो की पुढच्या वर्षी आपल्याला सुट्टीत आजी आजोबांकडे जास्ती दिवस राहायला मिळावं. हल्ली उठ सुट माणसं कपडे घेतात पण पूर्वी दिवाळीला वर्षातून एकदाच कपडे मिळायचे. एक दांडीवर सुकत असलेला कपडा आणि एक मांडीवर घातलेला कपडा असे दोनच कपडे असायचे. त्यावेळी सुद्धा

माणूस वर्षातून पुढच्या वर्षी कपडा घ्यायला मिळेल म्हणून वाट बघत असायचा. ज्योतिषी वगैरे पण माणसांना सांगताना सांगतात, पुढच्या वर्षी ग्रह बदलला की नक्की लग्न होईल. मग उपवर तरुणी लग्न होण्याची वाट बघतात. नि संतान लोक पुढच्या वर्षी नक्की मूल होईल म्हणून त्या पुढील वर्षाची वाट पाहतात. करिअर घडवणारी माणसं पुढच्या वर्षी नोकरी लागेल, करिअर घडेल, घर बांधून होईल असे कुठले तरी बेत पुढच्या वर्षी पूर्ण होतील अशा आशेने पुढच्या वर्षीची वाट पाहतात.

आजारी माणूस थकतो. वृद्ध आजारी माणूस, विचाराने आजारी माणूस विचार करतो पुढच्या वर्षी आजार बरा होईल. तब्येत सुधारेल. सहलीला जायची आतुरता असलेल्या व्यक्तीचा आतला आवाज म्हणतो, पुढच्या वर्षी मला नक्की सहलीला जायला मिळेल.

परदेशी विसाची वाट बघणारे म्हणतात पुढच्या वर्षी मी परदेशी जाईन. स्वतःच्या घरात जाईन. काहीतरी वेगळं घडेल. मिरॅकल होईल. गणपती बाप्पा संकटाचा नाश करेल.

तर सर्व सुखांनो पुढच्या वर्षी नक्की या.

**

a

38 माझ्या मना बन दगड

माझ्या मना बन दगड, असं उद्विग्नतेने मनाला समजावणाऱ्या कवी सारखीच परिस्थिती आज बऱ्याच जणांवर आली आहे. इतरांचं माहित नाही पण माझ्यावर मात्र निश्चित आली आहे.

माझीया मना रे ऐक जरा,

हळवेपणा हा नाही बरा!

समाजातील परिस्थिती राजकारण करोना स्वाईन फ्लू मंकी पॉक्स असे सर्व जगभर पसरणारे आजार या सर्वांच्या परिस्थितीत मन तर गांजले वर पैसे नसून माणस वाटली, वाटा मळभून गेल्या आहेत. तुम्ही म्हणाल हीच जरा जास्तीत झालं लवंगेने खोकला आणि वेलदोड्याने सर्दी असं हिला सदैव काहीतरी होत असतं. मन जरा जास्तच हळव झालं आहे. पण पाहणी नुसार नैराश्य खूप वाढले आहे. जे काही चांगलं लक्षण नाही. मानसोपचार केले जातात, पण अजून तरी मनाला दगड बनवणार असं कुठल्या औषध निघालं नाही ना! त्यामुळे ह्या गोष्टी मनाला लागतात. त्या लागूनच राहतात.

मागे एक लेख वाचनात आला होता की जवळच्या व्यक्तीचा दूर जाणं हे प्रत्येक व्यक्ती वेगळ्या वेगळ्या दृष्टिकोनातून घेते आणि त्या परिस्थितीला तोंड देते. मात्र एखादी व्यक्ती ही त्या संकटाला तोंड देण्यात अपयशी ठरते आणि आपल्यापासून दूर राहणाऱ्या /गेलेल्या व्यक्तीची आठवण काढून झुरत राहते. त्यावर त्यांनी तो झुरणाऱ्या व्यक्तीच्या मनाचा दुबळेपणा आहे असं मत मांडलं होतं. पण मला असं वाटतं की प्रेम, नात्यांमधील गडदता, गहराई, भावनांचा स्वीकार, नकार, तीव्रता याचा सुद्धा फरक असतो. मुखातून

सावरताना पण नातेसंबंधांमध्ये, काळाचा जास्त विचार होतो, त्यामुळे आलेल्या संकटात त्रास सोसताना प्रत्येक व्यक्ती ही आपल्या स्वतःच्या मापदंडाप्रमाणे तोंड देते. अमुक व्यक्ती संकटातून अगदी हसत खेळत पुढे गेली, याचा अर्थ सगळेच जातात असं नाही.

आजारपणाचे पण बघा करोना झाल्यावर काहीजण खूप घाबरायचे, काही जण बिनधास्त राहिले काही जणांनी ठीक आहे आलं ते स्वीकाराव असे वागले. उपाय सापडला, स्वीकार किया मैने असा विचार स्वीकारला. कोरोना महामारीच्या काळाने मानसिक नुकसान खूप झालं. ते सोसून बरेच जण पुढे गेले. आर्थिक नुकसान नोकरी जाणं औषधांचा बेसुमार खर्च या वाढत्या महागाईच्या काळात काहीजणांनी सोसला पण प्रत्येकाने आपापल्या परीने आपापले युद्ध जिंकलं.

मला आठवतं माझ्या 85 वर्षाच्या सासुबाई जेव्हा लग्न घरी पाय घसरून पडल्या आणि त्यांचं तातडीने ऑपरेशन केलं तेव्हा सगळ्यांना वाटलं आता ह्या संकटातून वर येणार नाहीत. पण दोन महिन्यात त्या बऱ्या झाल्या. हसरे पणाने त्यांनी ते तोंड दिलं आणि त्याच्या पुढेही त्या पाच वर्ष अजूनही सकारात्मकतेने जीवनाचा आनंद घेत आहेत. त्या परिस्थितीत सुद्धा लग्न घरी जेव्हा त्यांचे वर ऑपरेशनची वेळ आली त्यांच्या डोळ्यातून पाणी येत नव्हतं की त्या हळव्या झाल्या नव्हत्या. तो त्यांचा आदर्श सगळ्यांनी, निदान मी घ्यावा असं मला सगळेजण सांगतात. पण प्रत्येक व्यक्तीची वृत्ती ही वेगळी असते.

माझे वडील सांगायचे की मी आयुष्यात कधी इंजेक्शनच घेतलं नाही. तो जुना काळ होता पण आता सुद्धा इंजेक्शन घेणं औषध घेणं ही काय फार

a
सुखद गोष्ट नसते आणि आरोग्यासाठी माणुस ती नाईलाजाने स्वीकारत असतो. समाजात बदल घडत असतात पण सुख देणारे जवळ येतात दूर जातात कोणी टोले हाणतात कोणी जळतात कुणी हेवा करतात कोणी मुद्दाम आपल्या मनातील मळमळ बाहेर फेकण्यासाठी आपल्याला डस्टबिन सारखं वापरतात. एकूण काय माणसं नातेसंबंधात दुसऱ्या व्यक्तीला वापरून घेतात, नंतर फेकतात, असे अनुभव जास्ती आढळतात. या सर्व नात्यांमध्ये प्रेम कमी आणि वापरणं उपयोग करून घेण्याचे प्रमाण खरेतर जास्ती असतं. नुकताच हायकोर्टाने सुद्धा एक निर्णय दिला की नातेसंबंधात युज अँड थ्रो ही वृत्ती बरोबर नाही. समोरची व्यक्ती आपल्याला वापरत राहते, टोचत राहते बोचत राहते आपल्याला सोडून जाते. तरी जे आहे त्याचा स्वीकार करायला हवा. गुळाचे पोत रिकामं झालं धान्य संपलं की उंदीर आधी पळून जात असतात. तशी संकटकाळी माणसं सोडून जातात. मदतीची अपेक्षा असेल, डॉक्टरांनी जर विश्रांती घ्या सांगितलं, करोना काळाला आजारपण आली अशावेळी ही माणसं सगळ्यात आधी फळ काढतात.

यावेळी मग आपण काय सांगायचं स्वतःच्या मनालाच म्हणायला हवं ना माझ्या मना बन दगड.

**

a

39 पालखी

पूर्वी राजे महाराजांना काही कामानिमित्त बाहेर जायच्या वेळी, अथवा शुभ कारणावर वधूला विवाहाच्या वेळी सजवलेल्या पालखीतून आणत. थाटामाटाने वरात निघे, नंतर पालखीला पुढे पुढे डोली असं नाव पडलं. पालखीला झिरझिरीत झगमगते पडदे व फुलांच्या माळाने सजवले जाई. दोन भोई खांद्यावर पालखी नेत. दंडी कंडी कावड या सर्व गोष्टी स्थलांतराची साधन असत. पालखीला सोबत अंगरक्षक, मशाल धरणारे, एखादा नोकर असा लवाजमा असे. चाकाचा शोध लागण्यापूर्वी चालत किंवा घोड्यावर प्रवासकेले जात असत. पालखीचे भोई बदलून नव्या दमाचे गडी घेऊन दिवसाला शंभर ते 200 किलोमीटरच अंतर या पालखीतून प्रवास करणारे प्रवासी पार पाडत असत. डोंगरदऱ्याने आड वाटेने जाताना दरोडेखोर पालखीतून जाणाऱ्या माणसांचे सोने नाणे चीज वस्तू लुटून नेत असत. रात्री तर ती पालखी घेऊन अंधारात जनावराची भीती असे. म्हणून दिवसा वाटचाल केली जाई. सायंकाळी शक्यतो पालखी खाली ठेवत आणि विश्रांती घेऊन तंबूमध्ये राहून पहाटे पुन्हा मार्ग अनुसरला जाई. आजही मंदिरात चित्रांमध्ये वाद्य वाजवत पालखी चाललेली आहे असे चित्र असते. राजे महाराजांची उत्तम कलाकुसर केलेली पालखी राजस्थानात बघायला मिळते. पालखी हे घराण्याचे सन्मानचिन्ह मानत असत.

पवित्र पापी चित्रपटाच्या वेळी तेरी दुनिया से होके मजबूर चला या गाण्याच्या चित्रीकरणाच्या वेळी गावात दिग्दर्शकाने पालखीचा शोध घेतला. त्यावेळी तेथील गावात एका वृद्धेकडे अशी पारंपरिक शिषम ची पालखी

असल्याचे त्याला समजले. घराण्याच्या समृद्धीची साक्ष अशी ही नक्षीदार आणि अतिशय वेगळी पालखी होती.

"आम्हाला चित्रीकरणापूर्ती पालखी द्या आम्ही पैसे देऊ. " अशी विनंती दिग्दर्शकांनी केली. मात्र तिने ती विनंती नाकारली. ती वृद्धा म्हणाली,

"या पालखीत राजघराण्यातील राणी महाराणी बसल्या. मी ती पालखी नटीला कशी देऊ? "

मग त्या पालखीचा फोटो काढून तशीच, दुसरी, एक कृत्रिम मेणा बनवून चित्रीकरण पार पडले. पण या नव्या पालखीची सर त्या जुन्या पालखीला नाही ही खंत दिग्दर्शकाने एका मुलाखतीत व्यक्त केली. कारण त्या मूळ पालखीला परंपरा होती, वारसा होता. पालखीतून मिरवणूक हा एक सन्मान सोहळा असतो. पालखीत संस्कृतीचा सुगंध असतो. अशा पालखीतून वाजत गाजत आनंद यात्रा निघावी असे स्वप्न प्रत्येक राज्यघराण्यातील, श्रीमंतांचे असते. पालखी हा आठवणींचा खजिना वाहते.

ग्रामीण भागात अजिबात सुविधा नसताना अशा पालखी अथवा डोली मधून किंवा लाकडी झोळी बाळंतिणीला दवाखान्यात नेलं जातं पालखीचा असाही उपयोग होतो.

भारतीय संस्कृतीची दिंडी अशीच एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाते आहे. नव्या दमाचे भोई पालखीला लाभत आहेत. देवाधिकांच्या मंदिरात देवीची पालखी असते. खंडोबाची पालखी असते. काही काही संतांच्या पादुका पालखीतून भक्तांच्या दर्शनासाठी गावोगावी फिरवल्या जातात. साईबाबांची पालखी म्हणून गावोगावाहून साईला भेटीस जाण्यासाठी भक्त फोटो ठेवून पालखी आणतो. भक्ती येते. संतांच्या पालखीतून श्रद्धेचा अखंड

स्त्रोत पुढे जातो आहे. उद आणि धुपाचा फुलांचा सुगंध मागे रेंगाळतो आहे. आपण सगळेच ही संस्कृतीची पालखी वाहत पुढे जाऊया. तिचं रक्षण करूया.

शुभांगी पासेबंद यांची पुस्तके.

ज्या कव्हरवर क्लिक कराल. ते पुस्तक हजर होईल.









Biodata-2020 19.5-2020

1.Shubhangi Chandrashekhar Paseband,

Phone:9869004712, 02225345992

2. M.Sc. B.Ed. Certificate course in Journalism

Diploma in performing Arts

3.about 350 columns published on loksatta, dainik aikya(satara), prahaar, pudhari, gramodhar(satara), Gavkari(Nasik)

4. Address

202, Anandi Bhuvan, Veer Savarkar Marg

opp Maharashtra Vidyalaya

Thane (West) 400602.

5. Retired as Branch Manager from a Nationalized bank in 2012

6. I am Writing stories and articles in various magazines, with a social message.

7. Perform programmes

Mulihi Janmala Yeu Dya…(Marathi), Kya Itni Buri Hoon Mai Maa (Hindi) (both with a message to stop female foeticide)

Manachi Mashagat (about mental health) Pasaydan (telling students about fraternity)

8. Other appreciations and prizes

TMC Samaj Sevika Puraskar 2008

Maharashtra Deep Puraskar 2008

Maharashtra deep puraskar 2009

Samata sahitya academy, Savitribai Phule puraskar 2008

a

9.Mumbai Marathi Granth Sangrahalaya

Kavi Prafull Datta Kushal Sampadak prize 2016

10ld.k.sandu, best book award 2016,

11Thane Municipal Corporation,Thane Gaurav puraskar 2016

□□□□□









a

ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष.

शुभांगी पासेबंद यांचे हे ई साहित्यवरचे पंधरावे पुस्तक.

शुभांगी पासेबंद या एक ज्येष्ठ लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या. आजवर त्यांची नव्वदहून अधिक पुस्तके विविध मान्यवर प्रकाशनांतर्फ़े प्रसिद्ध झाली आहेत. त्यांना आजवर अनेक साहित्यिक व सामाजिक पुरस्कारांनी नावाजले गेले आहे. अनेक व्यावसायिक प्रकाशक त्यांना मानधन देऊन त्यांची पुस्तके प्रकाशित करायला तयार अहेत.

पण शुभांगीजी आपली काही पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(१०), डॉ. नितीन मोरे (४५), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (१०), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(४०), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५),

अंकुश शिंगाडे(२६), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१०), श्याम कुलकर्णी(११), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (५), प्रवीण दवणे, आर्या जोशी, सरोज सहस्रबुद्धे (५) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।